अहवाल क्रमांक : १७५

सत्यमेव जयते

# पंचायती राज समिती

## (२०१७-२०१८)

### (तेरावी महाराष्ट्र विधानसभा)

**सातारा जिल्हा परिषदेच्या सन २०१३-२०१४ च्या वार्षिक प्रशासन अहवालाच्या संदर्भातील**

# एकोणतीसावा अहवाल

**(सदर अहवाल दिनांक      जून, २०१९ रोजी विधानसभेस/विधानपरिषदेस सादर करण्यात आला.)**

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय**
विधान भवन, मुंबई
**२०१९**

# पंचायती राज समिती

## (२०१७-२०१८)

(तेरावी महाराष्ट्र विधानसभा)

**सातारा जिल्हा परिषदेच्या सन २०१३-२०१४ च्या वार्षिक प्रशासन अहवालाच्या संदर्भातील**

# एकोणतीसावा अहवाल

## पंचायती राज समिती
## (सन २०१७-२०१८)

**समिती प्रमुख :**

(१) श्री. सुधीर पारवे, वि.स.स.

**सदस्य :**

(२) श्री. बाबुराव पाचर्णे, वि.स.स.

(३) श्री. चरण वाघमारे, वि.स.स.

(४) श्री. रणधीर सावरकर, वि.स.स.

(५) ॲड.राहुल कुल, वि.स.स.

(६) श्री. आर.टी.देशमुख, वि.स.स.

(७) डॉ. देवराव होळी, वि.स.स.

(८) ***रिक्त

(९) डॉ. सुधाकर भालेराव, वि.स.स.

(१०) श्री. सुधाकर कोहळे, वि.स.स.

(११) श्री. भरतशेठ गोगावले, वि.स.स.

(१२) श्री. किशोर पाटील, वि.स.स.

(१३) श्री. राजेश क्षीरसागर, वि.स.स.

(१४) श्री. तुकाराम काते, वि.स.स.

(१५) श्री. राहुल बोंद्रे, वि.स.स.

(१६) श्री. भारत भालके, वि.स.स.

(१७) प्रा. विरेंद्र जगताप, वि.स.स.

(१८) श्री. दिलीप सोपल, वि.स.स.

(१९) श्री. राहुल मोटे, वि.स.स.

(२०) श्री. दीपक चव्हाण, वि.स.स.

(२१) श्री. प्रविण दरेकर, वि.प.स.

(२२) ***रिक्त

(२३) श्री. विक्रम काळे, वि.प.स.

(२४) श्री. सतीश चव्हाण, वि.प.स.

(२५) श्री. अमरनाथ राजूरकर, वि.प.स.

**विशेष निमंत्रित :**

(२६) श्री. बाळाराम पाटील, वि.प.स.

(२७) श्री. श्रीकांत देशपांडे, वि.प.स.

(२८) श्री. दत्तात्रय सावंत, वि.प.स.

(२९) * श्री. किशोर दराडे, वि.प.स.

(३०) ** श्री. निलय नाईक, वि.प.स.

(३१) ** श्री. निरंजन डावखरे, वि.प.स.

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय :**

(१) श्री. जितेंद्र भोळे, सचिव (कार्यभार)

(२) श्री. विलास आठवले, सह सचिव (२) (का)

(३) श्री. प्रकाशचंद्र खोंदले, अवर सचिव

(४) श्री. मंगेश पिसाळ, कक्ष अधिकारी

(५) श्री. नितलेश भालेराव, कक्ष अधिकारी

* श्री.किशोर दराडे, वि.प.स. यांची मा.सभापती, महाराष्ट्र विधानपरिषद यांनी विशेष निमंत्रित सदस्य म्हणून दिनांक ४ डिसेंबर, २०१८ रोजीपासून नामनियुक्ती केलेली आहे.

** श्री.निलय नाईक, वि.प.स. व श्री.निरंजन डावखरे, वि.प.स. यांची मा.सभापती, महाराष्ट्र विधानपरिषद यांनी विशेष निमंत्रित सदस्य म्हणून दिनांक १ मार्च, २०१९ रोजीपासून नामनियुक्ती केलेली आहे.

*** डॉ.सुरेश (भाऊ) खाडे, वि.स.स. व प्रा.डॉ.तानाजी सावंत, वि.प.स. यांचा दिनांक १६ जून, २०१९ रोजी मंत्री परिषदेत समावेश झाल्यामुळे रिक्त.

## पंचायती राज समिती

## (सन २०१५-२०१६)

**कार्यकारी समिती प्रमुख :**

(१) *श्री. प्रकाश भारसाकळे, वि.स.स.

**सदस्य :**

(२) श्री. अनिल गोटे, वि.स.स.

(३) श्री. विकास कुंभारे, वि.स.स.

(४) श्री. भिमराव तापकीर, वि.स.स.

(५) श्री. आर.टी.देशमुख, वि.स.स.

(६) श्री. उन्मेश पाटील, वि.स.स.

(७) श्री. समीर कुणावार, वि.स.स.

(८) श्री. राजेंद्र नजरधने, वि.स.स.

(९) श्री. कृष्णा गजबे, वि.स.स.

(१०) श्री. अनिल बाबर, वि.स.स.

(११) श्री. भरतशेठ गोगावले, वि.स.स.

(१२) श्री. हेमंत पाटील, वि.स.स.

(१३) श्री. राजाभाऊ वाजे, वि.स.स.

(१४) ॲड. के.सी.पाडवी, वि.स.स.

(१५) श्री. बसवराज पाटील, वि.स.स.

(१६) श्री. अमित झनक, वि.स.स.

(१७) श्री. राहुल मोटे, वि.स.स.

(१८) श्री. सुरेशभाऊ लाड, वि.स.स.

(१९) श्री. दीपक चव्हाण, वि.स.स.

(२०) श्री. अनिल तटकरे, वि.प.स.

(२१) श्री. संदीप बाजोरिया, वि.प.स.

(२२) श्री. रामहरी रुपनवर, वि.प.स.

(२३) श्री. चंद्रकांत रघुवंशी, वि.प.स.

(२४) **रिक्त

(२५) **रिक्त

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय**

(१) डॉ.अनंत कळसे, प्रधान सचिव

(२) श्री. विलास आठवले, उप सचिव

(३) श्री. सचिन बाभळगांवकर, कक्ष अधिकारी

* सन २०१५-२०१६ या वर्षासाठी गठीत करण्यात आलेल्या महाराष्ट्र विधानमंडळाच्या पंचायती राज समितीवर मा. अध्यक्ष, महाराष्ट्र विधानसभा यांनी दिनांक १५ ऑक्टोबर, २०१६ रोजीपासून श्री. प्रकाश भारसाकळे, वि.स.स. यांची " कार्यकारी समिती प्रमुख " म्हणून नामनियुक्ती केली आहे.

** सन्माननीय समिती प्रमुख श्री. संभाजी निलंगेकर-पाटील, वि.स.स. व श्री. पांडुरंग फुंडकर, वि.प.स. यांचा दिनांक ८ जुलै, २०१६ रोजी मंत्री परिषदेत समावेश झाल्यामुळे रिक्त

# पंचायती राज समिति

## (सन २०१५-२०१६)

**समिती प्रमुख :**

१. श्री. संभाजी निलंगेकर-पाटील, वि.स.स.

**सदस्य :**

२. श्री. प्रकाश भारसाकळे, वि.स.स.

३. श्री. अनिल गोटे, वि.स.स.

४. श्री. विकास कुंभारे, वि.स.स.

५. श्री. भिमराव तापकीर, वि.स.स.

६. श्री. आर.टी.देशमुख, वि.स.स.

७. श्री. उन्मेश पाटील, वि.स.स.

८. श्री. समीर कुणावार, वि.स.स.

९. श्री. राजेंद्र नजरधने, वि.स.स.

१०. श्री. कृष्णा गजबे, वि.स.स.

११. श्री. अनिल बाबर, वि.स.स.

१२. श्री. भरतशेठ गोगावले, वि.स.स.

१३. श्री. हेमंत पाटील, वि.स.स.

१४. श्री. राजाभाऊ वाजे वि.स.स.

१५. ॲड. के. सी. पाडवी, वि.स.स.

१६. श्री. बसवराज पाटील, वि.स.स.

१७. श्री. अमित झनक, वि.स.स.

१८. श्री. राहुल मोटे, वि.स.स.

१९. श्री. सुरेशभाऊ लाड, वि.स.स.

२०. श्री. दीपक चव्हाण, वि.स.स.

२१. श्री. पांडुरंग फुंडकर, वि.प.स.

२२. श्री. अनिल तटकरे, वि.प.स.

२३. श्री. संदीप बाजोरिया, वि.प.स.

२४. श्री. रामहरी रुपनवर, वि.प.स.

२५. श्री. चंद्रकांत रघुवंशी, वि.प.स.

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय :**

(१) डॉ. अनंत कळसे, प्रधान सचिव

(२) श्री. विलास आठवले, उप सचिव

(३) श्री. प्रदीप मयेकर, अवर सचिव (समिती)

(४) श्री. सचिन बाभळगांवकर, कक्ष अधिकारी

## प्रस्तावना

मी, पंचायती राज समितीचा "समिती प्रमुख" या नात्याने समितीने अधिकार दिल्यावरून पंचायती राज समितीचा एकोणतीसावा अहवाल सादर करीत आहे.

सन २०१७-२०१८ या वर्षाकरिता समिती दिनांक ८ सप्टेंबर, २०१७ रोजी गठीत झाली. महाराष्ट्र विधानसभा नियमावलीतील नियम २४० अन्वये विधानमंडळाच्या पटलावर ठेवण्यात आलेल्या जिल्हा परिषदांच्या वार्षिक प्रशासन अहवालाची तसेच महाराष्ट्रातील पंचायती राज संस्थांच्या लेख्यांवरील लेखापरीक्षा पुनर्विलोकन अहवाल व एकत्रित वित्तीय महसुली लेखे यांच्या परीक्षणाची कामे प्रामुख्याने या समितीकडे सोपविण्यात आलेली आहेत.

शासनाच्या विविध कामकाजाचा वाढलेला व्याप (Enormous range and complexity) लक्षात घेता विधानमंडळाला उपलब्ध वेळेत आपली कर्तव्ये पुरेशा क्षमतेने बजावता येणे अशक्य झाले आहे. शासन यंत्रणेकडे उक्त किचकट प्रशासकीय कामासाठी सक्षम व तज्ज्ञ प्रशासक यंत्रणा उपलब्ध असते. संसदीय लोकशाहीच्या संवर्धनासाठी व यशस्वीतेसाठी शासनाच्या संपूर्ण प्रशासन व्यवस्थेवर सखोल, संपूर्ण, प्रभावी व अर्थपूर्ण असे (effective meaningful) नियंत्रण व देखरेख ठेवण्याची आत्यंतिक गरज आहे आणि म्हणूनच कार्यकारी प्रशासन (Executive) राबवित असलेल्या विविध योजनांचा अभ्यास करण्यासाठी, त्यातील त्रुटी शोधून काढून योजना अंमलबजावणीला व पर्यायाने प्रशासनाला गती देण्यासाठी (Tone of administration) मा. सभापती, विधानपरिषद व मा. अध्यक्ष, विधानसभा यांनी दोन्ही सभागृहाच्या निवडक सदस्यांचा समावेश असलेल्या पंचायती राज समितीचे गठन दिनांक ८ सप्टेंबर, २०१७ रोजी केले. समिती पद्धतीचे वैशिष्ट असे की, सभागृहात पक्षीय ध्येयधोरणांचा सदस्यांवर प्रभाव पडतो. त्या उलट संसदीय लोकशाही पद्धतीमध्ये विधानमंडळाची ही समिती फार मोठ्या मोलाचे कार्य पार पाडीत आहे. ही समिती विधानमंडळाची निर्मिती असून ती सहाजिकच विधानमंडळास दुय्यम आहे. या समितीला सर्व अधिकार विधानमंडळापासूनच प्राप्त झालेले आहेत. (They derive authority from the Legislature) या समितीला "Mini Legislature" सभागृहाची छोटी प्रतिकृती संबोधली जाते. शासनाने राबविलेल्या योजनांच्या अंमलबजावणीला पर्यायाने प्रशासनाला गती देण्यासाठी व प्रशासनावर सातत्याने नियंत्रण व प्रभावीपणे पहारा ठेवण्याचे महत्वाचे काम विधानमंडळाच्या या समितीद्वारे केले जाते. समितीचे कामकाज पक्षविरहीत तत्त्वावर (irrespective of party affiliation) चालत असल्यामुळे समिती समोरील बाबी पक्षीय अभिनिवेशरहीत पद्धतीने (Non-Party Basis) विचारात घेण्यात येतात त्यामुळे एखाद्या विषयाचा अभ्यास अत्यंत निःपक्षपातीपणे व तपशिलात जाऊन केला जातो. परिणामी त्यास पूर्ण न्याय मिळतो.

शासनाचे एखादे धोरण वा योजना याची आखणी कशी करावी याबाबत समिती सल्ला देऊ शकणार नाही, तथापि शासनाने अंमलात आणलेल्या धोरणांची वा योजनेची फलश्रुती अपेक्षेप्रमाणे होत नसेल वा होणार नसेल तर ही बाब संबंधित समिती सभागृहाच्या नजरेस आणून त्या धोरणात वा योजनेत बदल करण्यासंबंधी शासनास सुचविण्याचे काम करते. समिती पद्धतीचा हा एक विशेष फायदा आहे.

विधिमंडळाप्रती शासनाची जबाबदारी ही मर्यादित स्वरूपाची आहे. संसदीय लोकशाहीमध्ये शासन हे प्रत्येक बाबतीत विधानमंडळाला सर्वतोपरी जबाबदार असते आणि शासनाच्या संपूर्ण प्रशासनावर विधिमंडळाचे नियंत्रण हा संसदीय लोकशाहीचा आत्मा आहे.

समितीचे अधिकार, कार्यकक्षा, प्रशासनावर ठेवावयाचे नियंत्रण, शासनाचे समितीप्रती व विधानमंडळाप्रती असलेले उत्तरदायित्व या सर्वांचा साकल्याने विचार केल्यास समितीचे अधिकार निश्चित व निर्विवादपणे सर्वश्रेष्ठ आहेत. परंतु, योजना राबविण्यापूर्वी वा एखादे धोरण आखण्यापूर्वी प्रशासन यंत्रणेने मंत्रिमंडळाला दिलेल्या सल्ल्याची तपासणी करणे निश्चितच समितीच्या कार्यकक्षेबाहेरील होईल. मात्र योजना अस्तित्वात आल्यानंतर व त्यावर आर्थिक तरतूद करण्यात आल्यानंतर समिती या प्रकरणी संपूर्णपणे व तपशीलवार छाननी करण्यास समर्थ ठरेल. ही योजना अगदी अनावश्यक आहे काय, त्यावर अपेक्षेपेक्षा जास्त खर्च करण्यात आला आहे काय? योजनेची उद्दीष्टे साध्य झाली आहेत काय? योजना आर्थिकदृष्ट्या सक्षम आहे किंवा कसे, इतकेच काय एखादी योजना आर्थिकदृष्ट्या सक्षम नसल्यास ती बंद करण्यात यावी व त्याऐवजी दुसरी एखादी योजना आखण्यात यावी या मर्यादेपर्यंत सुद्धा समिती शिफारस करू शकते व त्या अनुषंगाने आवश्यक ती सर्व माहिती समितीला मागविण्याचा अधिकार आहे.

समित्यांचे कामकाज अधिक परिणामकारक करण्यासाठी मा. सदस्यांनी समितीच्या कामात जास्तीत जास्त सहभाग घेणे जरुरीचे आहे. या अहवालात नमूद बाबीसंदर्भात समितीने एक एक प्रश्न हाती घेऊन त्या प्रत्येक प्रश्नावर समाधानकारकरितीने साक्षीपुरावा गोळा केला, तसेच मा. समिती सदस्यांनी आळीपाळीने प्रश्न विचारुन संबंधित अधिकाऱ्यांकडून माहिती मिळविण्याच्या विनिर्दिष्ट पद्धतीचे पालनसुद्धा भेटीच्या वेळी केलेले आहे. एका सदस्यांनी त्यांचा मुद्दा पूर्ण केल्यानंतरच दुसऱ्या सदस्यांनी माहिती विचारण्याची पद्धत जोपासली आहे. या पद्धतीने समितीचे कामकाज सुव्यवस्थित पद्धतीने चालविण्याचा या समितीने प्रयत्न केलेला आहे.

समितीला तिच्याकडे सोपविण्यात आलेल्या विषयावरील मुद्दे तयार करून आणि त्यांच्या विनिर्दिष्ट क्रमाने त्यांचे परीक्षण करून विषयाशी संबंधित नियम किंवा कार्यपद्धतीमधील त्रुटी आणि उणिवा शोधून काढतेवेळी समितीचा दृष्टीकोन वस्तुनिष्ठ व विधायक होता. केलेल्या चुका सुधारण्यासाठी किंवा प्रशासकीय पद्धतीत सुधारणा घडविण्याच्यादृष्टीने समितीने अनेक बाबतीत सुधारणात्मक उपाय सुचविलेले आहेत, चुकांची पुनरावृत्ती होऊ नये यासाठी देखील समितीने उपाययोजना सुचविलेल्या आहेत. शासनाच्या प्रतिनिधीप्रती सदस्यांचे वर्तन संयमी आणि सौजन्यशील ठेऊन कोणताही साक्षीदार काही वस्तुस्थिती लपवित असल्याबद्दल दोषी असल्याचे किंवा असहकार दर्शवित असल्याचे आढळून आल्यानंतर समितीने संबंधितांविरुद्ध कारवाईदेखील सुचविली आहे. समितीची बैठक बोलविणे आणि साक्षीदारांना साक्षीसाठी बोलविणे यासंबंधीच्या इतर किरकोळ मुद्द्यांच्या बाबतीत साक्षीदारांना पुरेसा वेळ देऊन व नोटीस देऊन बोलविण्यात आलेले आहे.

थोडक्यात, समिती पद्धती ही अत्यंत उपयुक्त व परिणामकारक असून संसदीय कामकाज प्रणालीमध्ये या पद्धतीचे स्थान व महत्त्व अनन्यसाधारण असेच आहे. संसदीय शासन प्रणाली अधिकाधिक वृद्धिंगत करण्याच्या दृष्टीने या महत्त्वपूर्ण अशा संसदीय समितीच्या कामकाजाचा स्तर उत्तरोत्तर उंचावत नेणे ही आपणा सर्वांची जबाबदारी आहे.

राज्यात समिती जिल्हा परिषदांना भेटी देत असताना समितीला अनेक चांगल्या संकल्पना व राबविलेल्या योजना आढळून आल्या आहेत. त्याचप्रमाणे काही बाबतीत प्रचंड अनियमितता व गैरव्यवहाराची प्रकरणेदेखील आढळून आली आहेत. समितीने चांगल्या बाबींना समर्थन देऊन संबंधितांना प्रोत्साहन दिले. तद्वतच काही अनियमितता किंवा गैरव्यवहाराच्या प्रकरणात समितीने कठोरपणे निर्णयदेखील घेतले आहेत. असे करीत असताना दोषारोपित व्यक्तीवर कारवाई करताना नैसर्गिक न्यायाची पायमल्ली होऊ नये अशा प्रकारच्या सूचनादेखील प्रशासनास केल्या आहेत. लेखा परीक्षणास कागदपत्रे उपलब्ध करून न देणे अशी असंख्य प्रकरणे समितीला आढळून आली. अशा प्रकरणी समितीने कोणताही मुलाहिजा न ठेवता संबंधितांवर मुंबई स्थानिक निधी लेखा परीक्षा अधिनियमातील तरतुदीनुसार दंडात्मक कारवाईदेखील प्रस्तावित केली आहे. या माध्यमातून शासनखाती दंडाची रक्कम जमा होत असताना संबंधित कर्मचाऱ्यांना जरबदेखील बसविण्याचे काम समितीने केले आहे.

या समितीने ज्या ज्या जिल्ह्यांना भेटी दिल्या आहेत त्या त्या जिल्ह्यातील सर्व पंचायत समित्यांना भेटी देऊन उक्त पंचायत समित्यांच्या प्रशासनिक अहवालावर सखोल चर्चा करून ज्या बाबतीत दोष आहेत त्या सुधारुन घेण्याबाबत त्यांना उपयुक्त सूचना केल्या आहेत. तसेच पंचायत समित्यांच्या क्षेत्रातील विविध कामांना भेटी देऊन त्याची पाहणी करणे, शालेय पोषण आहार, पुरक पोषण आहार, सार्वजनिक आरोग्य केंद्रे/उपकेंद्रे, पशु वैद्यकीय दवाखाने, रस्ते, जलसिंचनाची कामे, पाणी पुरवठ्याची कामे इत्यादींना भेटी देऊन त्याबाबतही चुकांचे निरसन करून काही चांगल्या बाबींचे समर्थन करून संबंधितांना प्रोत्साहितदेखील केले आहे. या अहवालात अशा अनेक बाबींचा उहापोह केला आहे.

सन २०१२-१३ या वर्षाच्या लेखा परीक्षा पुनर्विलोकन व सन २०१३-१४ च्या वार्षिक प्रशासन अहवालाच्या संदर्भात सन २०१७-१८ साठी गठीत झालेल्या समितीने सातारा जिल्हा परिषदेची सखोल तपासणी केली. समितीने सातारा जिल्हा परिषदेस दिनांक ११, १२ व १३ एप्रिल, २०१८ रोजी भेट देऊन डॉ. कैलास शिंदे, मुख्य कार्यकारी अधिकारी व इतर संबंधित अधिकारी यांची साक्ष घेतली.

सन २०१७-२०१८ या वर्षाकरीता गठीत झालेल्या समितीने सातारा जिल्हा परिषदेकडून प्राप्त झालेल्या लेखी माहितीच्या तसेच साक्षीच्या वेळी संबंधित अधिकाऱ्यांनी दिलेल्या माहितीच्या आधारे उपस्थित झालेल्या मुद्द्यांबाबत अधिक माहिती जाणून घेण्याच्या दृष्टीने दिनांक १६ जानेवारी, २०१९ रोजी जिल्हा परिषद, सातारा संदर्भात मंत्रालयीन विभागीय सचिवांच्या, प्रतिनिधींच्या साक्षी घेतल्या.

मंत्रालयीन विभागीय सचिवांचे साक्षीचेवेळी श्री. श्यामलाल गोयल, अपर मुख्य सचिव, पाणीपुरवठा व स्वच्छता विभाग, श्री. राजगोपाल देवरा, प्रधान सचिव, वित्त विभाग, श्री. असिमकुमार गुप्ता, प्रधान सचिव, ग्रामविकास विभाग, श्री. दिनेश वाघमारे, प्रधान सचिव, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, श्री. रा. वा. पानसे, सचिव (प्र.स.), जलसंपदा विभाग, श्री. चं. प्र. जोशी, सचिव (रस्ते), सार्वजनिक बांधकाम विभाग, डॉ. सुवर्णा खरात, सह सचिव, शालेय शिक्षण विभाग, श्री. प्रकाश वळवी, उप सचिव, ग्रामविकास विभाग, श्री. संजय बनकर, उप सचिव, ग्रामविकास विभाग, श्री. कि. पां. वडते, उप सचिव, महसूल विभाग, श्री. म. रं. शेळके, उप सचिव, मृद व जलसंधारण विभाग, श्री. अ. अ. कपोले, उप सचिव, जलसंपदा विभाग, श्री. अ. मा. लुंडबे, अवर सचिव, पाणीपुरवठा व स्वच्छता विभाग, श्रीमती एम निलीमा केरकेट्टा, मुख्य कार्यकारी अधिकारी, खादी व ग्रामद्योग मंडळ, श्री. परमेश्वर बाबर, कक्ष अधिकारी, ग्रामविकास विभाग, श्री. संभाजी लांगोरे, उप आयुक्त, विभागीय आयुक्त कार्यालय, पुणे तसेच श्री. प्रताप मोहिते, संचालक, स्थानिक लेखा निधी संचालनालय, नवी मुंबई यांनी समितीच्या बैठकींना उपस्थित राहून समितीच्या कामकाजात केलेल्या सहकार्याबद्दल समिती त्यांची आभारी आहे. तसेच जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी व इतर संबंधित अधिकारी यांनी साक्षीच्या वेळी समितीला माहिती पुरवून केलेल्या सहकार्याबद्दल समिती त्यांचीही आभारी आहे.

समितीने कामकाजाचे संक्षिप्त कार्यवृत्त परिशिष्टामध्ये दिले आहे.

वार्षिक प्रशासन अहवालाच्या संदर्भात समितीने भेटी दिलेल्या सातारा जिल्हा परिषदेच्या कामकाजाची तपासणी करीत असताना समितीला आढळून आलेल्या काही मुद्दयांबाबत समितीचे अभिप्राय व शिफारशी अहवालात देण्यात आल्या आहेत.

सन २०१७-२०१८ साठी नव्याने गठीत झालेल्या समितीने दिनांक २० जून, २०१९ रोजीच्या बैठकीत प्रारुप अहवाल विचारात घेऊन तो किरकोळ दुरुस्तींसह संमत केला.

**विधान भवन :**
मुंबई,,
दिनांक २० जून २०१९.

**सुधीर पारवे,**
समिती प्रमुख,
पंचायती राज समिती.

## अनुक्रमणिका


| अनुक्रमांक | प्रकरण क्रमांक | विषय | पृष्ठ क्रमांक |
|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) |
| (१) | एक | सातारा जिल्ह्यातील विधानमंडळ सदस्य व जिल्हा परिषद पदाधिकाऱ्यांसमवेत केलेल्या अनौपचारिक चर्चेच्यावेळी समितीच्या निदर्शनास आलेल्या बाबींसदर्भात | १ |
| (२) | दोन | सन २०१२-२०१३ मधील विभागीय आयुक्त कार्यालयामार्फत जिल्हा परिषदेच्या वार्षिक तपासणीबाबत | ७ |
| (३) | तीन | पंचायत समिती, जावली (मेढा) मागासवर्गीयांच्या उन्नतीसाठीच्या योजनेच्या पंचायत समित्या उत्पन्नाच्या खर्चाबाबत. | ११ |
| (४) | चार | पंचायत समिती, जावली (मेढा) अंतर्गत सन २०१४-२०१५ पासून पाणीपुरवठा योजनेच्या कामाबाबत. | १३ |
| (५) | पाच | सातारा जिल्ह्यातील पाणी टंचाईबाबत | १५ |
| (६) | सहा | अपरातफर/अपहार प्रकरणांबाबत | १८ |
| (७) | | **परिशिष्ट (अ)** **शासनाचे आदेश, शासन निर्णय व परिपत्रके** | २१ |
| (८) | | **परिशिष्ट (ब)** **समितीच्या बैठकीचे संक्षिप्त कार्यवृत्त** | ४३ |

## प्रकरण एक

## जिल्हा परिषद, सातारा (प्रशासन)

### सातारा जिल्ह्यातील विधिमंडळ सदस्य व जिल्हा परिषदेच्या पदाधिकाऱ्यांसोबत केलेल्या अनौपचारिक चर्चेच्यावेळी समितीच्या निदर्शनास आलेल्या बाबींसंदर्भात

पंचायती राज समितीने दिनांक ११ ते १३ एप्रिल, २०१८ या कालावधीत सातारा जिल्हा परिषदेस भेट दिली असता सन २०१३-१४ या वर्षाच्या प्रशासन अहवालावरील चर्चेदरम्यान सातारा जिल्हा परिषदेकडून प्राप्त झालेल्या लेखी माहितीच्या आधारे सातारा जिल्ह्यातील विधिमंडळ सदस्य व जिल्हा परिषदेच्या पदाधिकाऱ्यांसोबत केलेल्या अनौपचारिक चर्चेच्यावेळी समितीच्या निदर्शनास आलेल्या बाबीसंदर्भात स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी समितीस विशद केले की, सातारा जिल्ह्यातील उत्पन्नाचा स्त्रोत वाढविण्यासाठी उपाययोजना करण्याची आवश्यकता आहे. तसेच जिल्ह्यातील त्रिशंकू भागाचा विषय लवकरात लवकर मार्गी लावावा याकरिता समितीने सहकार्य करावे. तसेच त्रिशंकू भागातील लोकांची अपेक्षा आहे की, त्यांच्या भागाचा नगरपालिका क्षेत्रासारखा विकास झाला पाहिजे. चौदाव्या वित्त आयोगाचा निधी थेट ग्रामपंचायतींना जातो. त्यामुळे जिल्हा परिषदेला त्यांच्या उत्पन्नातून कामे करावी लागतात. जिल्हा परिषदेचे उत्पन्नाचे स्त्रोत वाढले पाहिजे. यावर समितीने विचारणा केली की, आपण त्रिशंकू संदर्भात सांगितले. अशी घरे नगरपालिकेमध्ये असतील परंतु ती ग्रामपंचायतीमध्ये असतील तर त्यांना त्रिशंकू म्हणता येणार नाही. सातारा शहराला लागून नागरी वस्ती चारही बाजूने वाढत आहे. ही नागरी वस्ती नगरपालिकेमध्येही येत नाही व शहराच्या बाजूला असलेल्या ग्रामपंचायतीमध्येही येत नाही. म्हणजेच गाव आणि नगरपालिका यांच्यामध्ये समुहाने वाढलेली वसाहत म्हणजे त्रिशंकू होय. शहराला लागून चारही बाजूने विकास होत असतो. शहरालगतची ग्रामपंचायत आणि नगरपालिकेची हद्द यांच्यामध्ये समुदायाने वाढलेल्या वस्त्या त्रिशंकुमध्ये येतात. यावर स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी समितीस विशद केले की, ग्रामपंचायतीने गावठाणाची हद्द ठरवून दिलेली आहे. त्या हद्दीच्या बाहेर व नगरपालिकेच्या हद्दीच्या बाहेर म्हणजेच या दोघांच्या मध्यभागी दोहोंमध्येही नसलेले बरेच प्लॉट अकृषिक (एन.ए.) करण्यात आलेले आहेत, परंतु त्यांची ग्रामपंचायत किंवा नगरपालिकेमध्ये नोंद झालेली नाही, त्यांना आवश्यक त्या सोयीसुविधा पुरविण्यात याव्या, अशी मागणी होत आहे. तेथे विजेची व्यवस्था करणे, पाण्याची व्यवस्था करणे, रस्ते, नाल्या इत्यादी कामे करणे आवश्यक आहे. यावर समितीने विचारणा केली की, पुणे शहराच्या बाजूला अशा प्रकारच्या अनेक वसाहती ग्रामपंचायतीमध्ये नाही व शहरामध्येही नाही. तेथेही अशीच अडचण होती. तेथील लोक कर (टॅक्स) न भरता राहत आहेत. तेथील लोक अशाच प्रकारे त्रिशंकू मध्ये राहतात. अशा लोकांकडून कर (टॅक्स) वसूल करण्यात यावा, अशी समितीने शिफारस केली होती. तसेच ग्रामपंचायतीने हद्द निश्चित केलेली आहे. नगरपालिका, महानगरपालिका, शहरे यांच्या हद्दी निश्चित झालेल्या आहेत. काही लोकांनी ग्रामपंचायत व नगरपालिका क्षेत्रात येत नसलेले प्लॉट एन.ए. करून त्यांची विक्री केली. त्यामुळे जिल्हाधिकारी यांना साक्षीकरिता बोलविण्यात यावे. यासंदर्भात जिल्हाधिकाऱ्यांनी समर्पक उत्तर न दिल्यास आढावा बैठकीमध्ये आयुक्तांना बोलविण्यात यावे. समितीला तेवढा अधिकार आहे. जिल्हा परिषदेकडून त्रिशंकुचा महसूल गोळा केला जातो व महसुलापोटी जमा झालेली तेवढीच रक्कम विकासाकरिता दिली जाते. परंतु ही रक्कम पुरेशी होत नाही. त्यामुळे या भागाचा समावेश लगतच्या ग्रामपंचायतीमध्ये किंवा नगरपालिकेमध्ये केला तर त्या भागाला आवश्यक त्या सोयीसुविधा मिळू शकतील. तो भाग ग्रामपंचायतीच्या किंवा नगरपालिकेच्या हद्दीमध्ये येत असेल तर त्यांच्याकडूनच त्या भागाचा विकास केला पाहिजे. यासंदर्भात जिल्ह्यातील त्रिशंकुची यादी घेण्यात यावी व जिल्हाधिकाऱ्यांना बोलावून यातून मार्ग काढावा. जिल्हाधिकारी यांच्याकडून हा प्रश्न मार्गी लागला नाही किंवा समितीचे समाधान झाले नाही तर आयुक्तांना बोलविण्यात यावे आणि आयुक्तांकडून समाधान झाले नाही तर याबाबत साक्ष लावण्यात यावी, अशी समितीची सूचना आहे.

यावर स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी समितीस माहिती दिली की, त्रिशंकुचा भाग नगरपालिकेमध्ये आला तर कर (टॅक्स) वाढतो, असे या भागातील लोकांचे म्हणणे आहे. यावर समितीने पुढीलप्रमाणे मत व्यक्त केले की, कर (टॅक्स) कमी लागला पाहिजे आणि सुविधाही मिळाल्या पाहिजे, असे त्या लोकांचे म्हणणे दिसते. महसुली झोन नगरपालिकेमध्ये असेल तर त्रिशंकुचे क्षेत्र नगरपालिकेमध्ये जाईल आणि महसुली झोन ग्रामपंचायतीमध्ये असेल तर हा त्रिशंकुचा भाग ग्रामपंचायतीमध्ये जाईल. समितीच्या माहितीप्रमाणे हे क्षेत्र ग्रामपंचायत किंवा नगरपालिका या दोघांपैकी एका हद्दीमध्ये असेल. यावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी समितीस विशद केले की, सातारा जिल्ह्यामध्ये गोडवली हा भाग नगरपालिकेमध्ये गेलेला आहे. आता केवळ सिद्धनाथ व सोनगरवाडी हा भाग राहिलेला आहे. यावर समितीने निदेश दिले की, ठीक आहे. यासंदर्भात महसूल विभाग, नगरविकास विभाग, ग्रामविकास विभाग यांच्या सचिवांची एकत्रित साक्ष घेण्याची आवश्यकता आहे. या तिनही विभागाच्या सचिवांची साक्ष घेण्यात येईल. त्रिशंकू वस्त्या कोणकोणत्या आहे, हे मुख्य कार्यकारी अधिकारी आणि जिल्हाधिकारी यांनी निश्चित करावे व तशी यादी समितीपुढे सादर करावी. यावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी समितीस माहिती दिली की, गोडवली व सातारा जिल्हा परिषदेचा ठराव झालेला आहे. त्यांना शासनाच्या नियमाप्रमाणे नोटीसी आलेल्या आहेत. हा भाग आता सातारा नगरपालिकेमध्ये येणार आहे. आता केवळ सिद्धनाथ व सोनगरवाडी या दोन भागापैकी एका भागाला नोटीस आलेली आहे व हा एक भाग वाई मध्ये समावेश करण्याची प्रक्रिया चालू आहे.

तद्‌नंतर समितीने मुख्य कार्यकारी अभियंता यांना सातारा जिल्ह्यातील सर्वसाधारण माहिती देण्याबाबत निदेश दिले असता मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी समितीला सातारा जिल्हा परिषदेची माहिती पुढीलप्रमाणे विशद केली की, सातारा जिल्ह्यामध्ये ११ तालुके असून ८ नगर परिषदा, ८ नगर पंचायती, ११ पंचायत समित्या आहेत. सातारा जिल्ह्याची एकूण लोकसंख्या सुमारे ३३ लाख इतकी आहे. जिल्ह्यातील सर्वाधिक लोक शेती व्यवसायावर अवलंबून आहेत. खंडाळा व फलटण येथे विशेष आर्थिक क्षेत्र (सेझ) निर्माण करण्यात आले आहे. जिल्ह्यातील ८ तालुके डोंगरी असून जिल्ह्यामध्ये सुमारे १५०० ग्रामपंचायती आहेत. जिल्हा परिषदेचे एकूण बजेट सुमारे २९ ते ३० कोटी रुपये आहे. खरेदी-विक्री व्यवहारातील स्टॅम्प ड्युटीच्या माध्यमातून मागील वर्षी १० ते १२ कोटी रुपये उत्पन्न मिळते. जिल्ह्यामध्ये ५६७ आठवडी बाजार पूर्वीपासून चालत आले आहेत. जिल्हा परिषदेच्या २,७१० प्राथमिक शाळा, ७६७ माध्यमिक शाळा, २१५ उच्च माध्यमिक शाळा आहेत. सन २०१६-१७ मध्ये राज्यात सिंधुदुर्गनंतर सातारा जिल्हा शैक्षणिक गुणवत्तेत चांगला आहे. जिल्ह्यात कुपोषणची संख्या ४६७ आहे. जिल्ह्यामध्ये ७२ प्राथमिक आरोग्य केंद्र आहेत व ४०० उप केंद्र आहेत. राज्य शासनाकडून केंद्र शासनाचा हेल्थ व वेलनेसचा कार्यक्रम राबविण्यात येत असून त्यामध्ये सातारा जिल्ह्याचा समावेश केला आहे. त्यामध्ये वाई, खंडाळा, फलटण व महाबळेश्वर या तालुक्यांचा समावेश करण्यात आला आहे. ५० उप केंद्रावर बीएएमएस डॉक्टर ठेवण्यात येणार आहेत. इंग्रजी माध्यमातून मराठी माध्यमाच्या शाळेमध्ये प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांच्या संख्येमध्ये वाढ होत आहे.

यावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी समितीस माहिती दिली की, सातारा जिल्ह्यामध्ये १,९०० शाळा डिजिटल आहेत. यावर स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी मुख्य कार्यकारी अधिकारी यांना विशद केले की, डिजिटल वर अधिकाधिक भर देण्यात यावा, अशी आमची अपेक्षा आहे. यावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी समितीस होकारार्थी उत्तर दिले. १४ व्या वित्त आयोगाचा २५ टक्के निधी एच.आर.डी.वर खर्च करावयाचा आहे. त्यासंदर्भात प्रत्येक ग्रामपंचायतीला सूचना देण्यात आलेल्या असून सदरहू खर्चातून माहे जूनपर्यंत प्रत्येक शाळेवर संगणक उपलब्ध करून देण्यात येणार आहे व शाळा डिजिटल करण्यात येणार आहेत.

तद्‌नंतर समितीने विचारणा केली की, शाळेतील शिक्षकांकडे संगणक चालू करणे व ते शिकवण्याचे कौशल्य असणे गरजेचे आहे. काही शाळेतील शिक्षकांना संगणक सुरू करता येत नाही, असे आढळून आले आहे. शाळेतील विद्युत वापराची शुल्क आकारणी व्यावसायिक (कमर्शिअल) दराने करण्यात येते ते ६ महिने भरले गेले नाही तर वीज जोडणी तोडण्यात येते व परिणामी डिजिटल शाळेचा उपक्रम बंद पडतो. त्यासंदर्भात उपाययोजना करण्यात यावी. तसेच प्रत्येक शाळेवर सोलार युनिट बसविण्याचे आश्वासन माननीय ऊर्जा मंत्री महोदयांनी दिले आहे. यावर स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी समितीस विशद केले की, ऊर्जा मंत्री महोदयांनी शाळेचे वीज देयक व्यावसायिक (कमर्शिअल) दराने लावण्यात येणार नाही, असे आश्वासन दिले आहे. त्यासंदर्भात मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी खात्री करून घ्यावी. यावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी होकारात्मक उत्तर दिले.

जिल्ह्यातील रिक्त पदांबाबत जिल्हा परिषद, अध्यक्ष यांनी पुढील प्रमाणे सविस्तर माहिती विशद केली की, सातारा जिल्हा परिषदेला तुटपुंजा निधी मिळत आहे. १४ व्या वित्त आयोगाचा निधी जिल्हा परिषदेला मिळत होता, आता तो थेट ग्रांमपंचायतींना मिळत आहे. मुद्रांक शुल्क (स्टॅम्प ड्युटी) ग्रामपंचायतीला द्यावी लागते. त्यामुळे पंचायत समितीला शून्य टक्के निधी मिळत आहे. परिणामी पंचायत समितीला विकासाची कामे करण्यासाठी अनेक अडचणी येत आहेत. सातारा जिल्हा परिषदेत अधिकाऱ्यांची अनेक पदे रिक्त आहेत. जिल्हा परिषदेकडे कृषि विभाग होता. आता त्यामधील बराचसा भाग राज्य स्तरावर वेगळा झालेला आहे.

जिल्हा परिषदेला रस्त्यांची कामे करण्यासाठी निधी देखील खूप कमी प्रमाणात मिळत आहे. गट अ, ब, क आणि ड साठी निधी प्राप्त न झाल्यामुळे एखाद्या रस्त्याची दुरुस्ती देखील करता येत नाही. पूर्वी सार्वजनिक बांधकाम विभागाकडून रस्त्यांच्या दुरुस्तीच्या कामासाठी निधी मिळत होता. परंतु, आता तो ग्रामविकास विभागाकडे आल्यामुळे निधी लवकर मिळत नाही. ग्रामविकास विभागाने जिल्हापरिषदेला निधी उपलब्ध करून दिला तर पुढील कामे करणे सोपे जाते. यावर समितीने विचारणा केली की, फोरनेटचे रस्ते सोडून ग्रामीण रस्ते (व्हीआर) आणि इतर ग्रामीण रस्ते (ओडीआर) किती आहेत, ३ ते १० लाख रुपयांच्या रस्त्यांच्या कामाचे तुकडे पाडून कामे केली जातात. यावर मुख्य कार्यकारी अधिकारी, यांनी समितीला विशद केले की, व्हीआर आणि ओडीआरचे ९ कि.मी. लांबीचे रस्ते आहेत. ३०५४ मानकानुसार रस्ता केला जातो. यावर समितीने विचारणा केली की, मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी रस्त्यांच्या संदर्भात जिल्हा नियोजन (प्लॅन) तयार करण्याची आवश्यकता आहे. यावर जिल्हा परिषद, अध्यक्ष यांनी समितीला विशद केले की, मुख्यमंत्री ग्रामसडक योजनेचे नियोजन झालेले असून, त्यामध्ये रस्ते येत आहेत, या व्यतिरिक्त ग्रामीण आणि इतर ग्रामीण रस्ते आहेत याचे देखील नियोजन तयार केलेले आहे. त्यामध्ये देखील काही रस्त्यांची कामे प्राथम्याने घेतली जात आहेत. त्यानुसार कामे केली जातात. सातारा जिल्हा परिषदेत अनेक जागा आहेत. निधी न मिळणे ही एक मुख्य अडचण आहे.

यावर समितीने विचारणा केली की, अशा जागांचा विकास बांधा, वापरा, हस्तांतरित करा (बी.ओ.टी.) तत्वावर जसा केला जातो तशीच योजना जिल्हा परिषदेने आखण्याची गरज आहे. परिणामी जिल्हा परिषदेला स्वतःचे उत्पन्न मिळणार आहे. जिल्हा परिषदेला डीपीआर करण्यासाठी

खर्च येणार आहे. यावर जिल्हा परिषद अध्यक्ष यांनी समितीस विशद केले की, मुद्रांक शुल्क एक टक्का भरला जातो त्यामध्ये काही टक्क्यांची वाढ केली तर निधीमध्ये वाढ होणार आहे.

पुढे सभापती, कृषि समिती यांनी समितीला विशद केले की, बियाण्यांसाठी गेल्यावर्षी १५ लाख रुपये कृषि विभागास देण्यात आले होते. ६० रुपयांच्या बाजरीच्या पिशवीवर प्रक्रिया करण्यासाठी १५० रुपयांचा खर्च येतो. त्यामुळे ५० टक्के देखील खर्च झालेला नव्हता. शेतीसाठी एखादे अवजार घ्यावयाचे असेल आणि त्याची किंमत ५० हजार रुपये असेल आणि त्यावर १० हजार रुपयांची सबसिडी दिली जाते. त्यामुळे अशा प्रकारची योजना पैसेवाल्यांसाठी आहे की काय असा प्रश्न पडत आहे. यावर समितीने विचारणा केली की, जिल्हा परिषदेचे हक्क डावलले जात असल्याची खंत काही पदाधिकाऱ्यांनी व्यक्त केलेली आहे. यावर जिल्हा परिषद, अध्यक्ष यांनी समितीला विशद केले की, अकृषिक (एनए) केल्यानंतर एखादे बांधकाम केले जाते. डेव्हलपमेंट चार्जेस महसूल विभागाकडून घेतले जातात. त्यामुळे डेव्हलपमेंट चार्जेस का घेतल्या जातात, असा प्रश्न आहे. पुढे समितीने विचारणा केली की, डेव्हलपमेंट चार्जेस ग्रामपंचायातीने घेतला पाहिजे. एनए करण्यासाठी महसूल विभागाकडून फी घेतली जाते. पुढे जिल्हा परिषद सभापती, समाज कल्याण समिती यांनी समितीस विशद केले की, वैयक्तिक लाभाच्या योजनेत ३५ हजार रुपयांची झेरॉक्स मशीन आहे. परंतु, लाभार्थ्याकडे पैसा नसल्यामुळे त्याला या योजनेचा फायदा घेता येत नाही. समितीने विचारणा केली की, संबंधित लाभार्थी ज्या दुकानदाराकडून झेरॉक्स मशीन घेणार आहेत, अशा ठिकाणी जिल्हा परिषदेने त्या दुकानदाराला हमी दिली पाहिजे.

तद्नंतर सभापती, महिला व बाल कल्याण समिती यांनी समितीला विशद केले की, महिला व बाल कल्याण विभागामध्ये एकूण १३ पदे रिक्त आहेत. त्यामुळे प्रभावीपणे कामे करता येत नाहीत. अंगणवाडी मदतनीसांची पदे भरण्यासाठी स्थगिती दिलेली आहे. पंचायत समितीला खूप कमी प्रमाणात सेस मिळत आहे. यावर सामितीने निदेश दिले की, सर्व विकास कामांवर नियंत्रण ठेवणे हे आपले काम आहे. यावर सभापती, पंचायत समिती, जावली यांनी समितीस विशद केले की, मुळात विभाग आमच्या अधिनस्त काम करीत आहे. आम्ही २०-२५ हजार मतदारांचे प्रतिनिधित्व करतो. हे मतदार आमच्याकडे या विषयी विचारणा करतात. यावर समितीने निदर्शनास आणून दिले की, जिल्हा परिषदेचे काम हे शेवटी पंचायत समितीचेच काम आहे. किंबहुना ते पंचायत समिती सदस्यांचेच काम आहे. आता घरकुल योजनेत मोठ्या प्रमाणावर घरकुले मंजूर होत आहेत.तपंचायत समिती क्षेत्रातील मतदार हे थेट पंचायत समिती सदस्यांच्या संपर्कात असतात. ते आमदार किंवा जिल्हा परिषद सदस्यांच्या संपर्कात नसतात. समिती सांगू इच्छिते की, आपण सर्वांनी गट विकास अधिकारी, पंचायत समिती सदस्य, पंचायत समिती सभापती इत्यादींचे नेमके काय अधिकार आहेत, या बाबतचा अभ्यास केला पाहिजे. जेणेकरून आपणास कोणाचे काय अधिकार आहेत हे निदर्शनास येईल.

यावर सभापती, पंचायत समिती, कोरेगाव यांनी समितीस विशद केले की, मी कोरेगाव पंचायत समितीचे प्रतिनिधित्व करतो. पंचायत समिती, कोरेगावमध्ये विविध संवर्गात मोठ्या प्रमाणावर पदे रिक्त आहेत. उदाहरणार्थ केंद्र प्रमुखांची १७ पदे मंजूर असून प्रत्यक्षात ७ पदे कार्यरत आहेत व तब्बल १० पदे रिक्त आहेत.

यावर समितीने विशद केले की, मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांनी आमच्या निदर्शनास आणून दिले की, सातारा जिल्हा हा प्रगत शैक्षणिक धोरणात राज्यात तिसऱ्या क्रमांकावर आहे. समितीला वाटते केंद्र प्रमुखांची पदे रिक्त असली तरी त्यांचा अधिभार संबंधित मुख्याध्यापकांकडे दिला असेल. तद्नंतर सभापती, पंचायत समिती, कोरेगाव यांनी समितीस विशद केले की, कोरेगाव पंचायत समितीच्या आरोग्य विभागात सुद्धा मोठ्या प्रमाणावर पदे रिक्त आहेत. तसेच दुसरी बाब अशी की, नगरसेवकाला विधानपरिषद निवडणुकीमध्ये मतदान करण्याचा अधिकार आहे. परंतु आम्ही पंचायत समिती सदस्य १५-२० हजार मतदारांचे प्रतिनिधित्व करीत असताना सुद्धा आम्हाला मात्र त्या निवडणुकीत मतदान करण्याचा अधिकार नाही. केवळ पंचायत समितीच्या सभापतींना विधानपरिषद निवडणुकीमध्ये मतदानाचा अधिकार आहे. तसेच पंचायत समिती सदस्यांना नियोजन मंडळावर सुद्धा काम करता येत नाही. आमची मागणी आहे की, आम्हाला विधानपरिषद निवडणुकीत मतदानाचा अधिकार आणि नियोजन मंडळावर प्रतिनिधित्व मिळावयास पाहिजे. यावर समितीने होकारात्मक प्रतिक्रिया दर्शविली.

तद्नंतर सभापती, कृषी समिती यांनी समितीस विशद केले की, पूर्वी रासायनिक खते आणि औषध विक्री केंद्रांना परवाना देण्याचा आणि त्यांची तपासणी करण्याचा अधिकार जिल्हा परिषदेच्या कृषी विभागाकडे होता. परंतु आता शासनाने ते अधिकार काढून स्वत:कडे घेतल्यामुळे जिल्हा परिषदेकडे आता काही कामच शिल्लक राहिलेले नाही. पुढे जिल्हा परिषद, अध्यक्ष व सभापती स्थायी समिती यांनी समितीस उपरोक्त विषयासंदर्भात अधिक माहिती दिली की, ज्यावेळी हे अधिकार जिल्हा परिषदेकडे होते त्यावेळी शेतकऱ्यांना काही अडचणी आल्यास ते खते आणि औषधांच्या बाबतीत जिल्हा परिषदेकडे तक्रारी करीत होते. जोपर्यंत आमच्याकडे परवाना तसेच तपासणीचे अधिकार होते तोपर्यंत आमचे यावर नियंत्रण राहत होते. परंतु आता हे अधिकार आमच्याकडून काढून घेतल्यामुळे यावर पूर्वीसारखे नियंत्रण राहिले नाही. जर एखाद्या गावात पाण्याचा टँकर आला नाही तर लोक आमच्याकडे येतात, परंतु प्रत्यक्षात टँकर देण्याचे अधिकार हे महसूल विभागाला आहेत. शासनाने परवाना व तपासणीचे अधिकार स्वत:कडे घेतल्यामुळे जिल्हा परिषदेचे यावर नियंत्रण राहिलेले नाही. पुढे सभापती, पंचायत समिती कोरेगाव यांनी अशीही

माहिती दिली की, जिल्हा परिषदेप्रमाणेच पंचायत समितीच्या मालकीच्या सुद्धा अनेक जागा आहेत. पंचायत समितीच्या मालकीच्या जागांचा विकास कसा करावा, याबाबत समितीने मार्गदर्शन केल्यास बरे होईल.

यावर समितीने निदेश दिले की, जिल्हा परिषदेच्या मालकीच्या जागांचा जसा विकास करण्याबाबत सुचविले आहे. त्याच धर्तीवर पंचायत समितीच्या मालकीच्या जागांचा देखील विकास करावा व आपले उत्पन्न वाढवावे, व या व्यतिरिक्त जर सदस्यांना काही सूचना करावयाच्या असतील तर त्यांनी त्या लेखी स्वरूपात समितीला द्याव्यात. त्या सुचनांची निश्चितपणे दखल घेण्यात येईल. असे समितीने संबंधितांना आश्वासन दिले.

**उपरोक्त माहितीच्या संदर्भात अधिक माहिती जाणून घेण्यासाठी समितीने खालील मुद्यांबाबत विभागाकडून माहिती मागविली.**

सातारा शहराला लागून नागरी वस्ती चारही बाजूने वाढत आहे ही नागरी वस्ती नगरपालिकेमध्येही येत नाही व शहराच्या बाजूला असलेल्या ग्रामपंचायती मध्येही येत नाही अशा त्रिशंकू भागाचा जिल्हा परिषदेकडून महसूल गोळा केला जातो व महसुलापोटी जमा झालेली तेवढीच रक्कम विकासाकरिता दिली जाते, परंतु ही रक्कम पुरेशी होत नसल्याने त्या भागाला मूलभूत नागरी सोयी सुविधा मिळण्यासाठी महसूल, नगरविकास व ग्रामविकास विभागाने एकत्रितरित्या कोणता धोरणात्मक निर्णय घेतला आहे?

**उपरोक्त मुद्यांसंदर्भात जिल्हा परिषदेकडून समितीस खालीलप्रमाणे लेखी माहिती प्राप्त झाली.**

सातारा जिल्ह्यातील त्रिशंकू भाग नगरपरिषद किंवा ग्रामपंचायतमध्ये समाविष्ट करण्यासाठी प्रयत्न करण्याबाबत मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद सातारा यांच्याकडून दिलेल्या आश्वसनाच्या अनुषंगाने करण्यात आलेल्या कार्यवाहीचा अनुपालन अहवाल सातारा जिल्हा परिषदेकडील पत्र जा.पं.ग्रा.क्र. ६(१)/सीआर/वशि/१२८५४/२०१८, दिनांक २७ सप्टेंबर, २०१८ अन्वये, उप सचिव महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, विधान भवन मुंबई यांना सादर करण्यात आला आहे.

सातारा शहराला लागून नागरी वस्ती नगरपालिकेमध्येही येत नाही व शहराच्या बाजूला असलेल्या ग्रामपंचायतीमध्येही येत नाही असा त्रिशंकू भाग पुढीलप्रमाणे आहे.—

| अ. क्र. | तालुका | त्रिशंकू भागाचे नाव |
|---|---|---|
| १ | सातारा | गोडोली त्रिशंकू भाग |
| २ | सातारा | कंरजे तर्फ सातारा त्रिशंकू भाग |
| ३ | सातारा | सातारा त्रिशंकू भाग |

सदरचा त्रिशंकू भाग नगरपरिषदेमध्ये समाविष्ट करण्यासाठी करण्यात आलेली कार्यवाही -

**(१) सातारा तालुक्यातील गोडोली त्रिशंकू भाग.—**महाराष्ट्र शासन, नगरविकास विभाग, शासन निर्णय क्र.एन.यु.एम.२०१६/प्र.क्र.४/न.वि.१८, दिनांक २२ मार्च, २०१७ अन्वये सातारा नगरपरिषद हद्दवाढीची उद्‍घोषणा प्रसिद्ध करण्यात आली आहे. या उद्‍घोषणेमध्ये मौजे गोडोली या गावामधील समाविष्ट करण्यात आलेल्या सर्व्हे नंबरमध्ये संपूर्ण गोडोली त्रिशंकू भागातील सर्व्हे नंबर समाविष्ट करण्यात आले आहेत.

**(२) सातारा तालुक्यातील मौजे करंजे तर्फे सातारा त्रिशंकू भाग.—**महाराष्ट्र शासन, नगरविकास विभाग, शासन निर्णय क्र.एन.यु.एम.२०१६/प्र.क्र.४/न.वि.१८, दिनांक २२ मार्च, २०१७ अन्वये सातारा नगरपरिषद हद्दवाढीची उद्‍घोषणा प्रसिद्ध करण्यात आली आहे. या उद्‍घोषणेमध्ये मौजे करंजे तर्फे सातारा मधील सर्व्हे नंबर ३४५, ३८७, ४०९, ४१०, ४१५, ४१६, ४१७, ४३२, ४३०, ४२१ (सुधारित स.नं. ३८७) या संपूर्ण त्रिशंकू भागाचा समावेश करण्यात आलेला आहे.

**(३) सातारा तालुक्यातील सातारा त्रिशंकू भाग.—**महाराष्ट्र शासन, नगरविकास विभाग, शासन निर्णय क्र.एन.यु.एम.२०१६/प्र.क्र.४/न.वि.१८, दिनांक २२ मार्च, २०१७ अन्वये सातारा नगरपरिषद हद्दवाढीची उद्‍घोषणा प्रसिद्ध करण्यात आली आहे. या उद् घोषणेमध्ये सातारामधील सर्व्हे क्रमांक ४५, ५० ते ५१ भाग, ५८ भाग या त्रिशंकू भागाचा समावेश करण्यात आलेला आहे.

वरील नमूद गोडोली, करंजे तर्फे सातारा व सातारा त्रिशंकू भागातील नमूद सर्व्हे नंबर मधील त्रिशंकू भाग सातारा नगरपरिषदेमध्ये समाविष्ठ करण्यासाठी सातारा जिल्हा परिषदेच्या दि. ०३ आक्टोबर २०१७ रोजीच्या स्थायी समिती सभेच्या ठराव क्रमांक ७० नुसार शिफारस करण्यात आली आहे. तसेच या अनुषंगाने कक्ष अधिकारी, ग्रामविकास विभाग, महाराष्ट्र शासन यांना सातारा जिल्हा परिषदेकडील पत्र. पं.ग्रा. ६(१)/सीआर/वशि/१२४९४/२०१८, दिनांक २४ सप्टेंबर, २०१८ ने सुधारित माहिती पाठविण्यात आली आहे.

**(४)** वरील त्रिशंकू भागापासून मिळणारे मुद्रांकशुल्क हे या त्रिशंकू भागामध्ये मूलभूत नागरी सोयी सुविधा पुरविण्यासाठी खर्च केले जाते.

वरीलप्रमाणे सातारा शहराला लागून नागरी वस्ती असणारा मौजे गोडोली, कंरजे व सातारा त्रिशंकू भाग सातारा नगरपरिषद हद्दवाढीच्या दिनांक २२ मार्च, २०१७ च्या उद्घोषणेमध्ये समाविष्ट करण्यात आला असल्याने अंतिम अधिसूचना प्रसिद्ध झाल्यानंतर या त्रिशंकू भागामध्ये नगरपरिषद, साताराकडून मूलभूत नागरी सोयी सुविधा पुरविल्या जातील.

## मंत्रालयीन विभागाचा अभिप्राय

**नगरविकास विभागाचे अभिप्राय.—**सातारा नगरपरिषदेने पेठ केसरकर चारभिंत रोड लगत असलेल्या कोल्हाटी वस्ती त्रिशंकू भागात पिण्याच्या पाण्याची सोय, रस्त्यालगत संरक्षक भिंत, नागरिकांसाठी चार सीट सार्वजनिक शौचालय, मुख्य रस्त्यास गटार डोंगरावरील नागरिकांसाठी पायऱ्या तसेच दिवाबत्तीची सोय नगरपरिषदेने केलेली आहे. या सर्व कामांसाठी नगर परिषदेने अंदाजित ५० लक्ष इतका खर्च केलेला आहे तसेच गोडोली येथील भाग हा त्रिशंकू भाग असून त्या त्रिशंकू भागातील निघणारा घनकचरा नगरपरिषदेकडून गोळा करून नगरपरिषदेच्या मालकीच्या कचरा डेपोवर टाकला जातो. सातारा नगरपरिषदेची हद्दवाढ प्रस्तावित असून हद्दवाढीबाबत प्राथमिक अधिसूचना निर्गमित झाली आहे. यामध्ये वरील भाग नगरपरिषद हद्दीत समाविष्ट करण्यात आला आहे.

**ग्रामविकास विभागाचे अभिप्राय.—**सातारा नगरपरिषदेची हद्दवाढ प्रस्तावित असून हद्दवाढीबाबत प्राथमिक अधिसूचना निर्गमित झाली असून तद्नुषंगाने जिल्हा परिषद साताराकडून अहवाल प्राप्त झाला आहे. सदर प्रकरणी नगरविकास विभागाच्या सल्ल्यानुसार पुढील कार्यवाही करण्याचे प्रस्तावित आहे.

## विभागीय सचिवांची साक्ष

पंचायती राज समितीने सातारा जिल्हा परिषदेला दिलेल्या भेटीच्या वेळी प्राप्त झालेल्या माहितीच्या आधारे उपरोक्त मुद्यावर अधिक माहिती घेण्यासाठी दिनांक १६ जानेवारी, २०१९ रोजी विभागीय सचिवांच्या घेतलेल्या साक्षी दरम्यान समितीने विचारणा केली की, सातारा शहरालगत नागरी वस्ती चारही बाजूने वाढत असून ती नगरपालिकेमध्ये येत नाही व ग्रामपंचायतीमध्ये येत नाही. या त्रिशंकू भागाचा जिल्हा परिषदेकडून महसूल गोळा केला जातो व जमा झालेली रक्कम विकासाकरिता दिली जाते. उक्त रक्कम पुरेशी होत नसल्याने त्या भागामध्ये मूलभूत नागरी सोयी-सुविधा मिळण्यासाठी महसूल, नगरविकास व ग्रामविकास विभाग यांनी एकत्रितरित्या कोणता धोरणात्मक निर्णय घेतला आहे, यावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी समितीस विशद केले की, उक्त त्रिशंकू भागामधून प्राप्त जमा झालेल्या मुद्रांक शुल्काचा निधी त्या भागाच्या विकासासाठी खर्च केला आहे. उक्त भाग नगरपालिकेच्या हद्दीमध्ये समाविष्ट करण्याकरिता शासनाने अधिसूचना प्रसिद्ध केली आहे. उक्त प्रकरणी जिल्हा परिषदेने सर्वसाधारण सभेचे आवश्यक ठराव सादर केले आहेत. शासनाने अंतिम अधिसूचना काढल्यानंतर उक्त भागाचा समावेश नगरपालिकेच्या हद्दीमध्ये होईल. पुढे प्रधान सचिव, ग्रामविकास विभाग यांनी समितीस माहिती विशद केली की, सदरहू प्रकरणीची शासन स्तरावरील कार्यवाही १ ते २ महिन्यांमध्ये पूर्ण होईल.

तद्नंतर समितीने विचारणा केली की, सदरहू त्रिशंकू भागातील एन.ए.आदेश नगर रचनाकार यांच्या ना हरकती शिवाय देण्यात आले आहेत. त्यामुळे त्या भागातील बांधकामांना अडचणी येणार आहे. सदरहू भागाचा एन.ए. झालेला नसल्यामुळे तेथे बांधकाम करण्यासाठी परवानगी देणे शक्य होणार नाही. त्या भागामध्ये सुरू असलेली सर्व बांधकामे अनधिकृत आहेत. गावठाण क्षेत्राच्या बाहेर बांधकाम करण्याची परवानगी देण्याचे सर्व अधिकार जिल्हाधिकारी यांना देण्यात आले आहेत. यावर प्रधान सचिव, ग्रामविकास विभाग यांनी समितीस विशद केले की, सदरहू भाग ग्रामपंचायतीमध्ये नाही व नगरपालिकेमध्ये समाविष्ट नाही. उक्त भाग नगरपालिकेमध्ये समाविष्ट करण्यासाठी अधिसूचना प्रसिद्ध केल्यानंतर उक्त भागाचा विकास आराखडा तयार करावा लागणार आहे. प्रत्येक मूळ भागाचा आर.पी. तयार करण्यात आला आहे. राज्यातील प्रत्येक भाग आर.पी.अंतर्गत आहे. ९९ टक्के आर.पी.क्षेत्राचा स्वीकार करावा लागणार आहे. त्यानंतर उक्त ठिकाण त्रिशंकू असल्याने ग्रामपंचायतीने त्या भागातील बांधकामांना परवानगी दिलेली नाही. मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी सांगितले आहे की, गावठाणाबाहेरील क्षेत्रावरील बांधकामांना जिल्हाधिकारी परवानगी देऊ शकतील. यावर समितीने विचारणा केली की, गावठाण क्षेत्राबाहेर बांधकाम करण्यासाठी परवानगी देण्याचे अधिकार जिल्हाधिकारी यांना आहेत परंतु एकही प्रकरण निकषपात्र नाही. कारण तेथे सर्व बांधकामे अनधिकृतपणे सुरू आहेत, त्यांना नगर रचनाकार यांनी बांधकाम करण्यास ना-हरकत दिलेली नाही. सदरहू भागातील खरेदी-विक्री व्यवहार ग्रामपंचायतीमधील सचिव यांच्या नकाशावर सही व शिक्का घेऊन झालेले आहेत. त्या भागातील कोणत्याही बांधकामास परवानगी देता येणार नाही.

यावर प्रधान सचिव, ग्रामविकास विभाग यांनी समितीस विशद केले की, सदरहू भाग १०० टक्के पुढील १ ते २ महिन्यांमध्ये नगरपालिकेमध्ये येणार आहे. यावर समितीने विचारणा केली की, ज्या जमिनी अकृषिक आहेत त्यावर घरे बांधण्यास जिल्हाधिकारी परवानगी देऊ शकत नाहीत.

त्यामुळे प्रशासनास अडचणी उद्‌भवणार आहेत. सदरहू भाग शहरीभागामध्ये समाविष्ट होईल परंतु गावठाण बाहेरील अधिक गावांचा समावेश शहरामध्ये करावयाचा नाही. त्यांच्या संदर्भात निर्णय देणे आवश्यक आहे. जिल्हाधिकारी त्यांना बांधकाम करण्यास परवानगी देत नाही कारण कोणत्याही एन.ए. झालेल्या प्लॉटला नगर रचनाकार यांनी ना हरकत दिलेले नाही. सदरहू ठिकाणी बांधकाम परवानगी देण्याकरिता जिल्हाधिकारी यांचेकडून नगर रचनाकार यांच्या ना हरकतीची मागणी करण्यात येते. नगर रचनाकार कार्यालय सदरहू प्रकरणी ना-हरकत देऊ शकत नाही कारण त्यांच्या निकषानुसार प्लॉट पाडण्यात आले नाही. पुढे समितीने निदेश दिले की, सदरहू विषय किचकट आहे, सन्मानीय सदस्य यांनी उपस्थित केलेला तांत्रिक मुद्दा योग्य आहे. गावठाणाबाहेरील प्लॉटला नगर रचनाकार कार्यालयाने ना हरकत दिलेली नाही. उक्त प्लॉटवर बांधकाम करण्याची परवानगी देण्याची मागणी केल्यास जिल्हाधिकारी संबंधितांकडून नगर रचनाकार कार्यालयाच्या ना हरकतीची मागणी करतात. सदरहू विषय केवळ सातारा जिल्ह्याचा नसून संपूर्ण राज्याचा आहे. उक्त प्रकरणी सर्व संबंधित विभागाच्या प्रधान सचिव यांनी एकत्र बसून चर्चा करावी व धोरणात्मक निर्णय घ्यावा.

## अभिप्राय व शिफारशी

पंचायती राज समितीने दिनांक ११ ते १३ एप्रिल, २०१८ या कालावधीत सातारा जिल्हा परिषदेला भेट दिली असता सन २०१३-२०१४ या वर्षाच्या वार्षिक प्रशासन अहवालावरील चर्चेदरम्यान सातारा जिल्हा परिषदेकडून प्राप्त झालेल्या लेखी माहितीच्या आधारे सातारा जिल्ह्यातील लोक प्रतिनिधी व जिल्हा परिषदेच्या पदाधिकाऱ्यासमवेत केलेल्या अनौपचारिक चर्चेच्यावेळी समितीच्या असे निदर्शनास आले की, सातारा शहराला लागून नागरी वस्ती चारही बाजूने वाढत आहे. ही नागरी वस्ती नगरपालिकेमध्येही येत नाही व शहराच्या बाजूला असलेल्या ग्रामपंचायतीमध्येही येत नाही म्हणजेच गाव आणि नगरपालिका यांच्यामध्ये समूहाने वाढलेली वसाहत म्हणजे त्रिशंकू होय. शहराला लागून चारही बाजूने विकास होत असतो. शहरालगतची ग्रामपंचायत आणि नगरपालिकेची हद्द यांच्या मध्ये समुदायाने वाढलेल्या वस्त्या त्रिशंकूमध्ये येतात. ग्रामपंचायतीने गावठाणची हद्द ठरवून दिलेली आहे. त्या हद्दीच्या बाहेर व नगरपालिकेच्या हद्दीच्या बाहेर म्हणजेच गावठाणच्या व नगरपालिकेच्या हद्दीमध्ये नसलेले बहुतांश प्लॉट अकृषीक (एन.ए.) करण्यात आलेले आहेत. परंतु त्यांची ग्रामपंचायत किंवा नगरपालिकेमध्ये नोंद नाही. त्यांना आवश्यक त्या सोयीसुविधा पुरविण्यात याव्यात अशी मागणी होत आहे. त्याठिकाणी विजेची व्यवस्था करणे, पाण्याची व्यवस्था करणे, रस्ते, नाले इत्यादी कामे करणे आवश्यक आहे. जिल्हा परिषदेकडून त्रिशंकूचा महसूल गोळा केला जातो व महसुली पोटी जमा झालेली रक्कम विकास कामाकरिता दिली जाते परंतु ही रक्कम पुरेशी होत नाही. त्यामुळे या भागाचा समावेश लगतच्या ग्रामपंचायतीमध्ये किंवा नगरपालिकेमध्ये केला तर त्या भागाला आवश्यक त्या सोयी सुविधा मिळू शकतील. यासंदर्भात सातारा जिल्ह्यातील त्रिशंकूची यादी घेण्यात यावी व जिल्हाधिकारी आणि विभागीय आयुक्त यांनी त्रिशंकू भागाचा प्रश्न मार्गी लावावा अशी समितीची सूचना आहे.

सातारा शहरालगत त्रिशंकू भागाला मूलभूत नागरी सोयी सुविधा मिळण्यासाठी महसूल, नगरविकास व ग्रामविकास विभाग यांनी एकत्रितरित्या धोरणात्मक निर्णय घेणे अभिप्रेत आहे. त्यानुषंगाने त्रिशंकू भाग नगरपालिकेच्या हद्दीमध्ये समाविष्ट करण्याकरिता शासनाने अधिसूचना प्रसिद्ध केली आहे. तथापि, सदर प्रकरणाची शासनस्तरावरील पुढील कार्यवाही उदाहरणार्थ विकास आराखडा तयार करून मान्यता घेणे अद्यापपर्यंत अपूर्ण आहे. तसेच त्रिशंकू भागातील ज्या जमिनी अकृषिक आहेत त्यावर घरे बांधण्यास जिल्हाधिकारी परवानगी देऊ शकत नाहीत, सदरहू भाग शहरी भागामध्ये समाविष्ट होईल परंतु गावठाण बाहेरील अधिक गावांचा समावेश शहरामध्ये करावयाचा नाही. त्यासंदर्भात निर्णय देणे आवश्यक आहे कारण कोणत्याही अकृषिक (एन.ए).प्लॉटला नगर रचानाकार यांनी ना-हरकत दिलेली नाही. बांधकाम परवानगीसाठी जिल्हाधिकारी यांचेकडून नगर रचनाकार यांच्या ना-हरकतीची मागणी करण्यात येते. नगर रचनाकार कार्यालय सदरहू प्रकरणी ना-हरकत देऊ शकत नाही कारण त्यांच्या निकषानुसार भूखंड अधोरेखित करण्यात आलेले नाही, असे तांत्रिक मुद्दे उपस्थित झालेले आहेत. **सदरहू त्रिशंकू भागाचा विषय केवळ सातारा जिल्ह्यापुरताच मर्यादित नसून संपूर्ण राज्याचा आहे. त्यामुळे त्रिशंकू भागाचा विकास करण्याकरिता अंतिम अधिसूचना प्रसिद्ध करण्यात यावी व अंतिम अधिसूचना काढल्यानंतर त्रिशंकू भागाच्या समावेशाबाबतची पुढील आवश्यक ती कार्यवाही पूर्ण करण्यात यावी, अशी समिती शिफारस करीत आहे व याप्रकरणी केलेल्या कार्यवाहीचा अहवाल समितीला दोन महिन्यांच्या आत सादर करण्यात यावा.**

प्रकरण दोन

## जिल्हा परिषद, सातारा (प्रशासन)

## सन २०१२-१३ मधील विभागीय आयुक्त कार्यालयामार्फत जिल्हा परिषदेच्या वार्षिक तपासणीबाबत

पंचायती राज समितीने दिनांक ११ ते १३ एप्रिल, २०१८ या कालावधीत सातारा जिल्हा परिषदेस भेट दिली असता सन २०१३-१४ या वर्षाच्या वार्षिक प्रशासन अहवालावरील चर्चेदरम्यान सातारा जिल्हा परिषदेकडून प्राप्त झालेल्या लेखी माहितीच्या आधारे समितीने अशी विचारणा केली की, विभागीय आयुक्त कार्यालयाकडून ७६ मुद्यांची योग्य तपासणी केली जात नाही असे समितीच्या निदर्शनास आले असून, १ ते ७६ मुद्यांची यादी पहिल्या प्रथम समितीच्या अवलोकनार्थ सादर करावी, अशी समितीची सूचना आहे. व्हॉवचर टू व्हॉवचरची तपासणी करणे असे अभिप्रेत नाही. १ ते ७६ मुद्यांमध्ये लेखासंहितेच्या पालनाचा मुद्दा आहे. जिल्हा नियोजन समितीकडून आलेला पैसा मुख्य लेखा व वित्त अधिकारी यांच्या खात्यामध्ये जमा न करता मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्या खात्यामध्ये जमा केला असून, ही बाब आपल्या निदर्शनास का आली नाही. तसेच महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखासंहिता, १९६८ द्वारे विहित केलेला वस्तुसंग्रह, ग्रंथालय, नोंदवह्या योग्य पद्धतीने ठेवल्या जातात काय, नियमित तपासणी होते काय, ठेवण्यात आलेल्या नोंदवह्यांची यादी देण्यात यावी. परंतु, नोंदवह्या ठेवण्यात आलेल्या नाहीत. यावर उप आयुक्त (आस्थापना), विभागीय आयुक्त कार्यालय, पुणे यांनी समितीस विशद केले की, लेखा विभागातील संकिर्ण नोंदवहीची तपासणी केली जाते. विभागीय कार्यालयात एक सहायक आयुक्त आणि एकच लिपिक आहे.

यावर समितीने विचारणा केली की, मनुष्यबळ कमी आहे, असे कारण समितीला सांगणे योग्य नाही. समितीची दिशाभूल करण्यात येत आहे. विभागीय आयुक्त कार्यालयाने तपासणी केली नाही, असा आक्षेप आहे. यावर उप आयुक्त (आस्थापना), विभागीय आयुक्त कार्यालय, पुणे यांनी समितीस विशद केले की, यापुढे दक्षता घेतली जाणार आहे.

तद्‌नंतर समितीने विचारणा केली की, विभागीय आयुक्त कार्यालयातील महसूल सचिवांकडून नियमितपणे तपासणी केली जात नाही. तपासणी केली तर ती असमाधानकारक केली जाते. तसेच अभिलेखे न दाखविल्यामुळे सदर प्रकरणी समितीने निर्णय द्यावा. यावर मुख्य कार्यकारी अधिकारी, यांनी समितीस विशद केले की, सदरहू कामे सर्व शिक्षा अभियानांतर्गत करण्यात आलेली आहे. जिल्हा नियोजन समितीकडून जिल्हा परिषदेला निधी प्राप्त झाला. त्यानंतर जिल्हा परिषदेने सदरहू निधी पंचायत समितीला दिलेला आहे. त्यानंतर पंचायत समितीने शाळा व्यवस्थापन समितीला निधी दिलेला आहे. सदरहू निधी मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्या बँक खात्यात जमा झालेला नाही. यावर समितीने विचारणा केली की, सदरहू निधी कोणत्या विभाग प्रमुखांच्या नावे आला होता, शिक्षण अधिकाऱ्यांनी शिक्षण समितीची मंजुरी घेतली होती काय, यावर शिक्षणाधिकारी (प्राथमिक) यांनी समितीस विशद केले की, शिक्षण अधिकाऱ्यांनी शिक्षण समितीची मंजुरी घेतली नव्हती.

तद्‌नंतर समितीने निदेश दिले की, लेखापरिक्षकांना अभिलेखे न दाखविल्यामुळे आक्षेप आलेला आहे. सदरहू परिच्छेदाच्या अनुषंगाने मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी जनहित याचिकेचा उल्लेख केलेला आहे. ५ टक्के तपासणी ही कार्यकारी अभियंता यांनी करणे अभिप्रेत होते. परंतु, अशी कोणतीही कार्यवाही न करता पैशांची उचल केलेली आहे. सदरहू परिच्छेदाच्या अनुषंगाने अभिलेखे दाखविण्यात आले नाहीत. मुख्य लेखा व वित्त अधिकारी आणि शिक्षण अधिकारी यांच्यामध्ये कोणताही समन्वय नसल्याचे दिसून येत आहे. आयुक्त कार्यालयाने ७७ मुद्यांची तपासणी केलेली नाही. आयुक्त कार्यालयाने दिरंगाई केल्याचे दिसून येत आहे. जिल्हा परिषदेतील सर्वसाधारण सभेची मान्यता घेण्यात आलेली नाही. मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी सदरहू मुद्यांच्या अनुषंगाने एक महिन्याच्या आत सखोल तपासणी करून त्यासंदर्भातील चौकशी अहवाल समितीला सादर करावा, अशी समितीची सूचना आहे. यामध्ये अनियमितता झाल्याचे दिसून येत आहे. सदरहू परिच्छेदाच्या अनुषंगाने संबंधित अधिकाऱ्यांवर जबाबदारी निश्चित करण्यात यावी. महाराष्ट्र स्थानिक निधी लेखा अधिनियम, १९३० च्या कलम ७ अन्वये संबंधितांकडून २५ हजार रुपयांचा दंड वसूल करावा. यामध्ये संबंधितांची एक वेतनवाढ रोखणे आणि सेवापुस्तिकेत तशा प्रकारची नोंद घेण्यात यावी. लेखापरिक्षकांनी आक्षेप काढल्यानंतर आयुक्तांमार्फत सखोल तपासणी करण्याची आवश्यकता होती. परंतु, आयुक्त कार्यालयाने सखोल तपासणी केलेली नाही. त्यामुळे आयुक्त कार्यालयाने दिरंगाई केल्याचे सकृतदर्शनी दिसून येत आहे.

**उपरोक्त माहितीच्या संदर्भात अधिक माहिती जाणून घेण्यासाठी समितीने खालील मुद्यांबाबत विभागाकडून माहिती मागविली**

सन २०१२-१३ मधील जिल्हा परिषदेची वार्षिक तपासणी विभागीय आयुक्त कार्यालयामार्फत दिनांक २९ सप्टेंबर, २०१३ ते दिनांक ९ ऑक्टोंबर, २०१३ दरम्यान झालेली आहे, त्यामध्ये १ ते ७६ मुद्दयांची तपासणी करताना आयुक्त कार्यालयाने दिरंगाई केल्याचे दिसून येते, प्रस्तुत प्रकरणी मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी सदरहू मुद्दयांच्या अनुषंगाने सखोल तपासणी करून त्यासंदर्भातील चौकशी अहवाल सादर करावा तसेच महाराष्ट्र स्थानिक निधी लेखा अधिनियम, १९३० च्या कलम ७ अन्वये केलेल्या दंडात्मक व प्रशासकीय कारवाईचा अहवाल समितीस सादर करण्यात यावा.

**उपरोक्त मुद्यांसंदर्भात जिल्हा परिषदेकडून समितीस खालीलप्रमाणे लेखी माहिती प्राप्त झाली.**

सहकार व ग्रामीण विकास विभाग सचिवालय, मुंबई शासन पत्र क्र.डी.सी.डी.६०६२/ ५३९०-एन, दिनांक १५ एप्रिल, १९६४ व ग्रामविकास विभाग शासन परिपत्रक क्र.आयएनएस- १०७४/२७७७३/न, दिनांक २ ऑक्टोबर, १९७४ नुसार विभागीय आयुक्त यांचे कार्यालयामार्फत जिल्हा परिषदेची वार्षिक तपासणी करणेबाबत निर्देश आहेत. त्यानुसार १-७६ मुद्यांची तपासणी करण्यात येते. सन २०१२-१३ ची वार्षिक तपासणी केली असता १६९ इतके आक्षेप अनुपालनासाठी दिलेले असून त्यापैकी सर्व १६९ आक्षेपांचे अनुपालन करण्यात आलेले आहे. सद्य:स्थितीत मा.विभागीय आयुक्त पुणे विभाग, पुणे यांनी केलेल्या तपासणी संदर्भातील अनुपालनासाठीची प्रलंबित असलेल्या आक्षेपांची संख्या खालीलप्रमाणे आहे.

| **अ. क्र.** | **सन** | **मुद्दे संख्या** | **अनुपालन केलेल्या मुद्याची संख्या** | **अनुपालना अभावी प्रलंबित संख्या** |
|---|---|---|---|---|
| १ | १२-१३ | १६९ | १६९ | - |
| २ | १३-१४ | १७४ | १६९ | ५ |
| ३ | १४-१५ | १८० | १७७ | ३ |
| ४ | १५-१६ | १८२ | १६८ | १४ |
| ५ | १६-१७ | १८३ | १०८ | ७५ |

सदर प्रलंबित आक्षेपाचे निराकरण करण्याची कार्यवाही सुरू आहे.

(२) मा.समिती प्रमुख, पंचायती राज समिती यांनी दिनांक ११ एप्रिल, २०१८ रोजी जिल्हा परिषद बैठकी दरम्यान लेखा परीक्षा पुर्नविलोकन अहवालातील परिच्छेद क्र.३.११४/७/शिक्षण संदर्भात दिलेल्या आदेशानुसार याप्रकरणी लेखा परिक्षणास सादर न केल्याबाबत श्री. विठ्ठल शेलार कनिष्ठ सहायक यांना दिनांक ४ एप्रिल, २०१८ रोजी कारणे दाखवा नोटीस बजावण्यात आली होती. त्यावर श्री. शेलार यांनी सादर केलेला खुलासा समर्पक नसल्याने तो अमान्य करण्यात आल्यामुळे श्री. शेलार यांनी महाराष्ट्र स्थानिक निधी लेखा अधिनियम, १९३० च्या कलम ७ नुसार रू.२५,००० दंड दिनांक १७ सप्टेंबर, २०१८ रोजी स्टेट बँक ऑफ इंडिया शाखा, सातारा येथे चलनाने स्वत:हून जमा केलेला आहे. तसेच त्यांच्याकडील कामकाजातील गैरवर्तणुकीबाबत आरोप कायम करून त्यांची जिल्हा परिषद सेवा शिस्त व अपील नियम, १९६४ पोट नियम ६(२) मधील तरतुदीनुसार दिनांक ५ डिसेंबर, २०१८ नुसार विभागीय चौकशी प्रस्तावित केली आहे.

त्याचप्रमाणे मा.आयुक्त कार्यालयाने सन २०१२-१३ तपासणी करून देखील जिल्हा नियोजन विकास समितीकडून प्राप्त झालेला सर्व शिक्षा अभियानाचा निधी, मुख्य लेखा व वित्त अधिकारी यांच्या खात्यात जमा न करता मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्या खात्यामध्ये जमा करण्यात आल्याच्या बाबीच्या अनुषंगाने नमुद करण्यात येते की, मा.जिल्हाधिकारी सातारा यांचेकडील दिनांक २८ मार्च, २०१२ च्या आदेशान्वये प्राप्त झालेला निधी मुख्य लेखा व वित्त अधिकारी यांचे खाते क्र.डी.पी.डी.सी. १०४६००७००००१९ या खात्यावर जमा झाल्यानंतरच वित्तप्रेषणाद्वारे दिनांक ८ मे, २०१२ अन्वये सदरचा निधी सर्व गटविकास अधिकारी यांचे खात्यावर वर्ग करण्यात येऊन संबधित शाळा व्यवस्थापन समितीच्या बँक खात्यावर रक्कम वर्ग करण्यात आलेली आहे. या निधीतून करण्यात आलेली कामे सर्व शिक्षा अभियानातील कर्मचाऱ्याच्या देखरेखीखाली करण्यात आलेली आहेत.

## विभागीय आयुक्त कार्यालय, पुणे यांचे अभिप्राय

विभागीय आयुक्त कार्यालय पुणे मार्फत जिल्हा परिषद साताराकडील सन २०१२-१३ ची वार्षिक तपासणी दिनांक २९ सप्टेंबर, २०१३ ते ९ ऑक्टोंबर, २०१३ या कालावधीमध्ये करण्यात आलेली होती. सदर तपासणी वेळी १ ते ७६ मुद्यांबाबत प्रशासकीय स्वरूपाची तपासणी झालेली आहे. लेखा परिक्षणाच्या धर्तीवर तपासणी करणे अभिप्रेत नसल्याने तशी तपासणी झालेली नाही.

यापुढे मा.पंचायती राज समितीच्या सुचनेप्रमाणे सखोल तपासणी करणेबाबत दक्षता घेण्यात येत आहे लेखा परिक्षणांस दप्तर उपलब्ध करून न देणाऱ्या कर्मचाऱ्यांवर दंडात्मक कारवाई करण्यास मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद सातारा यांच्या प्रस्तावास मान्यता देण्यात आलेली आहे.

## मंत्रालयीन विभागाचे अभिप्राय

**ग्राम विकास विभागाचे अभिप्राय.—**सद्य:स्थितीत विभागीय आयुक्त पुणे कार्यालयाकडून जिल्हा परिषद साताराची तपासणी करताना एकूण १७८ मुद्यांची तपासणी करण्यात येत आहे. तपासणी सुचीतील मुद्दा क्र.१५८ हा स्थानिक निधी लेखा परिक्षण पंचायती राज समिती व महालेखापाल प्रलंबित परिच्छेदांची माहिती अशी आहे. यामध्ये जिल्हा परिषदांचे लेखा परिक्षण करणे अभिप्रेत नसून स्थानिक निधी लेखा परिक्षकांनी काढलेल्या आक्षेपांची माहिती घेऊन आक्षेपांचे निराकरण करण्यासाठी आवश्यक ते निदेश दिले जातात.

महाराष्ट्र जिल्हा परिषदा व पंचायत समित्या अधिनियम, १९६१ च्या कलम २६४ नुसार प्रशासकीय निरीक्षण करताना जिल्हा परिषदांच्या कामकाजाच्या अनुषंगाने अभिलेखे/ दस्तावेज व नोंदवह्या यांचे निरीक्षण टिप्पणी करण्यात येते व त्यानुषंगाने संबंधित जिल्हा परिषदासंदर्भातील अहवाल वाचन (memo reading) करण्यात येते.

मा.पंचायती राज समिती समोर दिनांक २८ ऑगस्ट, २०१८ रोजी विभागीय आयुक्तांच्या झालेल्या साक्षीच्यावेळी पंचायती राज समितीने निदेशित केल्याच्या अनुषंगाने विभागीय आयुक्तांच्या कार्यालयात आवश्यक असणाऱ्या पदांचा आढावा तसेच आक्षेपांचे निराकरण करण्यासंदर्भाने उपाययोजना सुचविण्यासाठी विभागीय आयुक्त, पुणे यांची एक सदस्यीय समिती नियुक्त करण्याची कार्यवाही करण्यात येत आहे.

## विभागीय सचिवांची साक्ष

पंचायती राज समितीने सातारा जिल्हा परिषदेला दिलेल्या भेटीच्या वेळी प्राप्त झालेल्या माहितीच्या आधारे उपरोक्त मुद्यावर अधिक माहिती घेण्यासाठी दिनांक १६ जानेवारी, २०१९ रोजी विभागीय सचिवांच्या घेतलेल्या साक्षी दरम्यान समितीने विचारणा केली की, सन २०१२-१३ मधील विभागीय आयुक्त कार्यालयामार्फत जिल्हा परिषदेच्या वार्षिक तपासणीबाबत केलेल्या चौकशीमध्ये काय निष्पन्न झाले आहे, यावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी समितीस विशद केले की, आयुक्त कार्यालयाचे प्रतिनिधी आजच्या बैठकीस उपस्थित आहेत. सदरहू तपासण्या कशा पद्धतीने केल्या पाहिजेत याबाबत आयुक्त महोदयांशी चर्चा करण्यात आली आहे. आयुक्त कार्यालयाचे प्रतिनिधी माहिती देतील की, तपासणी परिणामकारक होण्यासाठी काय करण्यात येईल. लेखा परिक्षणाच्या वेळी कागदपत्र उपलब्ध करून न देणे संदर्भात संबंधित लिपीक श्री. प्रमोद शेलार यांना नोटीस दिली असून त्यांनी दंडाची रक्कम जमा केली आहे. गैरवर्तन प्रकरणी आरोपपत्र दिले आहे.

यावर समितीने विचारणा केली की, सदरहू प्रकरणी ज्या दिवशी जबाबदारी पार पाडली नाही त्याच दिवशी त्या विभागाच्या खाते प्रमुखांनी संबंधितांवर कारवाई केली पाहिजे होती. समितीसमोर हा मुद्दा आल्यामुळे आपण आता संबंधितावर कारवाई केली आहे. सदरहू कर्मचारी यांनी चांगले काम केले म्हणून त्यास त्या दिवशीचे वेतन अदा करण्यात आले. त्याने काम केले नसेल तर त्याचे त्या दिवसाचे वेतन कपात का केले नाही, लेखा परिक्षणासाठी कागदपत्रे दाखवली नाही म्हणून संबंधितावर त्यावेळी कारवाई का केली नाही, त्यास त्यावेळी खाते प्रमुखांनी नोटीस दिली होती का यापूर्वी देखील समितीने उक्त प्रकरणी सूचना दिली होती. सदरहू कर्मचारी यांनी त्यावेळी काम न केल्यामुळे त्याच्यावर त्यावेळी कारवाई करता येणे शक्य होते. आता समितीला खुलासा सादर केला आहे. हा प्रश्न संपूर्ण राज्यामध्ये वारंवार समोर येत आहे. उक्त प्रकरणी कठोर कारवाई करण्याची आवश्यकता आहे. नियमांची अंमलबजावणी करण्यात येत नाही. तसेच दंडात्मक कारवाई करण्यासाठी किती प्रकरणे आयुक्तालयास सादर करण्यात आली आहेत, यावर उप आयुक्त (आस्थापना), विभागीय आयुक्त कार्यालय, पुणे यांनी समितीस विशद केले की, सातारा जिल्ह्यातील ४१ प्रकरणे प्रस्तावित होते त्या सर्व प्रकरणी दंडात्मक कारवाईस मंजूरी देण्यात आली आहे. यामध्ये ग्रामसेवक, कनिष्ठ लिपीक, कनिष्ठ अभियंता व इतर कर्मचारी यांचा समावेश आहे. यावर समितीने विचारणा केली की, उक्त कर्मचारी यांचे खाते प्रमुख यांनी त्यावेळी कोणती कार्यवाही केली, कनिष्ठ सहायक, कनिष्ठ अभियंता हे संरक्षक (कस्टोडीयन) आहेत काय, सदरहू बाब समितीसमोर आली असल्याने उक्त प्रकरणी मुख्य कार्यकारी अधिकारी हेच जबाबदार आहेत. खाते प्रमुखांच्या कामाचा आढावा मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी घ्यावयाचा असतो. खालील स्तरावरील अधिकाऱ्यांवर कारवाई करण्यात येते. यावर प्रधान सचिव, ग्रामविकास विभाग यांनी समितीस विशद केले की, सदरहू चूक अभिलेखे संरक्षक (रेकॉर्ड कस्टोडीयन) असलेल्या व्यक्तीची आहे.

समितीने विचारणा केली की, खालील स्तरावरील कर्मचारी यांचे खाते प्रमुख यांनी लेखा परिक्षणास कागदपत्रे न दाखविल्याबाबत त्या दिवसाचे वेतन कपात करण्याबाबतची नोटीस दिली होती का, सन २०१३-१४ मधील लेखा आक्षेपावर चर्चा करीत आहोत. उक्त वर्षामध्ये सदरहू कर्मचारी यांच्या गोपनीय अहवालात त्यांचे समाधानकारक कामकाज असल्याची नोंद खाते प्रमुखांनी केली आहे. त्यावेळी ए+ किंवा बी+ शेरा दिला असेल. उक्त प्रकरणी सदरहू कर्मचारी यांच्यावर कारवाई केलेली असल्याने त्यावेळचा त्याचा गोपनीय अहवाल वजा करण्यात येईल काय, उक्त प्रकरणी सदरहू कर्मचारी यांचेकडून २५ हजार रुपये दंड वसूल करता येईल परंतु त्याच्या त्यावेळच्या गोपनीय अहवालामध्ये बदल कसा करणार, त्यावेळी त्याचा गोपनीय अहवाल खाते प्रमुख यांनी चांगला लिहिला आहे, सदर मांडलेला मुद्दा कायदेशीर आहे. सदरहू कर्मचारी यांनी

पंचायती राज समितीकडे तक्रार दाखल केल्यास समिती आपणास विचारु शकते. कारण त्या कर्मचाऱ्याचा त्यावर्षीचा गोपनीय अहवाल चांगला आहे. त्याचे गोपनीय अहवाल ज्यांनी लिहिले त्यांच्याकडून दंडाची रक्कम वसूल केली पाहिजे. कायद्याच्या चाकोरीमध्ये सर्व कार्यवाही झाली पाहिजे. सदरहू प्रक्रिया क्लिष्ट आहे व मोठी आहे. अधिकारी व कर्मचारी यांना शिस्त लावण्याकरिता एक प्लॅन तयार करावा व त्यानुसार कारवाई करावी.

**अभिप्राय व शिफारशी**

सन २०१३-२०१४ या वर्षाच्या वार्षिक प्रशासन अहवालावरील चर्चेदरम्यान सातारा जिल्हा परिषदेकडून प्राप्त झालेल्या लेखी माहितीच्या आधारे घेण्यात आलेल्या साक्षीदरम्यान समितीच्या निदर्शनास आले की, विभागीय आयुक्त कार्यालयाकडून जिल्हा परिषदेच्या १ ते ७६ मुद्यांची योग्य तपासणी केली जात नाही. १ ते ७६ मुद्यांमध्ये लेखासंहितेच्या पालनाचा मुद्दा असून जिल्हा नियोजन समितीकडून आलेला निधी मुख्य लेखा व वित्त अधिकारी यांच्या खात्यामध्ये जमा न करता मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्या खात्यामध्ये जमा करण्यात आल्याची बाब विभागीय आयुक्त कार्यालयाच्या निदर्शनास आली नाही. तसेच, महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखा संहिता, १९६८ द्वारे विहीत केलेला वस्तुसंग्रह, ग्रंथालय, नोंदवह्यांची तपासणी नियमितपणे होत असल्याची नोंदवह्यांची यादी ठेवण्यात आलेली नाही. लेखा विभागातील संकिर्ण नोंदवहीची तपासणी करण्यासाठी विभागीय आयुक्त कार्यालयामध्ये एक सहायक आयुक्त आणि एक लिपिक असल्यामुळे मनुष्यबळ कमी आहे हे कारण संयुक्तिक नाही. कारण ही एक प्रकारे समितीची दिशाभूल आहे. त्यामुळे समिती याप्रकरणी तीव्र नापसंती व्यक्त करीत आहे. या प्रकरणी संबंधीतांवर जबाबदारी निश्चित करणे आवश्यक असून यापुढील काळात अशा प्रकारच्या त्रुटी राहू नये या दृष्टीने संबंधितांना आवश्यक त्या कडक स्वरूपाच्या सूचना निर्गमित कराव्यात अशी समितीची शिफारस आहे.

**तसेच शिक्षण अधिका-यांनी शिक्षण समितीची मंजुरी न घेता पंचायत समितीने शाळा व्यवस्थापन समितीला निधी दिलेला आहे, कार्यकारी अभियंता यांनी ५ टक्के कामाची तपासणी करणे अभिप्रेत असताना अशी कोणतीही कार्यवाही न करता पैशाची उचल केलेली आहे. सदरहू परिच्छेदाच्या अनुषंगाने सखोल चौकशी करण्यात यावी व चौकशी नुसार संबंधित अधिकाऱ्यांवर जबाबदारी निश्चित करण्यात यावी व त्यानुसार केलेल्या कार्यवाहीचा अहवाल समितीला एक महिन्याच्या आत सादर करण्यात यावा अशी समिती शिफारस करीत आहे.**

## प्रकरण तीन

## जिल्हा परिषद, सातारा (प्रशासन)

### पंचायत समिती जावली (मेढा) मागासवर्गीयांच्या उन्नतीसाठीच्या योजनेच्या पंचायत समितीच्या उत्पन्नाच्या खर्चाबाबत

पंचायती राज समितीने दिनांक ११ ते १३ एप्रिल, २०१८ या कालावधीत सातारा जिल्हा परिषदेस भेट दिली असता सन २०१३-१४ या वर्षाच्या प्रशासन अहवालावरील चर्चेदरम्यान सातारा जिल्हा परिषदेकडून प्राप्त झालेल्या लेखी माहितीच्या आधारे समितीने संबंधिताना निदेश दिले की, मागासवर्गीयांच्या उन्नतीसाठीच्या योजनेसाठी ठेवलेल्या पंचायत समितीच्या उत्पन्नाच्या २० टक्के रकमेतून खर्च केलेल्या रकमांच्या बाबतच्या माहितीची विचारणा केली असता तत्कालिन गट विकास अधिकारी श्री. मारकड यांनी समितीस उद्धटपणे माहिती दिली आहे. त्यांनी दिनांक १ एप्रिल ते ३१ मार्च या कालावधीसाठी मागासवर्गीयांच्या योजनांवरील निधी खर्च करण्याच्या वेळापत्रकाचे पालन केले नाही. सदरहू निधी प्राप्त झाल्यानंतर खर्च करण्याच्या धोरणामुळे तो अखर्चित राहिला. वास्तविक सदर निधी शासनाकडून दरवर्षीच्या नियोजनानुसार प्राप्त होतोच. सदरहू बाब गृहीत धरून खर्चाचे नियोजन करावयाचे असते. त्यानुसार खर्चाच्या अंदाजपत्रकाचे व वेळापत्रकाचे पालन करावयाचे असते. परंतु त्याचे पालन करण्यात आले नाही. पंचायत समितीने आर्थिक वर्षाच्या शेवटच्या दीड ते दोन महिन्यांच्या आचारसंहितेचे कारण पुढे करून मागासवर्गीयांच्या विकास योजनांना खीळ घातली. सदरहू प्रकरणी तत्कालिन गटविकास अधिकारी श्री. मारकड यांचेवर मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, सातारा यांनी दोषारोप सादर करून ते ज्या जिल्ह्यात कार्यरत असतील त्या जिल्ह्याच्या मुख्य कार्यकारी अधिकारी यांना एक महिन्याच्या आत कारवाईसह शिफारस करावी. सदरहू कार्यवाही दोन्हीही मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी एक महिन्यात पूर्ण करावी तसेच सदरहू प्रकरणी ग्रामविकास विभागाच्या सचिवांची साक्ष लावण्यात येत आहे. सदरहू प्रकरणी मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, सातारा यांनी हलगर्जीपणा केला तर त्यांच्यावर कारवाई करण्याची शिफारस उक्त साक्षीच्या वेळी करण्यात येईल.

**उपरोक्त माहितीच्या संदर्भात अधिक माहिती जाणून घेण्यासाठी समितीने खालील मुद्यांबाबत विभागाकडून माहिती मागविली.**

सन २०१२-१३ पंचायत समिती, जावली (मेढा) येथे मागासवर्गीयांच्या उन्नतीसाठी योजनेसाठी पंचायत समितीच्या उत्पन्नाच्या २० टक्के रक्कमेतून खर्च करणे आवश्यक असताना दिनांक १ एप्रिल ते ३१ मार्च या कालावधीसाठी मागासवर्गीयांच्या योजनेवरील निधी खर्च करण्याच्या वेळापत्रकाचे पालन न केल्याप्रकरणी तत्कालिन गटविकास अधिकारी यांच्यावर जबाबदारी निश्चित करून त्यांचेविरूद्ध कोणती कारवाई केली आहे ?

**उपरोक्त मुद्यांसंदर्भात जिल्हा परिषदेकडून समितीस खालीलप्रमाणे लेखी माहिती प्राप्त झाली.**

महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, पंचायती राज समिती यांनी दिलेल्या भेटीच्या संदर्भात विभागीय सचिवांच्या साक्षीसाठीची प्रश्नावलीमधील प्रश्न क्रमांक १५ मध्ये सन २०१२-१३ मधील परिच्छेद क्रमांक २०१२-१३ पृष्ठ क्रमांक सी-६८ या विषयाच्या अनुषंगाने प्रस्तुत प्रकरणाची गट विकास अधिकारी, पंचायत समिती, महाबळेश्वर यांचेमार्फत दिनांक २० डिसेंबर, २०१८ चौकशी केलेली असून अहवाल प्राप्त झालेला आहे. तत्कालिन गटविकास अधिकारी, पंचायत समिती जावली (मेढा) श्री. एस.ए.मारकड, सध्या कार्यरत उपमुख्य कार्यकारी अधिकारी (नरेगा) जिल्हा परिषद, उस्मानाबाद, यांना जा.क्र.साप्रवि/लेखा-२/१२१४/२०१८, दिनांक २१ डिसेंबर, २०१८ अन्वये कारणे दाखवा नोटीस देऊन खुलासा मागणी करण्यात आलेला आहे. त्यानुसार त्यांनी दिनांक २८ डिसेंबर, २०१८ अन्वये खुलासा सादर केलेला आहे.

ग्रामविकास व जलसंधारण विभाग शासन निर्णय क्रमांक मागास/१०९३/प्र.क्र.१२३९/३४ दिनांक १ सप्टेंबर, १९९३ नुसार खरेदी प्रक्रियेबाबतच्या वेळापत्रकाचे पालन केलेले नाही. सन २०१३-१४ मध्ये पंचायत समिती जावलीकडे रक्कम रुपये २९२ एवढी शिल्लक होती. तथापि, दिनांक २१ मार्च, २०१४ रोजी वाढीव उपकराची रक्कम रुपये ५५,६४,१५८ अनुदान प्राप्त झाले, त्यापैकी २० टक्के रक्कम रुपये ११,१२,८३२ असून रक्कम रुपये २७,००० प्रत्यक्ष मागासवर्गीयांच्या उन्नतीसाठी ९ सौर कंदीलाचे वाटप करण्यात आलेले आहे, रक्कम रुपये १०,८५,८३२ एवढी शिल्लक राहिली. सदर कालावधीत लोकसभा निवडणूक आचारसंहिता लागू झाल्याने सदरचा खर्च करता आलेला नाही, ही वस्तुस्थिती आहे. तथापि, शिल्लक अखर्चित निधी लगतच्या आर्थिक वर्षात खर्च झालेला आहे.

उपसचिव, महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन परिपत्रक क्रमांक झेपीए.२००८/प्र.क्र.४४६/वित्त-०९/मंत्रालय मुंबई दिनांक २० जून, २००८ **(परिशिष्ट ३.१)** मधील परिशिष्ट-ई च्या अनुक्रमांक ०५ ते ०९ या बाबीचे पालन विहित कालावधीत निधी उपलब्ध न झाल्याने वेळापत्रकाचे पालन करता आले नाही असा खुलासा श्री. एस.ए.मारकड, तत्कालिन गट विकास अधिकारी, पंचायत समिती जावली (मेढा) यांनी केला आहे. त्यांनी दिनांक २८ डिसेंबर, २०१८ रोजी सादर केलेला खुलासा वस्तुस्थितीस धरून असल्याचे विचारात घेता श्री. मारकड हे सकृतदर्शनी दोषी आढळून येत नाहीत. त्यामुळे त्यांच्याविरूद्ध कारवाई प्रस्तावित केली नाही. कृपया अनुपालन मान्य व्हावे ही विनंती.

## मंत्रालयीन विभागाचा अभिप्राय

**ग्रामविकास विभागाचे अभिप्राय.—**(वित्त-३) जिल्हा परिषदेने केलेल्या कार्यवाहीशी शासन सहमत आहे.

## विभागीय सचिवांची साक्ष

पंचायती राज समितीने सातारा जिल्हा परिषदेला दिलेल्या भेटीच्या वेळी प्राप्त झालेल्या माहितीच्या आधारे उपरोक्त मुद्यावर अधिक माहिती घेण्यासाठी दिनांक १६ जानेवारी, २०१९ रोजी विभागीय सचिवांच्या घेतलेल्या साक्षी दरम्यान समितीने विचारणा केली की, मागासवर्गीयांच्या योजनेसाठी पंचायत समितीच्या उत्पन्नाच्या २० टक्के रक्कमेतून खर्च करणे आवश्यक आहे. असे असताना दिनांक १ एप्रिल, ते ३१ मार्च, या कालावधीसाठी मागासवर्गीयाच्या योजनेवरील निधी खर्च करण्याच्या वेळापत्रकाचे पालन न केल्याप्रकरणी तत्कालीन अधिकाऱ्यांवर जबाबदारी निश्चित करून कोणती कारवाई केलेली आहे. तसेच समितीने सातारा जिल्हा परिषदेला केव्हा भेट दिली होती. यावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी समितीस विशद केले की, समितीने दिनांक ११, १२ आणि १३ एप्रिल, २०१८ रोजी सातारा जिल्हा परिषदेला भेट दिली होती.

समितीने विचारणा केली की, गटविकास अधिकारी, पंचायत समिती, महाबळेश्वर यांच्यामार्फत दिनांक २० डिसेंबर, २०१८ रोजी चौकशी केलेली असून अहवाल प्राप्त झालेला आहे. त्यानंतर आपण त्यांना २१ डिसेंबर, २०१८ रोजी नोटीस दिली. त्यानंतर दिनांक २८ डिसेंबर, २०१८ रोजी त्यांच्याकडून खुलासा आला होता. जी कार्यवाही ६ महिन्यांत झाली नाही ती कार्यवाही एका महिन्यात कशी झाली? समितीची साक्ष लागल्यानंतर ही कार्यवाही झालेली आहे, असे दिसून येत आहे. यावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी समितीस विशद केले की, समितीच्या इतिवृत्ताची वाट पाहिली होती. इतिवृत्त प्राप्त होताच पुढील कार्यवाही सुरू केली. या प्रकरणी माननीय समिती प्रमुखांनी मौखिक सूचना दिल्या होत्या. एकदाच मोठी रक्कम मिळालेली आहे. त्यामुळे त्या वर्षात २० टक्के खरेदी होऊ शकली नाही, ती थोडी पुढे गेली. सन १९७७ ते सन २०१२ या कालावधीमधील एकत्रित ५१ लाख रुपयांची रक्कम जिल्हा परिषदेला एकाच वर्षात मिळालेली आहे त्यामुळे तो ॲन्टीसिपेट करू शकला नाही. जिल्हा परिषदेचे दर वर्षी १ लाख ३६ हजार रुपयांचे उत्पन्न होते. ही रक्कम त्या वर्षात खर्च झाली नाही असा आक्षेप आहे. हा खर्च पुढील वर्षात झालेला आहे.

## अभिप्राय व शिफारशी

सन २०१३-२०१४ या वर्षाच्या वार्षिक प्रशासन अहवालावरील चर्चेदरम्यान सातारा जिल्हा परिषदेकडून प्राप्त झालेल्या लेखी माहितीच्या आधारे समितीच्या असे निदर्शनास आले की, पंचायत समिती जावली (मेढा) येथे मागासवर्गीयांच्या उन्नतीसाठीच्या योजनेच्या पंचायत समितीच्या उत्पन्नाच्या २० टक्के रकमेतून खर्च केलेल्या रकमांच्या बाबतीत तत्कालीन गटविकास अधिकारी श्री. मारकड यांनी समितीला उद्धटपणे उत्तरे दिली. तसेच दिनांक १ एप्रिल ते ३१ मार्च या कालावधीसाठी ग्रामविकास व जलसंधारण विभागाच्या दिनांक १ सप्टेंबर, १९९३ रोजीच्या शासन निर्णयानुसार मागासवर्गीयांच्या योजनांवरील निधी खर्च करण्याच्या वेळापत्रकाचे पालन केले नाही, सदरहू निधी प्राप्त झाल्यानंतर खर्च करण्याच्या धोरणामुळे तो अखर्चित राहिला. जावली (मेढा) पंचायत समितीने आर्थिक वर्षाच्या शेवटच्या दीड ते दोन महिन्यांच्या आचारसंहितेचे कारण पुढे करून मागासवर्गीयांच्या विकास योजनांना खीळ घातली आहे याप्रकरणी समितीने तीव्र नापसंती व्यक्त केली.

पंचायत समिती जावली (मेढा) येथील तत्कालीन गटविकास अधिकारी श्री. मारकड यांनी केलेल्या खुलाशा मध्ये ग्रामविकास व जलसंधारण विभागाच्या दिनांक २० जून, २००८ मधील परिशिष्टानुसार विहित कालावधीत निधी उपलब्ध न झाल्याने वेळापत्रकानुसार पालन करता आले नाही असे नमूद केले असले तरी ग्रामविकास व जलसंधारण विभागाच्या दिनांक १ सप्टेंबर, १९९३ रोजीच्या शासन निर्णयानुसार खरेदी प्रक्रियेबाबतच्या वेळापत्रकाचे पालन केलेले नाही. सन २०१३-२०१४ मध्ये पंचायत समिती जावली यांच्याकडे रुपये २९२ एवढी रक्कम शिल्लक होती. तथापि, दिनांक २१ मार्च, २०१४ रोजी वाढीव उपकराची रक्कम रुपये ५५,६४,१५८ एवढे अनुदान प्राप्त झाले, त्यापैकी २० टक्के रक्कम रुपये ११,१२,८३२ एवढी असून रक्कम रुपये २७,००० प्रत्यक्ष मागासवर्गीयांच्या उन्नतीसाठी ९ सौर कंदीलाचे वाटप करण्यात आले त्यामुळे रुपये १०,८५,८३२ एवढी रक्कम शिल्लक राहिली असल्याचे दिसून येते. संबंधित गटविकास अधिकारी पंचायत समिती, महाबळेश्वर यांच्यामार्फत दिनांक २० डिसेंबर, २०१८ रोजी चौकशी केलेली असून दिनांक २१ डिसेंबर, २०१८ रोजी गटविकास अधिकाऱ्यांना नोटीस दिली आहे. त्यानंतर दिनांक २८ डिसेंबर, २०१८ रोजी त्यांच्याकडून खुलासा प्राप्त झालेला आहे. यावरून असे दिसून येते की, समितीची साक्ष लागल्यानंतर ही कार्यवाही झालेली आहे. याबाबत समिती असमाधान व्यक्त करीत आहे. **सबब प्रस्तुत प्रकरणी समिती अशी शिफारस करीत आहे की, मागासवर्गीयांच्या उन्नतीसाठीच्या योजनेच्या पंचायत समितीच्या उत्पन्नाच्या २० टक्के रकमेतून मागासवर्गीयाच्या विविध योजनांवर खर्च करावयाचा निधी विहीत वेळापत्रकानुसार खर्च न करणाऱ्या संबंधित अधिकाऱ्यांची चौकशी करून दोषी आढळणाऱ्या संबंधितांवर जबाबदारी निश्चित करून त्यांचेविरुद्ध कठोर कारवाई करण्यात यावी, याबाबत केलेल्या कार्यवाहीची माहिती समितीला एक महिन्याच्या आत पाठविण्यात यावी.**

## प्रकरण चार

## जिल्हा परिषद, सातारा (प्रशासन)

### पंचायत समिती जावली (मेढा) अंतर्गत सन २०१४-२०१५ पासून पाणीपुरवठा योजनेच्या कामाबाबत

पंचायती राज समितीने दिनांक ११ ते १३ एप्रिल, २०१८ या कालावधीत सातारा जिल्हा परिषदेस भेट दिली असता सन २०१३-१४ या वर्षाच्या वार्षिक प्रशासन अहवालावरील चर्चेदरम्यान सातारा जिल्हा परिषदेकडून प्राप्त झालेल्या लेखी माहितीच्या आधारे समितीने अशी विचारणा केली की, जावळी तालुक्यातील पाणी पुरवठ्याच्या अपूर्ण योजना कोणत्या वर्षातील आहेत, यावर तत्कालीन गटविकास अधिकारी यांनी समितीस विशद केले की, दरेकुंड येथील योजना अपूर्ण आहे ती सन २०१५ मधील आहे.

समितीने विचारणा केली की, गटविकास अधिकारी यांनी पाणीपुरवठा योजनेचा आढावा घेतला आहे काय, यावर सभापती, पंचायत समिती, जावली यांनी समितीस विशद केले की, एकच योजना अपूर्ण आहे. यावर समितीने विचारणा केली की, शाखा अभियंता यांनी ८ योजना अपूर्ण असल्याची माहिती दिली आहे. सदरहू योजनांना मंजुरी कधी दिली, कार्यारंभ आदेश कोणत्या वर्षात देण्यात आला, कामाची मूदत संपल्यानंतर काम अपूर्ण असेल तर कंत्राटदाराशी कार्यकारी अभियंता, उप अभियंता, पाणीपुरवठा समिती यांनी पत्र व्यवहार केला आहे काय, सदरहू माहिती कार्यकारी अभियंता यांनी आढावा बैठकीच्या वेळी सादर करावा. सदरहू बाब अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी उप अभियंता यांना कळवावी. पाणी टंचाई काळात अपूर्ण पाणीपुरवठा योजना पूर्ण करण्यासाठी कोणते प्रयत्न केले, यावर गटविकास अधिकारी यांनी समितीस विशद केले की, टंचाई असलेली गावे कमी आहेत. इतर प्रश्नांची उत्तरे समितीला संबंधितांकडून मिळू शकली नाहीत.

तद्नंतर समितीने संबंधिताना पुढीलप्रमाणे सूचना केल्या की, विषयसूचीमधून एकही विषय वगळता येत नाही. ग्रामीण भागाशी संबंधित विभाग निहाय आढावा विषय सूचीमध्ये आला पाहिजे. सदरहू विषय विषयसूचीमध्ये आल्यानंतर पंचायत समिती सदस्य त्यावर आपले प्रश्न उपस्थित करू शकतात. यावर गटविकास अधिकारी यांनी समितीस विशद केले की, विषय सूची आहे.

**उपरोक्त माहितीच्या संदर्भात अधिक माहिती जाणून घेण्यासाठी समितीने खालील मुद्यांबाबत विभागाकडून माहिती मागविली.**

पंचायत समिती, जावळी (मेढा) अंतर्गत सन २०१४-१५ पासून पाणीपुरवठा योजनेची ८ कामे अद्याप सुरू आहेत, सीएसआर दरामध्ये फरक असून ७ पाणीपुरवठा योजनेची कामे हस्तांतरित करण्यात आल्याप्रकरणी चौकशी करण्यात आली आहे काय, असल्यास चौकशीत काय आढळून आले तसेच सातारा जिल्ह्यातील पाणीपुरवठा योजनेची सदरहू अपूर्ण कामे लवकरात लवकर पूर्ण होण्याचे दृष्टीने कोणती कामे अपूर्ण असल्याप्रकरणी संबंधितांची जबाबदारी निश्चित करण्यात आली आहे काय, त्यानुसार संबधितांविरूद्ध कोणती कारवाई करण्यात आली आहे. नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत?

**उपरोक्त मुद्यांसंदर्भात जिल्हा परिषदेकडून समितीस खालीलप्रमाणे लेखी माहिती प्राप्त झाली.**

जावली तालुक्यात सन २०१४-१५ पासून सुरू असलेल्या ८ पाणीपुरवठा योजनांच्या कामापैकी दरे खु.गवडी, दुंदमुरा, करंडी या ४ योजनांची कामे पूर्ण करून पाणीपुरवठा सुरू आहे. भोगवली, रायगाव, करंजे योजनेची कामे अपूर्ण आहेत. तथापि, पाणीपुरवठा सुरू आहे. खर्शी, बारामुरे या योजनेच्या उद्भव विहिरी जागेबाबत प्रकरण न्यायप्रविष्ट असल्याने हे काम अपूर्ण आहे.

ग्रामीण पाणीपुरवठा समितीमार्फत योजना राबविण्याच्या होत्या व त्यांना तांत्रिक सल्ला देण्याचे काम कनिष्ठ अभियंता/ शाखा अभियंता यांनी करावयाचे होते. समितीमार्फत कामे विहित वेळेत पूर्ण करण्यासाठी झालेल्या विलंबासाठी कनिष्ठ अभियंता/ शाखा अभियंता यांना कारणे दाखवा नोटीस देवून खुलासा मागविणेत आला आहे. शासन निर्णय दिनांक ९ मार्च, २०१८ नुसार रखडलेल्या भोगवली तर्फे मेढा, रायगाव, करंजे व खर्शी बारामुरे या ४ योजनांचे तांत्रिक परीक्षण करण्यात आले असून योजनांचे लेखाविषयक व प्रशासकीय तपासणी करून जिल्हा परिषदेच्या ताब्यात घेवून पूर्ण करण्यात येत आहेत.

### मंत्रालयीन विभागाचा अभिप्राय

**पाणीपुरवठा व स्वच्छता विभागाचे अभिप्राय.—**अपूर्ण राहिलेल्या योजनांची कामे ताब्यात घेवून जिल्हा परिषदेमार्फत पूर्ण करण्यात येतील.

## विभागीय सचिवांची साक्ष

पंचायती राज समितीने सातारा जिल्हा परिषदेला दिलेल्या भेटीच्या वेळी प्राप्त झालेल्या माहितीच्या आधारे उपरोक्त मुद्यावर अधिक माहिती घेण्यासाठी दिनांक १६ जानेवारी, २०१९ रोजी विभागीय सचिवांच्या घेतलेल्या साक्षी दरम्यान समितीने जावली तालुक्यातील पाणीपुरवठा योजनाबाबत सद्यःस्थिती विचारली असता, मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी समितीस विशद केले की, पंचायत समिती, जावली तालुक्यात सन २०१४-२०१५ पासून ८ कामे पाणीपुरवठा योजनेची सुरू होती. यापैकी ४ कामे पूर्ण झालेली आहेत. उर्वरित ४ कामांपैकी खर्शी बारामुरे या योजनेच्या उदभव विहीरीच्या जागेबाबत प्रकरण न्यायप्रविष्ट होते. हे काम राहिले होते. परंतु आता त्या ठिकाणी स्त्रोत बदलून दुसरीकडे केले जात आहे. पाणीपुरवठा स्वच्छता समितीमार्फत या सर्व कामांची अंमलबजावणी केली जाते. त्यांना तांत्रिक समर्थक (सपोर्ट) म्हणून कनिष्ठ अभियंता आणि उप अभियंता मदत करीत होते. काम पूर्ण करून घेण्याची जबाबदारी पाणीपुरवठा स्वच्छता समितीची होती. शासनाने दिनांक ९ मार्च, २०१८ रोजी रखडलेल्या योजना या जिल्हा परिषदेने ताब्यात घेण्यासाठी निर्णय घेतला होता. त्या योजना पूर्ण केल्या जात आहे. याचबरोबर इतरही योजना पूर्ण करण्यासाठी प्रयत्न केला जात आहे.

## अभिप्राय व शिफारशी

पंचायती राज समितीने दिनांक ११ ते १३ एप्रिल, २०१८ या कालावधीत सातारा जिल्हा परिषदेस भेट दिली असता, सन २०१३-२०१४ या वर्षाच्या वार्षिक प्रशासन अहवालावरील चर्चेदरम्यान समितीच्या निदर्शनास आले की, पंचायत समिती जावली (मेढा) अंतर्गत सन २०१४-२०१५ पासून सुरू असलेल्या ८ पाणीपुरवठा योजना अपूर्ण होत्या यापैकी दरे खु. गवडी, दुंदमुरा, करंडी या ४ योजनांची कामे पूर्ण करून पाणीपुरवठा सुरू आहे. मौजे भोगवली,रायगाव, करंजे योजनेची कामे अपूर्ण आहेत. खर्शी बारामुरे या योजनेच्या उद्‌भव विहीरीचे जागेबाबत प्रकरण न्यायप्रविष्ट असल्यामुळे हे काम अपूर्ण आहे व बहुतांश गावामध्ये पाणी टंचाई आहे. **सन २०१६ मध्ये पाणीपुरवठा योजनेचा कालावधी पूर्ण झालेला परंतु कामे अपूर्ण राहिलेल्या कंत्राटदाराकडून त्यावेळी टंचाई दूर करण्यासाठी करण्यात आलेल्या खर्चाची वसुली करणे आवश्यक असताना त्याप्रमाणे कारवाई झाल्याचे दिसून येत नाही, त्यामुळे समिती तीव्र नापसंती व्यक्त करीत आहे.**

**ग्रामीण पाणीपुरवठा समिती मार्फत योजना राबवावयाच्या होत्या व त्यांना तांत्रिक सल्ला देण्याचे काम कनिष्ठ अभियंता / शाखा अभियंता यांनी करावयाचे होते, कामे विहीत वेळेत पूर्ण न झाल्याप्रकरणी समिती राज्यात अनेक ठिकाणी भेटी देऊन जिल्हा परिषदा व पंचायत समित्यांचा पाणीपुरवठा योजना संदर्भात आढावा घेताना अनेक ठिकाणी पाणीपुरवठा योजनांसाठी निधी उपलब्ध करूनही बऱ्याच योजना एकतर अपूर्ण आहेत आणि काही योजना पूर्ण होऊनही त्यातून पिण्याचे पाणी या ना त्या कारणास्तव पुरवठा केला जात नाही. सातारा जिल्हा परिषदेतील जावली पंचायत समिती देखील याला अपवाद नाही. या पंचायत समिती मधील ज्या पाणीपुरवठा योजना अपूर्ण असतील किंवा ज्या पूर्ण होऊनही त्यातून पाणीपुरवठा केला जात नाही अशा योजनांचा आढावा घेऊन प्रत्येक योजनेची चौकशी करावी, त्यात अनियमितता आढळल्यास कठोर कारवाई करावी व अपूर्ण योजना पूर्ण करून पाणीपुरवठा सुरळीत सुरू करावा तसेच याबाबी अपूर्ण योजना ठेवण्यात जे अधिकारी जबाबदार असतील त्यांचेविरुद्ध कारवाई करून जबाबदार अधिकाऱ्यांवर जबाबदारी निश्चित करावी व याबाबतच्या कार्यवाहीचा सर्वंकष अहवाल समितीला एक महिन्याच्या आत सादर करण्यात यावा, अशी समिती शिफारस करीत आहे.**

## प्रकरण पाच

## जिल्हा परिषद, सातारा (प्रशासन)

## सातारा जिल्ह्यातील पाणी टंचाईबाबत

पंचायती राज समितीने दिनांक ११ ते १३ एप्रिल, २०१८ या कालावधीत सातारा जिल्हा परिषदेस भेट दिली असता सन २०१३-१४ या वर्षाच्या प्रशासन अहवालावरील चर्चेदरम्यान सातारा जिल्हा परिषदेकडून प्राप्त झालेल्या लेखी माहितीच्या आधारे समितीने अशी विचारणा केली की, पाणी टंचाईचा कालावधी हा चार-पाच महिन्यांचा असतो. पाणीपुरवठा योजनेच्या विशेष दुरुस्तीचे प्रस्ताव ३१ मार्च नंतर प्राप्त झाल्यास ते मान्यतेसाठी जिल्हाधिकाऱ्यांच्या मार्फत प्रधान सचिव, पाणीपुरवठा व स्वच्छता विभाग यांच्याकडे सादर करावे लागणार आहेत. परंतु यामध्ये वेळेचा अपव्यय होतो व विहित कालावधीत पाणी टंचाईचा प्रश्न सुटू शकत नाही.

आतापर्यंत पाणी टंचाईच्या संदर्भातील सर्व अधिकार हे जिल्हाधिकाऱ्यांकडे होते. परंतु दिनांक १४ फेब्रुवारी, २०१८ रोजीच्या शासन निर्णयानुसार ३१ मार्च नंतर प्राप्त होणाऱ्या प्रस्तावांना प्रशासकीय मान्यता देण्याचे अधिकार शासन स्तरावर वर्ग करण्यात आले आहेत. याबाबतचे मुख्य कार्यकारी अधिकारी, यांनी दिनांक १४ फेब्रुवारी, २०१८ **(परिशिष्ट ५.१)** रोजीच्या शासन निर्णयाची प्रत समितीला उपलब्ध करून द्यावी. त्यानुसार सदर शासन निर्णयाची प्रत समितीला प्राप्त झाली. त्या अनुषंगाने समितीने निदेश दिले की, सदरहू शासन निर्णयानुसार पाणीपुरवठा योजनेच्या विशेष दुरुस्तीबाबतचे प्रस्ताव दिनांक ३१ मार्च पर्यंत सादर झाल्यास त्यांना मान्यता देण्याचे अधिकार जिल्हाधिकाऱ्यांना आहेत. परंतु दिनांक ३१ मार्च नंतर प्रस्ताव प्राप्त झाल्यास, ते प्रस्ताव जिल्हाधिकाऱ्यांच्या माध्यमातून शासन स्तरावर मान्यतेसाठी सादर करावे लागणार आहेत. शासनाकडे प्रस्ताव सादर केल्यानंतर त्यांच्याकडून मान्यता केव्हा प्राप्त होईल आणि कार्यवाही नेमकी कधीपर्यंत होईल, हा प्रश्नच आहे. कारण जोपर्यंत शासन स्तरावरून प्रशासकीय मान्यता मिळणार नाही तोपर्यंत उपाययोजना करता येणार नाहीत असे समितीला वाटते. दिनांक १४ फेब्रुवारी, २०१८ रोजी निर्गमित करण्यात आलेल्या शासन निर्णयाच्या संदर्भात विभागीय सचिवांची साक्ष घेण्यात येईल. आतापर्यंत टंचाईच्या काळात टँकरने पाणीपुरवठा करण्याचे सर्व अधिकार तहसीलदार यांना होते. शिवाय जिल्हाधिकारी हे सर्वेसर्वा होते. पूर्वीचीच पद्धत यापुढेही कायम असावयास पाहिजे. समितीची अपेक्षा आहे की, टंचाईच्या काळात प्रशासकीय मान्यता देण्याबाबत जिल्हाधिकाऱ्यांना असलेले अधिकार शासन स्तरावर वर्ग करता कामा नये. स्थानिक पातळीवर टँकरने पाणीपुरवठा करावयाचा असल्यास पूर्वीप्रमाणेच तहसीलदार, प्रांताधिकारी आणि जिल्हाधिकारी यांना प्रशासकीय मान्यतेचे अधिकार असावयास पाहिजेत, अशी समिती शिफारस करीत आहे. हा प्रश्न केवळ सातारा जिल्ह्यापुरता मर्यादित नसून संपूर्ण राज्याशी संबंधित प्रश्न आहे. एकंदरीत या विषयाचे गांभीर्य लक्षात घेता, दिनांक १४ फेब्रुवारी, २०१८ रोजी निर्गमित करण्यात आलेल्या शासन निर्णयाच्या संदर्भात विभागीय सचिवांची साक्ष आयोजित करण्यात येईल. दरम्यानच्या काळात तायघाट आणि राजापुरी येथे पाणीपुरवठा करण्याच्या बाबतीत आवश्यक त्या उपाययोजना कराव्यात. या प्रकरणी विशेष अभिप्रायासह शासन स्तरावर तातडीने सूचना पाठवाव्यात. यावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी समितीस विशद केले की, समितीने केलेल्या सूचनेची नोंद घेतलेली आहे. या प्रकरणी तातडीने कार्यवाही करण्यात येईल.

तद्नंतर समितीने निदेश दिले की, समितीची अंतर्गत बैठक दिनांक १७ एप्रिल, २०१८ रोजी मुंबई येथे आयोजित करण्यात आलेली आहे. उक्त बैठकीत दिनांक १४ एप्रिल, २०१८ रोजी निर्गमित करण्यात आलेल्या शासन निर्णयाच्या बाबतीत विभागीय सचिवांबरोबर चर्चा करण्यात येईल. सातारा जिल्ह्यात टंचाईच्या बाबतीत ज्या उपाययोजना केल्या आहेत तसेच ज्या कामांना प्रशासकीय मान्यता देणे प्रलंबित आहे या बाबतची माहिती समितीला तातडीने लेखी स्वरुपात कळवावी. जेणेकरून दिनांक १७ एप्रिल, २०१८ रोजी आयोजित केलेल्या अंतर्गत बैठकीमध्ये विभागीय सचिवांकडे विचारणा करणे शक्य होईल. यावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी या विषयीचा अहवाल सादर करण्याच्या अनुषंगाने योग्य ती कार्यवाही करण्यात येईल, असे समितीला आश्वासन दिले.

**उपरोक्त माहितीच्या संदर्भात अधिक माहिती जाणून घेण्यासाठी समितीने खालील मुद्यांबाबत विभागाकडून माहिती मागविली.**

जिल्ह्यातील पाणी टंचाई संदर्भात दिनांक १४ फेब्रुवारी, २०१८ रोजीच्या शासन निर्णयानुसार ३१ मार्च नंतर प्राप्त होणाऱ्या प्रस्तावांना प्रशासकीय मान्यता देण्याचे अधिकार जिल्हाधिकाऱ्यांऐवजी शासन स्तरावर वर्ग करण्यात आले आहेत. स्थानिक पातळीवर टँकरने पाणीपुरवठा करावयाचा असल्यास पूर्वीप्रमाणेच तहसीलदार, प्रांताधिकारी जिल्हाधिकारी यांना प्रशासकीय मान्यतेचे अधिकार देण्यासंदर्भात शासनाची नेमकी भूमिका काय आहे?

**उपरोक्त मुद्यांसंदर्भात जिल्हा परिषदेकडून समितीस खालीलप्रमाणे लेखी माहिती प्राप्त झाली.**

पाणी टंचाई कालावधीत टँकरने पाणीपुरवठा करण्याच्या प्रस्तावांना प्रशासकीय मान्यता देण्याचे अधिकार जिल्हाधिकारी यांना होते. स्थानिक पातळीवर टँकरने पाणीपुरवठा करावयाचा असल्यास महसूल व वन विभागाकडील दिनांक २९ नोव्हेंबर, २०१८ रोजीच्या शासन निर्णयान्वये टँकर मंजुरीचे अधिकार संबंधित उप विभागीय अधिकारी यांना प्रदान करण्यात आलेले आहेत. त्याप्रमाणे सातारा जिल्ह्यात कार्यवाही सुरू आहे.

पाणी टंचाई संदर्भात दिनांक १४ फेब्रुवारी, २०१८ रोजीच्या शासन निर्णयानुसार दिनांक ३१ मार्च नंतर प्राप्त होणाऱ्या प्रस्तावांना मान्यतेचे अधिकार जिल्हाधिकाऱ्यां ऐवजी शासनस्तरावर वर्ग करण्यात आले आहेत. त्यानुसार दिनांक ३१ मार्च, २०१८ नंतर सादर केलेल्या प्रस्तावातील दिनांक २६ एप्रिल, २०१८ रोजी ३ तात्पुरती नळ पाणीपुरवठा योजना व ८ विशेष दुरूस्ती नळ पाणीपुरवठा योजनांना तसेच दिनांक १९ मे, २०१८ रोजी १ तात्पुरती नळ पाणीपुरवठा योजना व ४ विशेष दुरूस्ती नळ पाणीपुरवठा योजनांना शासनाची मान्यता प्राप्त झालेली आहे.

### मंत्रालयीन विभागाचा अभिप्राय

**पाणीपुरवठा व स्वच्छता विभागाचे अभिप्राय.—**(अ) शासन परिपत्रक दिनांक १४ फेब्रुवारी, २०१८ अन्वये टंचाई अंतर्गत येणाऱ्या तात्पुरत्या नळ पाणीपुरवठा योजना तसेच नळ योजनांची विशेष दुरूस्ती उपाययोजनांचा क्षेत्रिय स्तरावर मान्यता देण्यात येऊ नये अशा सूचना निर्गमित करण्यात आल्या आहेत. अशा उपाययोजनांबाबत स्थळ पाहणी करून अंदाजपत्रके व आराखडे तयार करणे इ.बाबी दि. ३१ मार्च पूर्वी पूर्ण करून घेऊन प्रशासकीय मान्यता देणे आवश्यक आहे. कारण टंचाई अंतर्गत मान्यता दिलेल्या उपाययोजना पिण्याच्या पाण्याची टंचाई कालावधीतच पूर्ण करून त्या क्षेत्राला टंचाई कालावधीतच पाणी उपलब्ध होणे आवश्यक असते. तथापि, दिनांक ३१ मार्च नंतर मान्यता देणेत येणाऱ्या उपाययोजनांच्या बाबतीत त्यापुढील निविदा प्रक्रिया, कार्यादेश इत्यादी बाबी पूर्ण करून उपाययोजनांची कामे मुदतीत पूर्ण होत नाहीत. त्यामुळे टंचाई कालावधीतच उपाययोजना पूर्ण करून पिण्याचे पाणी उपलब्ध होत नाही. त्यामुळे सदर अट घालण्यात आली आहे.

तथापि, दिनांक ३१ मार्च नंतर जिल्हाधिकारी यांच्याकडून विभागीय आयुक्त यांच्यामार्फत सदर उपाययोजनांना मान्यता देणेबाबतचे प्रस्ताव प्राप्त झाल्यास सदर उपाययोजनेद्वारे टंचाई कालावधीतच पिण्याचे पाणी उपलब्ध होईल याची खात्री करून घेऊन प्रकरणनिहाय शासनस्तरावरून अशा उपाययोजनांना मान्यता देण्यात येते.

जिल्हाधिकारी सातारा यांनी सन २०१७-१८ च्या टंचाई कालावधीत दिनांक ३१ मार्च, २०१८ नंतर सादर केलेल्या प्रस्तावातील एकूण ४ तात्पुरत्या नळ पाणीपुरवठा योजना व ४ नळ योजनांची विशेष दुरूस्ती या उपाययोजनांना शासनस्तरावरून मान्यता देण्यात आली आहे.

(ब) पिण्याच्या पाण्याचे टँकर्स मंजुरीचे अधिकार जिल्हाधिकारी यांना आहेत. तथापि, या वर्षीच्या सन २०१८-१९ च्या टंचाई कालावधीसाठी महसूल व वन विभाग, शासन निर्णय दिनांक २९ नोव्हेंबर, २०१८ **(परिशिष्ट ५.२)** अन्वये दुष्काळी परिस्थिती व पिण्याच्या पाण्याची टंचाई विचारात घेऊन दुष्काळ जाहीर करण्यात आलेल्या जिल्ह्यांमध्ये पिण्याच्या पाण्याचे टँकर्स मंजूर करण्याचे जिल्हाधिकारी यांना असलेले अधिकार संबधित उपविभागीय अधिकारी तथा उपविभागीय दंडाधिकारी यांना प्रदान करण्यात आले आहेत.

### विभागीय सचिवांची साक्ष

पंचायती राज समितीने सातारा जिल्हा परिषदेला दिलेल्या भेटीच्या वेळी प्राप्त झालेल्या माहितीच्या आधारे उपरोक्त मुद्यावर अधिक माहिती घेण्यासाठी दिनांक १६ जानेवारी, २०१९ रोजी विभागीय सचिवांच्या घेतलेल्या साक्षी दरम्यान समितीने विचारणा केली की, पाणी टंचाईसंदर्भातील प्रश्न आहे. प्रशासकीय मान्यता देण्याचे अधिकार जिल्हाधिकाऱ्यांऐवजी शासनस्तरावर वर्ग करण्यात आले आहेत. स्थानिक पातळीवर टँकरने पाणीपुरवठा करावयाचा असल्यास पूर्वीप्रमाणेच तहसीलदार, प्रांताधिकारी, जिल्हाधिकारी यांना प्रशासकीय मान्यतेचे अधिकार देण्यासंदर्भात शासनाची नेमकी भूमिका काय आहे, यावर अपर मुख्य सचिव, पाणीपुरवठा व स्वच्छता विभाग यांनी समितीस विशद केले की, पाणी टंचाई संदर्भात दिनांक १४ फेब्रुवारी, २०१८ रोजीच्या शासन निर्णयानुसार दिनांक ३१ मार्चनंतर प्राप्त होणाऱ्या प्रस्तावांना मान्यतेचे अधिकार जिल्हाधिकाऱ्यांऐवजी शासनस्तरावर वर्ग करण्यात आले आहेत.

यामध्ये शासनाचा दिनांक ३१ मार्चपर्यंत योजना मंजूर केल्यानंतर निविदा केल्यानंतर बांधकाम केली जातात आणि त्याचा फायदा हा उन्हाळ्यात तेथील लोकांना मिळाला पाहिजे, हा उद्देश होता. त्यानुसार विभागाने दिनांक ३१ मार्च ही अंतिम दिनांक आहे याकरिता दिनांक १४ फेब्रुवारी, २०१८ रोजी शासनाने परिपत्रक निर्गमित केले होते, त्याचा चांगला फायदा झालेला आहे. तसेच या आर्थिक वर्षातदेखील चांगला फायदा झालेला आहे. प्रस्ताव विभागाला लवकर प्राप्त होत आहे. त्यानुसार प्रस्तावाला लवकरात लवकर मंजुरी दिली जाणार आहे.

यावर समितीने मत व्यक्त केले की, समिती सचिवांनी दिलेल्या उत्तराशी सहमत नाही. ज्यावेळी टंचाईचे आराखडे तयार केले जातात, त्यावेळी त्या वर्षातील जमिनीचा एकूण भूस्तर, उपसे आणि भविष्यकाळात वाढत जाणारी पाणी टंचाई नमूद केलेली असते. परंतु विभागाने दिनांक ३१ मार्च ही कट ऑफ डेट ठेवल्यामुळे एखाद्या गावात आकस्मिक परिस्थिती उद्‌भवली तर अशा वेळी दिनांक ३१ जुलै पर्यंतची मुदतवाढ दिली जाते. काही वेळा शासनाने तर टंचाईचा सामना करण्यासाठी दिनांक ३१ ऑगस्टपर्यंत मुदतवाढ दिलेली आहे. असे असताना विभागाने ३१ मार्च ही कट ऑफ डेट ठेवलेली आहे. विभागाचे असे म्हणणे आहे की, या योजना टंचाईच्या कालावधीत पूर्ण होत नसल्यामुळे ३१ मार्चपूर्वीच सुधारित

प्रशासकीय मान्यता द्यावी असे म्हटले आहे. टंचाईची परिस्थिती ही काही सांगून येत नाही. आराखडे ऑक्टोबर किंवा सप्टेंबर महिन्यात तयार करण्यासाठी सांगितले जातात. पुढील ९ महिने त्यांना टंचाईचे नियोजन करावयाचे असते आणि विभागाकडून दिनांक ३१ मार्च ही कट ऑफ डेट निश्चित केलेली आहे. हे योग्य नाही. यावर अपर मुख्य सचिव, पाणीपुरवठा व स्वच्छता विभाग यांनी समितीस विशद केले की, टंचाईची परिस्थिती ही कोणालाही सांगून येत नाही, असे सन्माननीय सदस्यांनी म्हटले असून ते बरोबर आहे. परिपत्रक निर्गमित करण्याचा उद्देश एवढाच आहे की, सर्व मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांनी वेळेवर आढावा घ्यावा आणि टंचाई किती आहे, कोणकोणत्या गावात आहे, त्यासाठी काणती उपाययोजना केली पाहिजे याकरिता आराखडा तयार केलेला असतो. सदर आराखड्याच्या आधारे विशेष दुरूस्ती किंवा तात्पुरती योजना वेळेवर व्हावी या दृष्टीने परिपत्रक निर्गमित केलेले आहे. ३१ मार्च ही तारीख गेल्यानंतर प्रस्ताव देण्यासाठी सांगितले होते. त्यानुसार सातारा जिल्हा परिषदेने दिनांक ५ एप्रिल, २०१८ रोजी प्रस्ताव दिलेला आहे. या योजना पूर्ण करून पाण्याचा फायदा लोकांना मिळाला पाहिजे, हा त्यामागचा मुख्य उद्देश असतो.

यावर समितीने विचारणा केली की, यामध्ये थोडीशी सुधारणा करून हवी आहे, हे काम मंत्रालयात करण्यासाठी का म्हणून यावयाचे, मुख्य कार्यकारी अधिकारी किंवा जिल्हाधिकारी यांच्या स्वाक्षरीने टंचाई आराखडा मंत्रालयात सचिवांकडे पाठविण्याऐवजी आयुक्तांना तो अधिकार द्यावा, अशी सुधारणा करावी. यावर अपर मुख्य सचिव, पाणीपुरवठा व स्वच्छता विभाग यांनी समितीस विशद केले की, आयुक्तांनाच अधिकार दिलेले आहेत.

## अभिप्राय व शिफारशी

पाणी टंचाईचा कालावधी साधारणपणे चार पाच महिन्यांचा असतो. पाणीपुरवठा योजनेच्या विशेष दुरूस्तीचे प्रस्ताव ३१ मार्च नंतर प्राप्त झाल्यास ते मान्यतेसाठी जिल्हाधिकाऱ्यांच्या मार्फत प्रधान सचिव, पाणीपुरवठा व स्वच्छता विभाग यांच्याकडे सादर करावे लागतात. यामध्ये वेळेचा अपव्यय होतो व विहित कालावधीत पाणी टंचाईचा प्रश्न सुटू शकत नाही. पाणी टंचाईच्या संदर्भातील सर्व अधिकार हे जिल्हाधिकाऱ्यांकडे होते परंतु दिनांक १४ फेब्रुवारी, २०१८ रोजीच्या शासन निर्णयानुसार दिनांक ३१ मार्च पर्यंत झालेल्या प्रस्तावांना मान्यता देण्याचे अधिकार जिल्हाधिकाऱ्यांना आहेत व दिनांक ३१ मार्च नंतर प्राप्त होणाऱ्या प्रस्तावांना प्रशासकीय मान्यता देण्याचे अधिकार शासनस्तरावर वर्ग करण्यात आले आहेत. जो पर्यंत शासनस्तरावरून प्रशासकीय मान्यता नाही तो पर्यंत पाणी टंचाईबाबत उपाययोजना करता येत नाही. आतापर्यंत टंचाईच्या काळात टँकरने पाणीपुरवठा करण्याचे सर्व अधिकार तहसिलदार यांना होते. तसेच जिल्हाधिकारी सर्वेसर्वा होते. त्यामुळे स्थानिक पातळीवर टँकरने पाणीपुरवठा करावयाचा असल्यास पूर्वी प्रमाणेच तहसिलदार, प्रांतधिकारी आणि जिल्हाधिकारी यांना प्रशासकीय मान्यतेचे अधिकार असावेत ज्यावेळी पाणी टंचाईचे आराखडे तयार केले जातात. त्यावेळी त्यावर्षातील जमिनीचा एकूण भूस्तर, उपसे आणि भविष्यकाळात वाढत जाणारी पाणी टंचाई नमूद केलेली असते. परंतु पाणीपुरवठा विभागाने दिनांक ३१ मार्च ही तारीख निश्चित केलेली आहे. त्यामुळे **दिनांक ३१ मार्च या तारखेनंतर टंचाई सदृश्य परिस्थिती उद्भवल्यास मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हाधिकारी यांच्या स्वाक्षरीने प्रस्ताव सादर केल्यानंतर ते आयुक्तांकडे मंजूर करण्याबाबत अधिकार प्रदान केल्याचे अपर मुख्य सचिव, पाणीपुरवठा व स्वच्छता विभाग यांनी साक्षीदरम्यान विशद केले असले तरी दिनांक ३१ मार्च नंतर पाणी टंचाईबाबतचे प्रस्ताव पाणीपुरवठा व स्वच्छता विभागाकडे मंजुरीसाठी पाठविण्याबाबत दिनांक १४ फेब्रुवारी, २०१८ रोजीच्या शासन निर्णयामध्ये सुधारणा करण्यात यावी व मुख्य कार्यकारी अधिकारी किंवा जिल्हाधिकारी यांच्या स्वाक्षरीने टंचाई आराखडा मंत्रालय पाणीपुरवठा व स्वच्छता विभागाच्या सचिवांकडे पाठविण्याऐवजी विभागीय आयुक्तांना ते अधिकार प्रदान करण्यात यावेत. तसेच याकामी होत असलेला प्रशासकीय विलंब टाळण्याच्या दृष्टीने व लोकांना पिण्याच्या पाण्याचा पुरवठा तातडीने करण्याच्या दृष्टीने संबंधित शासन निर्णयात तातडीने दुरूस्ती करून स्थानिक स्तरावर अधिकार देण्यासंदर्भात योग्य ते आदेश निर्गमित करण्यात यावेत, अशी समिती शिफारस करीत आहे व त्यानुसार केलेल्या कार्यवाहीचा अहवाल समितीला एक महिन्याच्या आत सादर करण्यात यावा.**

## प्रकरण सहा

## जिल्हा परिषद, सातारा (प्रशासन)

## अफरातफर/अपहार प्रकरणांबाबत

पंचायती राज समितीने दिनांक ११ ते १३ एप्रिल, २०१८ या कालावधीत सातारा जिल्हा परिषदेस भेट दिली असता सन २०१३-१४ या वर्षाच्या प्रशासन अहवालावरील चर्चेदरम्यान सातारा जिल्हा परिषदेकडून प्राप्त झालेल्या लेखी माहितीच्या आधारे समितीने अशी विचारणा केली की, अफरातफरीच्या प्रकरणांमध्ये ग्रामसेवकावर कोणती कार्यवाही करण्यात आलेली आहे, यावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी विशद केले की, माननीय समिती प्रमुखांच्या अनुमतीने उप मुख्य कार्यकारी अधिकारी (पंचायत) यांनी याबाबत सविस्तर माहिती द्यावी. यावर उप मुख्य कार्यकारी अधिकारी (पाणीपुरवठा व स्वच्छता) ग्रामीण पाणीपुरवठा विभाग यांनी समितीस सविस्तर माहिती दिली की, अपहाराची १११ प्रकरणे होती व त्यामध्ये ४ कोटी ६८ लाख १३ हजार रुपये गुंतलेले आहेत. यामध्ये १६८ ग्रामसेवक, २ सरपंच व १ कक्ष सहाय्यक असे एकूण १७१ जण दोषी आढळून आलेले आहेत. १६८ ग्रामसेवकांपैकी ३७ ग्रामसेवकांची वेतनवाढ बंद करण्यात आलेली आहे. मूळ वेतनावर ५ ग्रामसेवक आणले आहेत, ९ ग्रामसेवकांवर ठपका ठेवण्याची कार्यवाही केलेली आहे. १६ ग्रामसेवकांना सक्त ताकीद दिलेली आहे, ६ ग्रामसेवकांकडून वसुली करण्यात आलेली आहे, ११ ग्रामसेवकांना कारणे दाखवा नोटीस दिलेली आहे, २ ग्रामसेवकांना सक्तीने सेवा निवृत्त केलेले आहे, ४ ग्रामसेवकांना सेवेतून कमी केलेले आहे, ५ ग्रामसेवकांना बडतर्फ केलेले आहे आणि मयत व परागंदा १२ प्रकरणे आहेत. अशा स्वरूपाची कार्यवाही करण्यात आलेली आहे. यावर समितीने विचारले की, याबाबत कार्यवाही करण्याची सुरुवात केव्हा पासून चालू झाली व त्यावेळी कोण अधिकारी होते, यावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी समितीस विशद केले की, यामधील १ प्रकरण १९७३-१९७४ मधील आहे. उर्वरित प्रकरणे २००३-२००४ पासून सुरू झालेली आहेत. ही कार्यवाही सातत्याने चालू आहे.

यावर समितीने विचारणा केली की, दोषी ग्रामसेवकांवर कार्यवाही सुरू करण्यात आल्याच्या कालावधीची माहिती देण्यात यावी. यावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी समितीस विशद केले की, ग्रामनिधीच्या प्रलंबित प्रकरणांच्या वर्षवार यादीवरून असे दिसते की, १९७३-१९७४ मध्ये १, २००३-२००४ मध्ये ४, २००७-२००८ मधील ८ प्रकरणे आहेत, २००८-२००९ मध्ये ५, २००९-२०१० मध्ये ३४, २०१०-२०११ मध्ये १९, २०११-२०१२ मध्ये २०, २०१२-२०१३ मध्ये ६, २०१३-२०१४ मध्ये १४ एवढी प्रकरणे आहेत. ही सर्व ग्रामपंचायतीची प्रकरणे आहेत.

समितीने विचारणा केली की, यावर समितीचा आक्षेप आहे. ज्या काळामध्ये संबंधित ग्रामपंचायतीमध्ये गैरव्यवहार झाला, त्या काळात संबंधित गटविकास अधिकारी व पंचायत विस्तार अधिकारी यांनी भेट दिली होती काय व त्यांनी तपासणी केली होती काय, या दोघांनी तपासणी केली असल्यास संबंधितांनी गैर कारभार केल्याचे त्यांना आढळून आले नसेल तर संबंधित सर्व गटविकास अधिकारी व पंचायत विस्तार अधिकारी यांनादेखील जबाबदार धरण्यात यावे. या दोघांना का जबाबदार धरले नाही, याचा खुलासा सादर करावा. यावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी समितीस विशद केले की, त्यावेळी पंचायत विस्तार अधिकारी आणि गट विकास अधिकारी यांच्या त्या काळामध्ये झालेल्या भेटींची माहिती तपासून पाहण्यात येईल. परंतु हा फार जुना कालावधी आहे. त्यांनी भेटी दिल्या असतील आणि अफरातफरी दिसून आल्या असतील तर त्यासंदर्भात त्यांचे खुलासे घेऊन आपण सांगितल्याप्रमाणे कार्यवाही करण्यात येईल आणि समितीला अहवाल सादर करण्यात येईल.

तद्नंतर समितीने संबंधितांना निदेश दिले की, भेटी देऊन तपासणी करणे ही खाते प्रमुखांची जबाबदारी असते. खाते प्रमुखांनी आवश्यक त्या भेटी देऊन तपासणी केली पाहिजे. खाते प्रमुख काय करीत असतात, त्या कालावधीमध्ये गटविकास अधिकारी आणि पंचायत विस्तार अधिकारी यांनी दोष काढला नसेल तर तेही यामध्ये दोषी आहेत, असे समितीचे स्पष्ट मत आहे. पंचायत राज व्यवस्थेमध्ये सर्व सिस्टिमने काम चालते. ग्रामसेवकांवर वचक ठेवण्यासाठी विस्तार अधिकारी आहे, त्यांच्यावर वचक ठेवण्यासाठी गटविकास अधिकारी आहेत व त्यांच्यावर वचक ठेवण्यासाठी उप मुख्य कार्यकारी अधिकारी (सामान्य व पंचायत) हे असतात. ग्रामपंचायतीची तपासणी केल्यावर हे प्रकरण उघडकीस आले नसेल तर ही गंभीर बाब आहे. संबंधितांनी थातूरमातूर तपासणी केली असेल. या कालखंडामध्ये सक्त ताकीद देणे, ठपका ठेवणे, कारणे दाखवा नोटीस देणे या गुन्ह्याच्या प्रमाणात शिक्षा दिल्या जातात. तसेच सक्तीने सेवा निवृत्ती देणे, बडतर्फ करणे या गंभीर गुन्ह्याबाबतच्या शिक्षा आहेत. विस्तार अधिकारी आणि गट विकास अधिकारी यांनी संबंधित ग्रामपंचायतींना केव्हा केव्हा भेटी दिल्या होत्या, त्यांच्याकडून एका दिवसामध्ये तपासणी होणार नाही. यावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी समितीस विशद केले की, यासंदर्भात जास्तीचा कालावधी लागणार आहे. त्याबाबत समितीला विनंती करण्यात येईल. भविष्यात असे होणार नाही, याची दक्षता घेण्यात येईल. परंतु याबाबत तपासणी करून समितीला सविस्तर अहवाल सादर करण्यात येईल.

समितीने विचारणा केली की, हे प्रकरण सन १९७३-१९७४ चे आहे. या प्रकरणात दोषी असलेल्यांवर केव्हा पासून कारवाई करण्यास सुरुवात करण्यात आली, यावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी समितीस विशद केले की, संबंधितांना केव्हा नोटीस देण्यात आली, त्याचा दिनांक

सध्या माझ्याकडे उपलब्ध नाही. यासंदर्भात माहिती घेऊन सादर करण्यात येईल. यावर समितीने विचारणा केली की, विस्तार अधिकारी (पंचायत) यांना दैनंदिन कार्यक्रम ठरवून दिलेला आहे. त्या अधिकाऱ्यांना हे प्रकरण का दिसून आले नाही, यावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी समितीस विशद केले की, याबाबत प्रत्यक्ष कार्यवाही केव्हा केली, त्याबाबत सध्या माहिती उपलब्ध नाही. त्यामुळे यासंदर्भात तपासणी करण्यात येईल.

तद्नंतर समितीने संबंधितांना निदेश दिले की, हा महत्त्वाचा विषय आहे, दोषी व्यक्तींवर कार्यवाही झाली पाहिजे. समायोजित केलेली रक्कम मोठी आहे. त्या रकमेची पूर्तता झालेली नाही. ०१ प्रकरण सन १९७३-१९७४ मधील आहे व इतर प्रकरण त्यानंतरची आहेत. अफरातफरीची बरीच प्रकरणे असून समायोजितची मोठी रक्कम शिल्लक आहे, हे प्रकरण खूप वर्षे जुने आहे. ज्यावर्षी हे प्रकरण झाले, त्यावर्षी असलेल्या तत्कालिन अधिकाऱ्यांनी जबाबदारीने काम केल्याचे दिसत नाही. त्या अधिकाऱ्यांनी ग्रामसेवकांवर केलेल्या कार्यवाहीची माहिती समितीस घ्यावी. संबंधित अधिकाऱ्यांनी केलेली कार्यवाही, त्यांच्यावरील विस्तार अधिकारी आणि उप मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी कार्यवाही केली किंवा कसे, याची माहिती समितीस घ्यावी. केवळ ग्रामसेवकांना वेठीस धरण्याचे काम झालेले आहे. या प्रकरणातील रकमा मोठ्या असल्यामुळे ही बाब तत्कालिन मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी देखील योग्य प्रकारे तपासायला हवी होती. संबंधितांवर फौजदारी गुन्हे दाखल करणे आवश्यक होते. त्यामुळे या सर्व प्रकरणांची सखोल चौकशी करून संबंधितांवर जबाबदारी निश्चित करण्यात यावी आणि दोषींवर कार्यवाही करून वसुलीची रक्कम जमा करावी. सदरहू रक्कम जमा झाल्यावर त्या रकमेचा जिल्हा परिषदेला फायदा होईल. याबाबत एका महिन्याच्या आत कारवाईसह अहवाल समितीस सादर करण्यात यावा. यावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी समितीस विशद केले की, समितीस विनंती आहे की, ही प्रकरणे अनेक वर्षांपासूनची आहेत. त्यामुळे हा मोठा कालावधी असल्यामुळे चौकशी करण्याकरिता ३-४ महिन्यांचा कालावधी देण्यात यावा. यावर समितीने यासंदर्भात कार्यवाही करण्यासाठी तीन महिन्यांचा कालावधी देण्याबाबत संमती दिली.

**उपरोक्त माहितीच्या संदर्भात अधिक माहिती जाणून घेण्यासाठी समितीने खालील मुद्यांबाबत विभागाकडून माहिती मागविली.**

अफरातफर प्रकरणामध्ये एकूण किती रक्कम गुंतलेली आहे, यामध्ये किती ग्रामसेवक, सरपंच तसेच कक्ष सहायक दोषी आढळून आलेले आहेत, किती संबंधितांविरूद्ध कारवाई करणेत आली आहे आणि किती रक्कम वसुल करण्यात आली आहे व उर्वरित गुंतलेली रक्कम वसुल करण्यासाठी कोणती कार्यवाही करणेत आली आहे, नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत?

**उपरोक्त मुद्यांसंदर्भात जिल्हा परिषदेकडून समितीस खालीलप्रमाणे लेखी माहिती प्राप्त झाली.**

सातारा जिल्हा परिषदेकडे सन २००३-२००४ ते दिनांक ३१ मार्च, २०१४ अखेर ग्रामपंचायत स्तरावरील १११ अफरातफरीची प्रकरणे स्थानिक निधी लेखापरिक्षा यांनी महाराष्ट्र ग्रामपंचायत (हिशोब तपासणी) नियम, १९६१ चा नियम १९ अन्वये कार्यवाही करण्यासाठी संदर्भित केले आहे. या प्रकरणांत एकूण रुपये ४,६७,६३,४७७.७८/– एवढी रक्कम गुंतलेली आहे.

स्थानिक निधी लेखापरिक्षा यांचेकडून महाराष्ट्र ग्रामपंचायत (हिशोब तपासणी) नियम, १९६१ च्या नियम १९ अन्वये प्राप्त झालेल्या प्रकरणांवर मुख्य कार्यकारी अधिकारी यांना शासन निर्णय ग्रामविकास विभाग क्रमांक व्हीपीएफ-१५७०/२१११६-ई दिनांक ३ नोव्हेंबर, १९७० **(परिशिष्ट ६.१)** अन्वये कार्यवाही करणेबाबत नमुद केले आहे. या शासन निर्णयानुसार गटविकास अधिकारी व विस्तार अधिकारी (पंचायत) यांचेकडून तपासणी करून घेऊन खर्च केलेल्या रक्कमेची खात्री करून जर त्यामध्ये अफरातफर आढळली तर पोलिस केस दाखल करणे किंवा वसूल करणे अशी कार्यपद्धती निर्धारित केलेली आहे.

सातारा जिल्हा परिषदेकडे संदर्भित केलेल्या १११ प्रकरणांपैकी माहे मार्च, २०१८ अखेर ७७ प्रकरणांमध्ये अंतिम निर्णय घेतला आहे. त्यापैकी रक्कम रुपये १३,६१,७५५.७४ वसूलीने व रक्कम रुपये २,७६,३८,००९.९० समायोजनाने पूर्तता झालेली आहे. सदर ७७ प्रकरणे निकाली काढताना दोषी आढळून आलेल्या ११४ ग्रामसेवक व १ माजी सरपंच यांचेवर वेतनवाढी रोखणे, ठपका ठेवणे, वसूली करणे इ. कारवाई करण्यात आली आहे.

उर्वरित ३४ प्रकरणांपैकी १० प्रकरणांमध्ये झालेल्या खर्चाची खात्री होऊ शकत नसल्यामुळे ६ ग्रामसेवक व १ सरपंच यांचेवर पोलिस केस दाखल केलेल्या आहेत. या १० प्रकरणात रुपये २५,३७,९४३.८५ एवढी रक्कम गुंतलेली आहे.

९ प्रकरणांमध्ये रक्कमेची खात्री विस्तार अधिकारी (पंचायत) व गटविकास अधिकारी यांच्या चौकशीमध्ये झाली आहे. मात्र हा खर्च करताना वेळीच कार्यवाही केली नाही म्हणून संबंधित ग्रामसेवकांवर शिस्तभंगाची कारवाई केली असून १ ग्रामसेवक बडतर्फ, ३ कार्यरत ग्रामसेवकांचेवर खाते चौकशी सुरू करण्यात आली आहे. १ ग्रामसेवक सेवानिवृत्त, १ ग्रामसेवक मयत या कारणांमुळे कारवाई करता आली नाही.

आज रोजी १५ प्रकरणे कार्यवाहीसाठी प्राप्त झाली असून त्यामध्ये रुपये १,२१,८४,३०४.२९ एवढी रक्कम गुंतलेली आहे. ही प्रकरणे तातडीने तपासून घेऊन कारवाई करण्याचे नियोजन केले आहे, जुनी कागदपत्रे आहेत, ग्रामसेवक बदलून गेले. त्यामुळे ताळमेळ घेण्यास वेळ लागत आहे.

## मंत्रालयीन विभागाचा अभिप्राय

**ग्रामविकास विभागाचे अभिप्राय.—**(वित्त-९) सदर प्रश्नाच्या अनुषंगाने जिल्हा परिषद, सातारा यांचेकडून समितीच्या निर्देशाप्रमाणे कार्यवाही करण्यात येत आहे.

## विभागीय सचिवांची साक्ष

पंचायती राज समितीने सातारा जिल्हा परिषदेला दिलेल्या भेटीच्या वेळी प्राप्त झालेल्या माहितीच्या आधारे उपरोक्त मुद्यावर अधिक माहिती घेण्यासाठी दिनांक १६ जानेवारी, २०१९ रोजी विभागीय सचिवांच्या घेतलेल्या साक्षी दरम्यान समितीने विचारणा केली की, अफरातफरीची रक्कम वसूल झालेली आहे काय, झाली नसल्यास ती का वसूल झाली नाही आणि ती रक्कम वसूल करण्यासाठी कोणत्या उपाययोजना केलेल्या आहेत, अफरातफरीची रुपये ४,६७,६३,४७७/– एवढी रक्कम वसूल करण्याचे बाकी आहे. यावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी समितीस विशद केले की, रुपये १३,६१,७५५/– वसूल केलेले आहेत. तसेच रुपये २,७६,३८,००९ समायोजित केलेले आहे. १० प्रकरणांमध्ये पोलिस केसेस आढळल्या असून, त्यामध्ये रुपये २५,३७,९४३/– एवढी रक्कम गुंतलेली आहे. सद्य:स्थितीत जिल्हा परिषदेला एकूण १५ प्रकरणांमध्ये कारवाई करावयाची आहे. त्यामध्ये रुपये १,२१,८४,३०४/– एवढी रक्कम गुंतलेली आहे. ही प्रकरणे तातडीने तपासून घेऊन कारवाई करण्याचे नियोजन केलेले आहे. अफरातफरीच्या प्रकरणांवर कारवाई करीत असताना स्थानिक लेखा निधी यांच्याकडून तपासणी करून घ्यावयाची किंवा कसे यामुळे ही प्रकरणे थांबलेली आहेत.

पुढे संचालक, स्थानिक निधी लेखा परिक्षा यांनी समितीस विशद केले की, लेखापरिक्षणाच्या वेळी पैसे दिल्याची पावती व्हॉव्हचर्स दाखविली जात नाही. त्यावेळी संशयीत अपहार केव्हा म्हटला जातो. ग्रामसेवक आता आपल्याकडे व्हॉव्हचर्स देतात आणि आता आपल्याकडून सांगितले जात आहे की, त्यामध्ये आता अफरातफर झालेली नाही. त्यामुळे आपण ती प्रकरणे निकाली काढता. आमचे असे म्हणणे आहे की, लेखापरिक्षणाच्या वेळी व्हॉव्हचर्स नव्हते मग ते आता कसे काय दिले असा प्रश्न निर्माण होत आहे. गटविकास अधिकारी यांच्या स्तरावर व्हॉव्हचर्स ठेवावे. नंतर कोणीही बोगस व्हॉव्हचर्स आणू शकते. म्हणून नंतर त्याची तपासणी करून घ्यावी, असे आमचे म्हणणे असते. त्यानंतर तुमची ॲक्शन त्यामध्ये सुरू राहणार आहे. यावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी समितीस विशद केले की, ही १५ प्रकरणे आम्ही स्थानिक लेखा निधी यांच्याकडे पुढील कार्यवाहीसाठी पाठवित आहोत. यासंदर्भात पत्र दिलेले आहे. हवे असल्यास मी पुन्हा पत्र देतो. ती प्रकरणे लवकरात लकवर तपासणी करून मिळाली तर आम्हाला पुढील कार्यवाही करणे सोपे जाणार आहे.

## अभिप्राय व शिफारशी

जिल्हा परिषद, सातारा यांचेकडून समितीस प्राप्त झालेल्या लेखी माहितीनुसार सन २००३-२००४ ते दिनांक ३१ मार्च, २०१४ अखेर ग्रामपंचायत स्तरावरील १११ अफरातफरीच्या प्रकरणामध्ये एकूण रुपये ४,६७,६३,४७७.७८/– एवढी रक्कम गुंतलेली आहे. सदर १११ अफरा-तफरीच्या प्रकरणांपैकी माहे मार्च, २०१८ अखेर ७७ प्रकरणांबाबत अंतिम निर्णय घेतलेला असून त्यापैकी रक्कम रुपये १३,६१,७५५.७४/– एवढी रक्कम वसूल करण्यात आलेली आहे व रुपये २,७६,३८,००९.९०/– एवढी रक्कम समायोजनाने पूर्तता झालेली आहे. तसेच ११४ ग्रामसेवक व १ माजी सरपंच यांचेवर वेतनवाढ रोखणे, ठपका, ठेवणे, वसूली करणे इत्यादी कारवाई करण्यात आल्याप्रकरणी समिती समाधान व्यक्त करीत आहे.

उर्वरित ३४ प्रकरणांपैकी १० प्रकरणामध्ये झालेल्या खर्चाची खात्री होऊ शकत नसल्यामुळे ६ ग्रामसेवक व १ सरपंच यांचेवर पोलीस केस दाखल केलेल्या आहेत व सदर १० प्रकरणामध्ये रुपये २५,३७,९४,३८५/– एवढी रक्कम गुंतलेली असल्याप्रकरणी समिती असमाधान व्यक्त करीत आहे. ९ प्रकरणांमध्ये रकमेची खात्री विस्तार अधिकारी (पंचायत) व गटविकास आधिकारी यांच्या चौकशीमध्ये झाली आहे. तथापि, उक्त खर्च करताना वेळीच कार्यवाही न केल्याप्रकरणी संबंधित ग्रामसेवकांवर शिस्तभंगाची कारवाई केली असून १ ग्रामसेवक बडतर्फ करण्यात आला असून ३ कार्यरत ग्रामसेवकांविरूद्ध खातेनिहाय चौकशी सुरू करण्यात आली आहे. तसेच १ ग्रामसेवक मयत असल्यामुळे त्यांचेविरूद्ध कारवाई केली नाही.

**उपरोक्त ३४ प्रकरणांपैकी १० प्रकरणांमधील रुपये २५,३७,९४,३८५ एवढी गुंतलेली रक्कम वसूल करण्यासंदर्भात तातडीने कार्यवाही करावी. वैयक्तिक रक्कम जादा असल्यास प्रसंगी फौजदारी गुन्हे दाखल करण्यासंदर्भात नोटीसेस देऊन कारवाई करावी, त्याचप्रमाणे स्थानिक निधी लेखा विभागाकडे पाठविण्यात आलेल्या १५ प्रकरणांबाबत स्थानिक निधी लेखा संचालनालय यांनी याबाबत पुढे कोणती कारवाई केलेली आहे. याबाबत केलेल्या कार्यवाहीबाबतचा सर्वंकष अहवाल समितीला दोन महिन्यांत सादर करावा, अशी समिती शिफारस करीत आहे.**

# परिशिष्ट (अ)

## शासनाचे आदेश, शासन निर्णय व परिपत्रके

जिल्हा परिषद स्तरांवर राबविण्यात येणा-या विविध योजनांचे नियोजन व अंमलबजावणी विशिष्ट मुदतीमध्ये पूर्ण करणे.

(परिशिष्ट ३.१)

**महाराष्ट्र शासन**
**ग्राम विकास व जलसंधारण विभाग**
शासन परिपत्रक क्रमांक:झेडपीए-२००८/प्र.क्र.४४६/वित्त-९
मंत्रालय, मुंबई-४०००३२, दिनांक: २० जून, २००८.

**वाचा:-** परिपत्रक क्रमांक: झेडपीए २०००/प्र.क्र.४१/३३, दिनांक : १७ जानेवारी,२००१

**परिपत्रक :-**

जिल्हा परिषदांनी योजना राबविताना योग्य वेळापत्रकानुसार योजना राबविण्यासाठी उपरोक्त शासन परिपत्रकान्वये सर्व जिल्हा परिषदांना सूचना निर्गमित करण्यात आल्या होत्या. तथापि जिल्हा परिषदांकडून केंद्र व राज्य शासन पुरस्कृत विविध योजनांची तसेच जिल्हा परिषदांनी स्वत:च्या उत्पन्नातून हाती घेतलेल्या योजनांची अंमलबजावणी करताना, उद्दीष्ट पुर्तीसाठी व्यवहार्य नियोजनाचा अभाव आणि विविध स्तरांवर घ्यावयाच्या निर्णयासाठी लागणारा विलंब, यामुळे अनेक योजनांची उद्दीष्टे पूर्ण करण्यांमध्ये आवश्यकतेपेक्षा जास्त वेळ लागणे, वर्षाअखेरीस निविदा मंजुरी, लाभार्थी निवड करणे, आर्थिक वर्ष संपल्यानंतरही साहित्याचा पुरवठा न होणे इ. सारख्या गंभीर व आक्षेपार्ह चूका मोठया प्रमाणात होताना दिसून येतात, **परिणामी जिल्हा परिषदांच्या आणि पर्यायाने शासनाच्या कार्यक्षमतेवर अकारण टीका होत राहते.** यास्तव जिल्हा परिषदेकडून राबविण्यात येणा-या विविध योजनांच्या अंमलबजावणीसाठी व्यवस्थित व जाणीव पूर्वक नियोजन करुन, त्या पध्दतीने अंमलबजावणी झाल्यास बहुतांशी योजनांची उद्दीष्टे त्याच **आर्थिक वर्षाच्या नोव्हेंबर- डिसेंबर** अखेर पूर्ण करता येणे शक्य आहे. ही बाब विचारांत घेवून विविध योजनांच्या अंमलबजावणीसाठी शासन स्तरावरुन सर्वंकष सूचना निर्गमित होणे आवश्यक आहे. **यास्तव उपरोक्त शासन परिपत्रक अधिक्रमित करण्यात येत असून,** या शासन निर्णयान्वये पुढील प्रमाणे नव्याने सूचना निर्गमित करण्यात येत आहे.

**(१) केंद्र पुरस्कृत व राज्य पुरस्कृत योजना -**

१. केंद्र पुरस्कृत योजनांच्या नियोजन व अंमलबजावणी संदर्भात विविध टप्पे निहाय करावयाची कार्यवाही व अशा कार्यवाहीची अंतिम मुदत यांची माहिती व वेळापत्रक **परिशिष्ट "अ" आणि "ब"** मध्ये नमूद करण्यात आले आहे.

२. सदर परिशिष्टामध्ये नमूद बाबीवरील कार्यवाहीची जबाबदारी संबंधीत मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी जिल्हा स्तरावर व पंचायत समिती स्तरावर प्रथम निश्चित करावी. ज्या अधिकारी आणि कर्मचा-यांवर अशी कार्यवाहीची जबाबदारी निश्चित करण्यात आली आहे. त्यांनी कार्यवाही पूर्ण न केल्यास संबंधितांविरुध्द शिस्तभंगाची कारवाई त्याच आर्थिक वर्षात मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी पूर्ण करावी.

**(२) जिल्हा परिषदांकडील हस्तांतरित योजना ( बांधकाम विषयक ) -**

केंद्र व राज्य सरकारच्या विविध योजनांपैकी ज्या योजनांमध्ये बांधकामाचा (work) समावेश आहे. अशा योजनांच्या अंमलबजावणीचे वेळापत्रक **"परिशिष्ट क"** मध्ये नमूद करण्यात आले आहे. निर्धारित वेळेनुसार प्रत्येक टप्प्याची कार्यवाही पूर्ण करण्याची जबाबदारी मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी प्रथमतःनिश्चित करावी व त्या प्रमाणे अंमलबजावणीचे विविध टप्पे मुदती मध्ये पूर्ण करावेत.

बांधकाम विषयक योजनांच्या बाबतीत काही योजनांच्या आराखडयांना किंवा कामांना शासनाची मंजूरी आवश्यक असते अशा कामांच्या बाबतीत सर्व योजनांचे आराखडे शासनाकडे मान्यतेसाठी मुदतीमध्ये सादर करण्यात यावेत यामध्ये विलंब करणा-या **अधिकारी/ कर्मचारी यांचे विरुध्द शिस्तभंगाची कार्यवाही करण्यात यावी.**

ज्या योजनेच्या आराखडयास किंवा योजनेस समिती /सभा यांची मान्यता आवश्यक असेल तर समिती /सभा यांचे समोर आराखडा मान्यतेसाठी /संमतीसाठी / शिफारसीसाठी सादर करावा. विहीत केलेल्या मुदतीमध्ये समितीची /सभेची मान्यता न मिळाल्यास मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी तसे नमुद करुन विभागीय आयुक्तांकडे महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती अधिनियम १९६१ कलम २६२ खाली प्राप्त अधिकाराचा वापर करण्यासाठी त्वरीत प्रस्ताव पाठवावा.

(३) **जिल्हा परिषदांच्या स्वतःच्या उत्पन्नातून राबविण्यात येणा-या योजना.**

जिल्हा परिषदा स्वतःच्या उत्पन्ना मधून बांधकाम विषयक व वैयक्तीक लाभांच्या येजना राबवतात. अशा योजनांच्या अंमलबजावणीचे वेळापत्रक **परिशिष्ट "ड" व "इ"** मध्ये नमुद करण्यात आले आहे.

विविध योजनांच्या अंमलबजावणी प्रक्रियेत जिल्हा परिशद स्तरांवर योजनांना प्रशासकीय मान्यता प्रदान करणे, निविदा मंजूर करणे, लाभार्थी निवड यादीस मान्यता देणे इ. बाबतचे अधिकार विषय समित्यांना प्रदान करण्यात आले आहेत. तथापि विविध कारणास्तव त्रिषय समिती समोर प्रस्ताव सादर करताना मोठया प्रमाणात विलंब होतो, असे दिसून आले आहे.

**परिशिष्ट "ड" व "इ"** मध्ये विहीत केलेल्या वेळेनुसार विषय समित्यांनी प्रस्तावांना मान्यता देणे, संबंधीत विषय समितीवर बंधनकारक राहील. अशा मान्यतेचे प्रस्ताव मुदती पूर्वी किमान १५ दिवस अगोदर संबंधित समिती /सभे समोर सादर करणे ही विभाग प्रमुखांची जबाबदारी राहील. विहित वेळेत विषय समितीची मान्यता मिळणेसाठी नियमित मासिक सभे व्यतिरिक्त विशेष सभा बोलविण्यासाठी वा विहित केलेल्या कालावधीमध्ये जिल्हा परिषद /विषय समितीची बैठक घेण्यात आली नसल्यास, अथवा याबाबत वेळ काढूपणाचे धोरण स्वीकारले जात आहे हे निदर्शनास आल्यास, मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती अधिनियम, १९६१ मधील कलम २६२ अनुसार विभागीय आयुक्तांकडे प्रस्ताव पाठवून संबंधित समिती /सभेची बैठक बोलाविण्याची कार्यवाही करावी. व त्यामध्ये या विषयाचा निर्णय घेण्यात यावा.

वस्तु /साहित्य खरेदी संदर्भात अनेक वेळा शासन दर करारासाठी प्रतिक्षा करण्यात येते. त्यामुळे साहित्य खरेदीच्या प्रक्रियेस विलंब होवून वेळेवर साहित्याचा पुरवठा होत नाही. यासाठी साहित्याच्या खरेदीसाठी शासन स्तरावर होणा-या दर कराराची वाट पाहू नये. **खरेदी करावयाच्या साहित्य /वस्तूसंबंधी त्यावेळी दर करार अस्तित्वात असेल** तरच दर करारानुसार खरेदी करण्यात यावी. अन्यथा खुल्या बाजारातून निविदा मागवून साहित्य खरेदीची प्रक्रिया वेळेतच पूर्ण करावी.

**(४) निधी खर्चासाठी कालमर्यादाः-**

विविध योजनांच्या अंमलबजावणी संदर्भात या परिपत्रकानुसार विहित केलेल्या काल मर्यादेत कार्यवाही पूर्ण करण्याची दक्षता सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी घ्यावी. आर्थिक वर्षाच्या अखेर सर्व योजनांचा निधी खर्च होणे आवश्यक आहे. चालु वर्षासाठी माहे फेब्रुवारी २००९ नंतर कोणताही अखर्चित निधी शासनाच्या परवानगी शिवाय खर्च करता येणार नाही. तसेच सन २००८-०९ पासून पुढे अखर्चित निधी खर्चासाठीची **अंतीम मर्यादा जानेवारी अखेरची** राहील. याची नोंद सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी घ्यावी.

हे परिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या वेबसाईटवर उपलब्ध करण्यात आले असून, त्याचा संगणक संकेतांक २००८०५१४१७४८५८००१ असा आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या नांवाने व आदेशानुसार,

( ना.रा.भागवत)
**उप सचिव, महाराष्ट्र शासन.**

प्रति,

१)महालेखाकार (लेखा व अनुज्ञेयता ) /(लेखा व परिक्षा) महाराष्ट्र-१, मुंबई.

२)महालेखाकार (लेखा व अनुज्ञेयता ) /(लेखा व परिक्षा) महाराष्ट्र-२, नागपूर.

३)वित्त विभाग, व्यय-१५ व अर्थसंकल्प-१९.

४)सर्व विभागीय आयुक्त (विकास शाखा)

५)मुख्य लेखा परिक्षक स्थानिक निधी लेखा कोकण भवन,नवी मुंबई.

६)उप मुख्य लेखा परिक्षक स्थानिक निधी लेखा नवी मुंबई, पुणे, नाशिक, औरंगाबाद, नागपूर, अमरावती.

७)सर्व जिल्हा परिषदाचे मुख्य कार्यकारी अधिकारी.

८) सर्व जिल्हा परिषदाचे मुख्य लेखा व वित्त अधिकारी.

९)सर्व जिल्हा लेखा परिक्षक अधिकारी स्थानिक निधी लेखा,

१०)ग्राम विकास व जलसंधारण विभाग, का.क्र.आस्था ४,६,८,

११)निवड नस्ती, कार्यासन क्रमांक वित्त-९.

D:\Backup\Backup\shinde\wordpro

# परिशिष्ट "अ"

## केंद्रपुरस्कृत योजना (बांधकामे)

| अ.क्र. | कार्यवाहीची बाब | सन २००८-०९ साठी सूचना | सन २००९-१० पासून पूढील कालावधीसाठी स्थायी सूचना. |
|---|---|---|---|
| १ | उद्दिष्टांची निश्चिती मागील वर्षाचे उधिष्ट ग्राहय धरावे. | ३१ मे | १५ एप्रिल पर्यंत |
| २ | उधिष्टांचे तालुका निहाय वाटप एकुण उधिष्टांच्या १० % वाढ करुन वाटप करणे. | १५ जुन | १५ एप्रिल पर्यंत |
| ३ | प्रस्ताव प्रशासकीय मंजूरीस्तव सादर करणे. | ३० जुन | ३० एप्रिल पर्यंत |
| ४ | जिल्हा स्तरावर प्रस्तावांची छाननी करुन प्रशासकीय मंजुरी प्रदान करणे. | १५ जुलै | १५ मे. |
| ५ | लाभार्थ्या सोबत करारनामे पूर्ण करणे. | १५ जुलै १५ ऑगस्ट | १५ मे ते १५ जून |
| ६ | कामाचे line out देवून कामे सुरु करणे. | १५ ऑगस्ट ते १५ सप्टेंबर | १५ जून ते १५ जूलै |
| ७ | बांधकामे पूर्ण करणे. | १५ सप्टेंबर ते ३१ डिसेंबर, ०९ | १५ जुलै ते ३१ डिसेंबर |
| ८ | बांधकाम पूर्णत्वाचे दाखले प्रदान करणे. | ३१ जानेवारी पर्यंत | ३१ जानेवारी पर्यंत |
| ९ | अंतिम देयके अदा करणे. | फेब्रुवारी अखेर | ३१ जानेवारी पर्यंत |
| १० | बांधकामाचे हस्तांतरण व नोंदी घेणे | मार्च | मार्च |

D:\VG\VITT-9CR-446-20-5-08

# परिशिष्ट "ब"
# केंद्रपुरस्कृत वैयक्तीक लाभांच्या योजना
# स्वर्णजयंती ग्राम स्वरोजगार योजना

| अ.क्र. | कार्यवाहीची बाब | सन २००८-०९ साठी सूचना | सन २००९-१० पासून पुढील कालावधीसाठी स्थायी सूचना. |
|---|---|---|---|
| १ | पुढील वर्षाचे नियोजन करणे. | मे पूर्वी | मार्च पूर्वी |
| २ | तालुकानिहाय उद्दिष्ट वाटप करणे. | १५ जून पर्यंत | १५ एप्रिल पर्यंत |
| ३ | कर्ज प्रकरणे/प्रस्ताव सादर करणे. | ३१ जुलै पर्यंत | ३० जून पर्यंत |
| ४ | कर्ज प्रकरणे/प्रस्ताव बँकांकडे सादर करणे. | ३१ ऑगस्ट पर्यंत | ३१ जुलै पर्यंत |
| ५ | कर्ज प्रकरणास मंजूरी प्राप्त करुन घेणे. | ३१ ऑक्टोबर पर्यंत - | ३० सप्टेंबर पर्यंत |
| ६ | कर्ज प्रकरणे वाटप करणे | फेब्रुवारी अखेर | जानेवारी अखेर |

D:\Backup\Backup\shinde\wordpro

61

## परिशिष्ट " क "

## जिल्हा परिषदांकडील बांधकाम विषयक शासकीय योजना

CR, SR, MNP, NON MNP वैधानिक विकास मंडळ, तीर्थक्षेत्र विकास योजना, १२ वा वित्त आयोग (राज्य स्तर ), गौण खनिज इत्यादी अनुदान.

| अ.क्र. | कार्यवाहीची बाब | सन २००८-२००९ साठी सुचना | सन २००९ -२०१० पासून पुढील कालावधीसाठी स्थायी सूचना |
|---|---|---|---|
| १ | वार्षिक नियोजन आराखडा तयार करणे. | ३१ मे पर्यंत | ३० एप्रिल पर्यंत |
| २ | आवश्यकतेनुसार आराखडयास समिती/सभा यांची मान्यता घेण्यासाठी आराखडा समिती/ सभेला सादर करणे. | १५ जून | १५ मे |
| ३ | आराखडा मंजूरीसाठी शासनास सादर करणे. | जून अखेर पर्यंत | मे अखेर पर्यंत |
| ४ | कामांना प्रशासकीय व तांत्रिक मंजूरी प्रदान करणे. | जुलै अखेर | जून अखेर |
| ५ | कामाची निविदा प्रक्रीया पूर्ण करणे. | सप्टेंबर अखेर | ऑगस्ट अखेर |
| ६ | कामाचे कार्यारंभ आदेश देणे. | १५ऑक्टोबर | १५ सप्टेंबर |
| ७ | कामाचे line out देवून कामे सुरु करणे. | ऑक्टोबर अखेर | सप्टेंबर अखेर |
| ८ | कामाचे पूर्णत्वाचे दाखले देवून अंतिम देयकाची अदाई करणे. | फेब्रुवारी अखेर | जानेवारी अखेर |
| ९ | विनियोग दाखले घेणे. | ३१ मार्च | ३१ मार्च |

## परिशिष्ट "ड"

## जिल्हा परिषदाकडील बांधकाम विषयक शासकीय योजना

| अ.क्र. | कार्यवाहीची बाब | सन २००८-०९ साठी सुचना | सन २००९-१० पासून पुढील कालावधीसाठी स्थायी सूचना. |
|---|---|---|---|
| १ | योजनाची निवड व अर्थसंकल्पीय तरतूद करणे. | ३१ मे | ३१ मार्च पूर्वी मागील वर्षाची |
| २ | योजनेचे प्रारुप व कामांना प्रशासकीय आणि तांत्रिक मंजूरी प्रदान करणे. | ३१ जुलै | ३१ मे |
| ३ | कामांची निविदा प्रक्रिया पूर्ण करणे. | ३० सप्टेंबर | ३० जुलै |
| ४ | कामाचे कार्यारंभ आदेश देणे. | १५ ऑक्टोबर | १५ ऑगस्ट |
| ५ | कामाचे line out देवून कामे सुरु करणे. | १६ ऑक्टोबर ते ३० नोव्हेंबर | १६ ऑगस्ट ते ३० सप्टेंबर |
| ६ | काम पूर्णत्वाचे दाखले देवून अंतिम देयकाची अदाई करणे. | फेब्रुवारी अखेर | जानेवारी अखेर |
| ७ | विनियोग दाखले घेणे. | ३१ मार्च | ३१ मार्च |

63

## परिशिष्ट " इ "
## जिल्हा परिषदांकडील वैयक्तीक लाभांच्या योजना.

| अ.क्र. | कार्यवाहीची बाब | सन २००८-२००९ साठी सुचना | सन २००९-२०१० पासून पुढील कालावधीसाठी स्थायी सुचना |
|---|---|---|---|
| १ | योजनांची निवड व अर्थसंकल्पात तरतूद करणे. | मे पूर्वी | मार्च पूर्वी |
| २ | विविध योजनांचे प्रारुप निश्चित करुन त्यास विषय समितीची मान्यता / मंजूरी घेणे. | ३० जून | ३० एप्रिल |
| ३ | योजनेस प्रशासकीय व तांत्रिक मंजूरी देणे. | ३१ ऑगस्ट | ३० जून पर्यंत |
| ४ | पंचायत समिती निहाय उद्दिष्ट वाटप व प्रस्ताव मागणे, प्रस्तावाची छाननी करणे. | ३१ जुलै अखेर | ३१ मे अखेर |
| ५ | लाभार्थीची निवड करणे. | ३१ जुलै अखेर | ३१ मे अखेर |
| ६ | निविदा प्रक्रीया पूर्ण करुन खरेदीस सक्षम अधिकारी/समितीची मान्यता घेणे. | ३१ ऑक्टोबर पर्यंत | ३१ ऑगस्ट पर्यंत |
| ७ | साहित्य खरेदीचे पुरवठा आदेश. | ३० नोव्हेंबर | ३० सप्टेंबर |
| ८ | लाभार्थ्यांना साहित्य वाटप करणे. | ३१ जानेवारी | ३० नोव्हेंबर |
| ९ | पुरवठादाराचे देयके अदा करणे. | फेब्रुवारी पर्यंत | ३१ जानेवारी |
| १० | विनियोग दाखले प्राप्त करुन घेणे. | मार्च | मार्च |

BSE¤E0 485-6+

(परिशिष्ट ५.१)

राज्यातील ग्रामीण व नागरी भागात पिण्याच्या पाण्याच्या टंचाई निवारणार्थ घ्यावयाच्या उपाययोजनांबाबत.

**महाराष्ट्र शासन**
**पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग**
**शासन परिपत्रक क्रमांकः टंचाई २०१८/प्र.क्र. २०/पापु-१४**
जी. टी. रुग्णालय संकुल, ७ वा मजला,
मंत्रालय मुंबई-०१
तारीखः १४ फेब्रुवारी, २०१८

वाचा :-

१) शासन निर्णय, पा.पु. व स्व. वि., क्रमांकः टंचाई ३०९९/प्र.क्र.१३/पापु-१४, दिनांक १ फेब्रुवारी, १९९९.
२) शासन निर्णय, पा.पु. व स्व. वि., क्रमांकः टंचाई २०९९/प्र.क्र.१४/पापु-१४, दिनांक २ फेब्रुवारी, १९९९.
३) शासन निर्णय, पा.पु. व स्व. वि., क्रमांकः टंचाई १०९९/प्र.क्र.१२/पापु-१४, दिनांक ३ फेब्रुवारी, १९९९.
४) शासन परिपत्रक, पा.पु. व स्व. वि., क्रमांकः टंचाई १००५/प्र.क्र.३०५/पापु-१४, दिनांक २४ जानेवारी, २००६.
५) शासन परिपत्रक, पा.पु. व स्व. वि., क्रमांकः टंचाई १००६/प्र.क्र.१०६/पापु-१४, दिनांक १६ मे, २००६.
६) शासन निर्णय, पा.पु. व स्व. वि., क्रमांकः टंचाई २००८/प्र.क्र.१४९/पापु-१४, दिनांक २१ ऑगस्ट, २००९.
७) शासन परिपत्रक, पा.पु. व स्व. वि., क्रमांकः टंचाई १०१३/प्र.क्र.८४१/पापु-१४, दिनांक ४ जानेवारी, २०१४.
८) शासन निर्णय, पा.पु. व स्व. वि., क्रमांकः टंचाई २०१४/प्र.क्र.४८/पापु-१४, दिनांक ६ मे, २०१४.

**परिपत्रक :-**

राज्यात बहुतांशी वर्षी अपुऱ्या पर्जन्यमानामुळे किंवा अन्य कारणांमुळे ग्रामीण/नागरी क्षेत्रात पिण्याच्या पाण्याची टंचाई निर्माण होत असते. शासनाने पिण्याच्या पाण्याच्या टंचाई निवारणार्थ ग्रामीण/नागरी क्षेत्रात घ्यावयाच्या उपाययोजनांकरिता वेळोवेळी स्थायी आदेशांद्वारे सविस्तर सूचना दिलेल्या आहेत.

महाराष्ट्र भूजल (विकास व व्यवस्थापन) अधिनियम, २००९ मधील प्रकरण ४ च्या कलम २५ नुसार जेथे जेथे पिण्याच्या पाण्याची टंचाई भासण्याची शक्यता आहे अशा क्षेत्रास वर्षाच्या कोणत्याही कालावधीत (अगदी पावसाळयातही) पाणी टंचाई क्षेत्र म्हणून घोषीत करण्याचे अधिकार जिल्हा प्रशासनाला आहेत.

महाराष्ट्र भूजल (विकास व व्यवस्थापन) अधिनियम, २००९ मधील उपरोक्त तरतूदी विचारात घेता ज्या ठिकाणी पाणी टंचाई क्षेत्र घोषीत होईल त्या ठिकाणी जिल्हाधिकाऱ्यांनी सर्वप्रथम सार्वजनिक उद्भवातील पाण्यावर संभाव्य दुष्परिणाम थांबविण्याच्या दृष्टीने प्रस्तुत अधिनियमातील तरतूदी नुसार प्रतिबंधात्मक कार्यवाही करावी. ही उपाययोजना करुनही संबंधित गावांत/वाडयांत पिण्याच्या पाण्याची टंचाई भासल्यास म्हणजेच दरडोई दर दिवशी पिण्याच्या पाण्याची उपलब्धता २० लिटर्स पेक्षा कमी झाल्यास टंचाई अंतर्गत घेण्यात येणाऱ्या उपाययोजनांमधील उपयुक्त टंचाई निवारक उपाययोजना घेण्याचे अधिकार जिल्हाधिकारी यांना आहेत.

शासनाने पिण्याच्या पाण्याच्या टंचाई निवारणार्थ ग्रामीण/नागरी क्षेत्रात द्यावयाच्या उपाययोजनांकरिता वेळोवेळी स्थायी आदेशाव्दारे सविस्तर सूचना दिलेल्या आहेत. त्या धर्तीवर राज्यातील संभाव्य पिण्याच्या पाण्याच्या टंचाईचे निवारण करण्यासाठी खालीलप्रमाणे दक्षता घेण्याबाबत/उपाययोजना राबविण्याबाबत पुन:श्च सूचना देण्यात येत आहेत.

१) बऱ्याचदा राज्यात पावसाचे प्रमाण समाधानकारक असले तरी त्याचे प्रमाण सर्वत्र समान नसते. त्यामुळे राज्यातील काही जिल्ह्यांत/भागांत पिण्याच्या पाण्याची टंचाई निर्माण होत असते. हे लक्षात घेऊन शासनाच्या संदर्भाधिन स्थायी आदेशातील सूचनांच्या अनुषंगाने टंचाई कालावधीत तत्परतेने कार्यवाही सुरु करणे अपेक्षीत आहे.

२) पाणी टंचाई निवारणार्थ उपाययोजना प्रस्तावित करताना त्या खरोखरच गरजेप्रमाणे आवश्यक आहेत काय याची खात्री करावी. टंचाई निवारण कार्यक्रमांतर्गत घेण्यात येणारी उपाययोजना मंजूर करताना ती किमान खर्चाची असल्याची दक्षता घेण्यात यावी. उपाययोजना कार्यान्वीत होण्यासाठी लागणारा वेळ व उपाययोजना कार्यान्वीत केल्यानंतर त्याव्दारे प्रत्यक्ष उन्हाळ्यात लोकांना पाणी उपलब्ध होईल किंवा कसे हे विचारात घेऊन उपाययोजना मंजूर करण्याबाबत वेळोवेळी सुचना देऊनही असे निदर्शनास आले आहे की, टंचाई कृती आराखड्यात प्रस्तावित उपाययोजनांना मे/जून महिन्यात मंजूरी दिली जाते व उपाययोजना प्रत्यक्ष कार्यान्वीत होईपर्यंत पावसाळा सुरु होतो. यासाठी टंचाई कालावधीसाठी तयार करण्यात येणाऱ्या टंचाई कृती आराखडयातील उपाययोजनांना वेळीच मंजुरी देऊन त्या प्रत्यक्षात कार्यान्वित होऊन, उन्हाळयातील टंचाईच्या काळात पिण्याचे पाणी उपलब्ध होईल याची दक्षता घेण्यात यावी.

३) संभाव्य पिण्याच्या पाण्याच्या टंचाईचे निवारण करण्याच्या दृष्टीने गावातील पिण्याच्या पाण्याच्या अस्तित्वात असलेल्या योजना नादुरुस्त झाल्या असतील तर त्या फेब्रुवारी पूर्वी दूरुस्त करुन, ग्रामस्थांस उन्हाळयात सदर योजनांपासून किमान पिण्याच्या पाण्याचा पुरवठा होईल अशी दक्षता सर्व संबंधित यंत्रणांनी घ्यावी. जेणेकरुन टंचाई निवारण कार्यक्रमाखाली आणखी अन्य तत्कालिन उपाययोजना करुन ग्रामस्थांना पाणी पुरवठा करण्याची आवश्यकता भासणार नाही.

४) **विंधण विहिरीचा कार्यक्रम :-** संभाव्य टंचाईग्रस्त गावांना नवीन विंधण विहिरी घेण्याचा पर्याय किफायतशीर ठरणार असेल तर तेथे पाणी टंचाई सुरु होण्यापूर्वी नवीन विंधण विहिरी घेता येतील असे पहावे. केवळ पाणी टंचाई कार्यक्रमांतर्गत विंधण विहिरी न घेता आमदारांच्या स्थानिक विकास कार्यक्रम व पाणी पुरवठयाच्या इतर योजनांतर्गत तरतुदींचाही पुरेपूर वापर करण्यात यावा.

५) **प्रगतीपथावरील नळ योजना शिघ्र गतीने पुर्ण करणे :-** संभाव्य पाणी टंचाईग्रस्त गावांतील ज्या नळ योजनांची पूर्वीच हाती घेतलेली कामे प्रगतीपथावर असतील व ती पूर्ण झाल्यास, चालू वर्षाच्या उन्हाळयात ग्रामस्थांना त्याचा लाभ मिळणार असेल तर अशा योजनांच्या कामांना प्राधान्य देऊन योजनांतर्गत निधीचा पुरेपूर वापर करुन त्या त्वरीत पूर्ण करण्यात याव्यात.

६) **तात्पुरत्या नळ योजना घेणे :-** टंचाई निवारण कार्यक्रमांतर्गत तात्पुरत्या पूरक नळ योजना किमान खर्चाच्या असाव्यात. तसेच सदर योजनांची अंदाजपत्रके व आराखडे मोका पाहणीवर आधारीत व प्रत्यक्ष भूस्तर तपासणी करुन वस्तुनिष्ठ तयार करावीत. तसेच पूर्वीच्या योजनेच्या साधनसामुग्रीचा योग्य तो वापर करण्यात यावा. योजना मंजूर करताना निविदा प्रक्रिया, साहित्याची उपलब्धता इ. सर्व बाबी लक्षात घेऊन योजना प्रत्यक्षात कार्यान्वित होण्यासाठी लागणारा कालावधी विचारात घेण्यात यावा. **दिनांक ३१ मार्च नंतर तातडीच्या पाणी पुरवठा योजनांना क्षेत्रीय स्तरावर मंजूरी देण्यात येऊ नये.**

शासन स्तरावर तसेच क्षेत्रीय स्तरावर मंजूर केलेल्या तात्पुरत्या पाणी पुरवठा योजनांसाठी सुरुवातीला शासनाकडून अनुज्ञेय अनुदानाच्या ५०% अनुदान उपलब्ध करुन देण्यात यावे. योजनेचे काम पूर्ण झाल्यानंतर उर्वरित ५०% अनुदानांची मागणी करताना ती संदर्भ क्र. ३ च्या शासन परिपत्रकात नमूद विवरणपत्रातच करावी. उर्वरित ५०% अनुदान शासनाच्या परवानगी शिवाय देण्यात येऊ नये.

७) **नळ योजनांची विशेष दुरुस्ती :-** नळ योजनांच्या विशेष दुरुस्तीचे प्रस्ताव हे टंचाई निवारणार्थ इतर उपाययोजना घेण्यापेक्षा व्यवहार्य ठरत असतील तरच जिल्हाधिकारी व विभागीय आयुक्त यांनी त्यांना असलेल्या वित्तीय अधिकारात मंजूर कराव्यात. सदर प्रस्ताव मंजूर करताना निविदा प्रक्रिया, साहित्याची उपलब्धता इ. सर्व बाबी लक्षात घेऊन योजना प्रत्यक्षात कार्यान्वित होण्यासाठी लागणारा कालावधी विचारात घेण्यात यावा. **दिनांक ३१ मार्च नंतर नळ योजनेतील विशेष दुरुस्त्यांना क्षेत्रिय स्तरावर मान्यता देण्यात येऊ नये.**

८) **विहिरी खोल करणे व गाळ काढणे :-** विहिरीची खोली आवश्यकतेपेक्षा कमी असल्यास स्त्रोताची क्षमता कमी होते म्हणून बऱ्याच वेळा नवीन स्त्रोत निर्माण करुन दयावा लागतो. नवीन स्त्रोत निर्माण करण्यापेक्षा उपलब्ध स्त्रोत पूर्णत: विकसित करणे आर्थिक दृष्टया किफायतशीर होईल. तसेच विहिरीची खोली वाढविल्याने पाण्याची आवक वाढून पाण्याच्या टंचाईची तिव्रता कमी होऊ शकेल. याबाबी विचारात घेऊन विहिरी खोल करणे कार्यक्रम प्राधान्याने राबविण्यात यावा.

९) **टँकर/बैलगाडी द्वारे पाणी पुरवठा करणे :-** आकस्मिक उपाययोजनांव्दारे पिण्याच्या पाण्याचा पुरवठा करणे शक्य नसल्यास टँकर/बैलगाडीने पाणी पुरवठा करणे ही एक खर्चिक बाब असल्याने ती उपाययोजना अपरिहार्य परिस्थितीतच मंजूर व्हावी. शासकीय टँकर/वाहने अपुरे पडतील अशा वेळीच खाजगी टँकरने पाणी पुरवठा करण्यास मंजूरी द्यावी. पिण्याच्या पाण्याच्या तीव्र टंचाईच्या काळात टँकरने पाणी पुरवठा करणे ही योजना अधिक कार्यक्षमरित्या राबविली जावी व तक्रारीस वाव राहू नये या दृष्टीकोनातून संदर्भीय शासन परिपत्रक क्रमांक ४ अन्वये दिलेल्या मार्गदर्शक सूचनांची काटेकोरपणे अंमलबजावणी करण्यात यावी.

**अ) गावासाठी टँकर मंजूरीचे प्रस्ताव तहसिलदार, उपविभागीय कार्यालय व जिल्हाधिकारी कार्यालय यांच्या स्तरावर चार दिवसांपेक्षा जास्त काळ प्रलंबित ठेवू नयेत.** या प्रकरणी जिल्हाधिकाऱ्यांनी तात्काळ निर्णय घेणे आवश्यक आहे.

ब) शासनाच्या असे निदर्शनास आले आहे की, टँकरच्या निविदा प्रक्रिया, टँकरच्या खेपा याबाबतचे नियंत्रण क्षेत्रीय स्तरावरुन ठेवले जात नसल्याने, टँकरने पाणी पुरवठा करण्यासंदर्भात अनेक तक्रारी प्राप्त होत असतात. तसेच टंचाई कालावधीत गावामध्ये टँकर्स आल्यास टँकरच्या दिशेने लोकांची झुंबड उडते व त्यातून तणाव निर्माण होतो. काही वेळा अपघात होऊन लोक मृत्यू देखील पावतात. त्यामुळे ज्या गावामध्ये पाणी पुरवठा करण्यात येणार आहे, त्या ठिकाणी सर्व नागरिकांना टँकर पोहोचण्यापूर्वी सूचना देण्यात याव्यात. सूचना देण्यासाठी दूरध्वनी, एसएमएस अथवा अन्य सोईच्या पर्यायांचा विचार करण्यात यावा. संबंधित गावातील नागरिकांना पाणी उपलब्ध होण्यासाठी त्या गावामध्ये जेवढी पाण्याची आवश्यकता आहे, तेवढेच पाणी टँकरद्वारे पुरविण्याच्या दृष्टीने योग्य ते नियोजन करावे. जेणेकरुन तेथील नागरिकांना योग्य पाणी पुरवठा होऊन अनुचित प्रकार घडणार नाही, याची कृपया दक्षता घ्यावी.

क) शासनाच्या असेही निदर्शनास आले आहे की, टँकरच्या फे-या नियोजीत वेळापत्रकाप्रमाणे निर्धारीत वेळेत होत नाहीत. टँकरच्या बनावट फे-या दाखवून देयके अदा करण्यात येतात. **असे गैरप्रकार टाळण्याच्या दृष्टीने टँकर्सवर जी पी एस प्रणालीचा वापर अनिवार्य करण्यात आलेला आहे. सदर प्रणाली बसविणे, त्याची देखभाल दुरुस्ती याबाबीचा सर्व खर्च संबंधित टँकर वाहतूक धारकाने करण्याबाबतची अट टँकर्स वाहतूक धारकांसोबत करण्यात येणाऱ्या करारनाम्यात नमूद करावी. पाणी पुरवठा करणाऱ्या टँकरवर GPS प्रणाली बसविल्यानंतर GPS प्रणालीवर ज्या टँकरची नोंद होईल त्याच फेऱ्या देयकाकरिता अनुज्ञेय होतील. ज्या पाणी पुरवठा करणाऱ्या टँकरवर GPS प्रणाली नसेल किंवा GPS प्रणाली असूनही त्या बंद असल्याकारणाने टँकर वाहतूक धारकाने टँकरच्या फेऱ्या झाल्याचा दावा केला असल्यास अशा फेऱ्या बनावट ठरतील. त्यांची देयके अदा करण्यात येऊ नये.**

१०) अ) विहित आर्थिक व भौतिक निकषात न बसणाऱ्या तात्पुरत्या पूरक नळ योजनांचे व नळ योजनांच्या विशेष दुरुस्तीचे प्रस्ताव हे टंचाई निवारणार्थ इतर उपाय योजना

घेण्यापेक्षा व्यवहार्य ठरत असतील तरच योग्य शिफारशींसह शासन स्तरावर विशेष बाब म्हणून मंजूरीसाठी तातडीने सादर करावेत. याबाबत असे निदर्शनास आले आहे की, जिल्हा परिषद स्तरावरुन जिल्हाधिकारी व विभागीय आयुक्तांमार्फत प्रस्ताव शासनाकडे प्राप्त होण्यास २-३ महिन्याचा कालावधी लागतो. परिणामी योजना प्रत्यक्षात वेळीच कार्यान्वित न झाल्याने पाणी टंचाई निवारणार्थ उपाययोजना घेण्याचा हेतू सफल होत नाही. पाणी टंचाई ही अत्यंत संवेदनशील बाब असल्याने, प्राप्त प्रस्ताव कोणत्याही स्तरावर आठ दिवसापेक्षा जास्त दिवस प्रलंबित राहणार नाहीत, याची दक्षता संबंधित कार्यालयांनी घ्यावी.

ब) तात्पुरत्या पूरक नळ योजना व नळ योजनांच्या विशेष दुरुस्तीच्या योजनांना शासन स्तरावरुन सुध्दा विशेष बाब म्हणून दिनांक १५ एप्रिल नंतर मंजूरी देण्यात येणार नाही. जेणेकरुन एक महिन्याच्या आत कामे पूर्ण होऊन प्रत्यक्ष उन्हाळयात योजनांचा लाभ जनतेला मिळू शकेल.

११) पाणी टंचाई निवारण कार्यक्रमांतर्गत घेतलेल्या उपाययोजनांवरील खर्च भागविण्यासाठी केंद्र शासनाच्या नैसर्गिक आपत्ती निवारण सहाय्यामधून निधी प्राप्त होत असतो. **सदर निधीतून प्रत्यक्ष खर्च केलेल्या निधीची उपाययोजनानिहाय व जिल्हानिहाय माहिती दरमहा तसेच वेळोवळी शासनास सादर करणे आवश्यक आहे. प्राप्त निधी, प्रत्यक्ष झालेला खर्च, शिल्लक निधी इत्यादी बाबतची माहिती व उपयोगीता प्रमाणपत्रे सादर केल्याशिवाय पुढील निधी वितरीत केला जाणार नाही याची नोंद घ्यावी.** सदर बाब विचारात घेऊन उपलब्ध करुन दिलेल्या शासकीय निधीचा योग्य विनियोग करुन उपयोगीता प्रमाणपत्रे शासनास तात्काळ सादर करण्याची तसेच निधीचा गैरवापर होणार नाही याबाबत क्षेत्रीय अधिका-यांनी दक्षता घ्यावी.

**अ) आर्थिक वर्षात वाटप करण्यात आलेल्या निधीची त्या वर्षीच्या दिनांक ३१ मार्च पर्यंत घेण्यात येणाऱ्या टंचाई उपाययोजनांसाठी आवश्यकता नसल्यास शिल्लक निधी विहित वेळेत शासनाकडे समर्पित करण्यात यावा. सदर निधी पुढील आर्थिक वर्षी घेण्यात येणाऱ्या उपाययोजनेच्या खर्चासाठी शिल्लक ठेवण्यात येऊ नये. असे करणे ही एक आर्थिक अनियमितता आहे.**

ब) **रक्कम वेळेवर अदा करणे** :- शासनाकडून अनुदान उपलब्ध झालेले असताना केलेल्या कामाची देयके, प्राप्त झाल्यापासून एक महिन्याच्या आत कोणत्याही परिस्थितीत अदा करता येईल याकडे विशेष लक्ष दयावे.

१२) तक्रारीचे **निवारण** :- जनतेकडून येणा-या पाणी टंचाईच्या तक्रारींची तत्परतेने नोंद घेऊन उपाययोजना करण्यात याव्यात. पाणी टंचाई निवारण कार्यक्रम राबविण्यात कसूर झाल्यास लोकप्रतिनिधीकडून व वृत्तपत्रातून मोठया प्रमाणात तक्रारी मांडल्या जातात. ही वस्तूस्थिती विचारात घेऊन अशा तक्रारींना वाव राहू नये म्हणून वरील प्रमाणे तातडीने कार्यवाही करावी.

सदर शासन परिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१८०२१४१३४४०४२४२८ असा आहे. हे परिपत्रक डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Sham Lal Goyal

Digitally signed by Sham Lal Goyal
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=General Administration, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=fef8a156550c1999143688f755340a6b9d3ad380fcde16709e4e63210467e734, serialNumber=19d0cb2b5b2018974e0c848afbd781451d1c4c0d347d2a12395c8dffac4670f9, cn=Sham Lal Goyal
Date: 2018.02.14 15:00:51 +05'30'

**(शाम लाल गोयल)**
अपर मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

१. मा. अध्यक्ष, विधानसभा/मा. सभापती, विधान परिषद, विधानभवन, मुंबई.
२. मा. विरोधी पक्षनेता विधानसभा/विधान परिषद, विधानभवन, मुंबई.
३. सर्व विधान सभा सदस्य/विधान परिषद सदस्य, विधानभवन, मुंबई.
४. मा. राज्यपाल यांचे सचिव.
५. मा. मुख्यमंत्री यांचे अपर मुख्य सचिव.
६. सर्व मंत्री/राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव.
७. मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई-३२.
८. अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव, वित्त विभाग/नियोजन विभाग व सचिव, ग्रामविकास विभाग, मंत्रालय, मुंबई.
९. अपर मुख्य सचिव, महसूल व वनविभाग (मदत व पुर्नवसन), मंत्रालय, मुंबई-३२.
१०. सदस्य सचिव, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, मुंबई.
११. विभागीय आयुक्त, (सर्व).
१२. जिल्हाधिकारी (सर्व).
१३. संचालक, भुजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणा, पुणे.
१४. जिल्हा परिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी, (सर्व).
१५. कार्यकारी अभियंता (सर्व) ग्रामीण पाणी पुरवठा /जिल्हा परिषद.
१६. निवड नस्ती (पापु-१४).

(परिशिष्ट ५.२)

**टंचाई परिस्थितीत टँकर्सचे अधिकार उप विभागीय अधिकारी यांना प्रदान करणेबाबत....**

**महाराष्ट्र शासन**
**महसूल व वन विभाग,**
**शासन निर्णय क्रमांक : एससीवाय-२०१८/प्र.क्र.२४७/म-७,**
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
दिनांक : २९ नोव्हेंबर, २०१८

**प्रस्तावना :**

राज्यात झालेल्या कमी पर्जन्यमानामुळे दुष्काळी परिस्थिती निर्माण झालेली आहे. राज्यात १५१ तालुक्यांमध्ये व २६८ महसूली मंडळामध्ये दुष्काळ घोषित करण्यात आला आहे. त्यानुसार विविध उपाययोजना लागू करण्यात आलेल्या आहेत. सध्या पिण्याच्या पाण्याचे टँकर्स मंजूर करण्याचे अधिकार जिल्हाधिकारी यांना आहेत. राज्यातील दुष्काळी परिस्थिती व पाण्याची टंचाई विचारात घेता टँकर्स मंजूर करण्याबाबतचे जिल्हाधिकारी यांना असलेले अधिकार संबंधित उप विभागीय अधिकारी यांना प्रदान करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय :**

दुष्काळी परिस्थिती व पिण्याच्या पाण्याची टंचाई विचारात घेऊन दुष्काळ जाहीर करण्यात आलेल्या जिल्हयांमध्ये पिण्याच्या पाण्याचे टँकर्स मंजूर करण्याचे जिल्हाधिकारी यांना असलेले अधिकार संबंधित उप विभागीय अधिकारी तथा उप विभागीय दंडाधिकारी यांना प्रदान करण्यात येत आहेत.

दुष्काळ घोषित केलेल्या जिल्हयांव्यतिरिक्त इतर जिल्हयांच्या बाबतीत पिण्याच्या पाण्याचे टँकर्स मंजूर करण्याचे अधिकार आवश्यकतेनुसार संबंधित उप विभागीय अधिकारी तथा उप विभागीय दंडाधिकारी यांना प्रदान करण्यासाठी विभागीय आयुक्तांना प्राधिकृत करण्यात येत आहे.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक २०१८११२९१७५५०६५०१९ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने सांक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

**महाराष्ट्राचे राज्यपाल यांचे आदेशानुसार व नावाने.**

Subhash Hanmant Umaranikar

Digitally signed by Subhash Hanmant Umaranikar
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Revenue and Forest Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=d5ea2bb9565eeb9b02d583f130371941a03fc5d98df65d3daafe66960a165024, serialNumber=596a24adfcfcd3edb4245812c0eaccecdf4de3ec6a308b42a682a980bca4db38, cn=Subhash Hanmant Umaranikar
Date: 2018.11.29 17:58:36 +05'30'

**(सुभाष उमराणीकर)**
**उप सचिव, महाराष्ट्र शासन**

प्रति,

१. अपर मुख्य सचिव, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, मंत्रालय, मुंबई
२. सर्व विभागीय आयुक्त
३. सर्व जिल्हाधिकारी
४. सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद
५. सर्व कार्यकारी अभियंता, जिल्हा परिषद
६. सर्व जिल्हा कोषागार अधिकारी

७. सर्व कार्यकारी अभियंता, जिल्हा परिषद / पाटबंधारे विभाग / सार्वजनिक बांधकाम विभाग
८. सदस्य सचिव, महाराष्ट्र पाणी पुरवठा व जलनिस्सारण मंडळ, मुंबई
९. सर्व मुख्य अभियंता, ग्रामीण / नागरी पाणी पुरवठा
१०.महालेखापाल / (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र राज्य, मुंबई / नागपूर
११.महालेखापाल /, (लेखापरीक्षा) महाराष्ट्र राज्य मुंबई / नागपूर
१२.वित्त विभाग (अर्थसंकल्प-/व्यय-९) मंत्रालय, मुंबई
१३.अवर सचिव (म-३/म-११) महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई
१४. कार्यासन अधिकारी (पापु-१४) पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, मंत्रालय, मुंबई
१५. निवड नस्ती, कार्यासन म-७, महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई

**प्रत माहितीसाठी अग्रेषित**

१. मा.मंत्री (मदत व पुनर्वसन) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
२. मा.राज्यमंत्री (मदत व पुनर्वसन) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
३. अपर मुख्य सचिव (मदत व पुनर्वसन) यांचे स्वीय सहायक, मंत्रालय, मुंबई.

BSE 485-7+

(परिशिष्ट ६.१)

**IMMEDIATE**

Misappropriation of Village Panchayat Funds.

GOVERNMENT OF MAHARASHTRA
Rural Development Department,
Resolution No.VPF 1570/21116-E,
Sachivalaya, Bombay-32, 3rd November 1970.

**RESOLUTION**

A large number of cases of misappropriation of Village Panchayat Funds by Sarpanchas, Upa-Sarpanchas or by Village Panchayat Secretaries are constantly coming to the notice of Government. Various steps have been taken by Government from time to time with a view to minimising such cases. Some of the important measures taken by Government in this regard are as follows:-

(i) The executive powers of the Village Panchayat vest in the Sarpanch. The Bombay Village Panchayats Act, 1958, was amended in 1965 and it has been provided that the Village Panchayat Fund will be operated by the Sarpanch jointly with the Secretary. Such joint operation of the fund acts as a mutual check upon the Sarpanch and the Secretary.

(ii) The rules have suitably been amended to allow Rs.150/- only as cash on hand and Rs.500/- if the Village Panchayat is running a fair price shop. It is thus expected that large amounts will not remain on hand.

(iii) A monthly return showing daily cash balance on hand has been prescribed. The Block Development Officers have to scrutinise it with a view to seeing that large cash balances are not kept by Village Panchayats on hand. Such statements are expected to help Block Development Officers find out suspected misappropriation.

(iv) Running of fair price shops afforded larger scope for misappropriation of funds. Orders have, therefore, been issued to withdraw fair price shops from Village Panchayats. They are, however, to be withdrawn only when alternative arrangements are made. The Food and Civil Supplies Department has now fixed 30th June 1971 as the dead line for keeping shops with the Village Panchayats.

2. Orders have also been issued for dealing with misappropriation cases appropriately and expeditiously and for lodging complaints with the Police so that the defaulters are promptly brought to book. Inspite of all this, a large number of cases of misappropriation of Village Panchayat Funds still come to light. Government views this position with grave concern. The whole problem was recently reviewed by Government with particular reference to the following aspects :-

OFFICE OF THE COLLECTOR
RATNAGIRI.
Date 7 DEC 1970
Branch

(1) Preventive measures,

(2) Delay in investigation and launching of prosecution, and

(3) other measures.

After considering the above points carefully, Government is pleased to issue the following orders.

o.N

3. **Preventive measures:**

(a) Misappropriation cases come to light mainly through audit of accounts or through inspections. It is most essential to see that accounts of Village Panchayats are audited regularly and thoroughly. At present, there is a heavy backlog of audit. The Chief Auditor, Local Fund Accounts has promised that audit upto 1968-69 would be completed by the end of March 1971 and that upto 69-70 by March 1972. He is requested to take all necessary steps to achieve this and to ensure that there is regular annual audit of Village Panchayats thereafter.

(b) It has been observed that inspections of Village Panchayats by the various officers of the Zilla Parishads tend to be routine. It is essential that the inspections should be intensive and not merely routine. It should also be particularly checked, during inspections, if there are any suspected misappropriations. Government also desires that the Extension Officer (Panchayat) who is directly concerned with the affairs of Village Panchayats is required to inspect at least 10 Village Panchayats per month. The Chief Executive Officers are requested to prescribe this quota of inspections in the duties of Extension Officer (Panchayat). The Chief Executive Officer and the Administrative Officer, should also complete their own yearly quota of inspections of Village Panchayats without fail.

(c) Government is also pleased to direct that -

(i) all individual payments exceeding Rs.500/- to be made by Village Panchayats should be by cheques;

(ii) all recoveries made should first be credited into the village fund and no expenditure should be incurred directly from cash collections; and

(iii) all collections should be credited to the village fund immediately and in any case within a week.

Suitable amendments to the relevant rules under the Bombay Village Panchayats Act, 1958, will, if necessary, be made in due course. The measures should, however, be brought into effect immediately without waiting for formal amendments.

4. Delays in investigation and launching of prosecution.

There are two stages in investigation and launching of prosecution. The first is the investigation by the Block Development Officer or the Chief Executive Officer and the other by the Police after the case is reported to the Police.

(a) So far as the delay by the Police, Government is pleased to direct that -

(i) the police should not insist on audit of accounts of the Village Panchayat in each and every case. Where the case can be processed on the basis of other available data and evidence, they should proceed to launch prosecution immediately and slao try to obtain the decision of the Court as early as possible.

(ii) It is necessary to have some time limit within which investigation should be completed by the Police. Such a limit should be of 3 months.

(b) With a view to achieving uniformity in the matter of preliminary investigation by Zilla Parishad Officers and of lodging complaints with the Police authorities, Government has laid down certain procedure in Government Circular, Co-operation and Rural Development Department, No.VPA 1963/22608(A)-E, dated 4th July 1964 as amended from time to time. As this procedure leads to unnecessary delays in launching prosecutions, where necessary, Government is pleased to lay down, in supersession of the orders mentioned above, the following revised procedure :-

(i) Cases of misappropriation are unearthed as a result of either audit of accounts or complaints or inspections. Preliminary investigation by the Extension Officer (Panchayat) and the Block Development Officer is necessary to ascertain the position and to come to conclusions. It is observed that even the preliminary investigations take unduly long time. These preliminary investigations should normally be completed within a period of two months. In exceptional of complicated matters the Chief Executive Officer or the Block Development Officer may allow a time limit of 3 months.

(ii) As soon as the enquiry is completed the matter should be reported to the Chief Executive Officer. If there is a prima-facie case or a reasonable suspicion the Chief Executive Officer should take immediate action to lodge a complaint with the Police.

(iii) As the Police are bound to consult the Police Prosecutor as to whether the prosecution can be successfully launched, it is <u>not</u> necessary for the Zilla Parishad authorities to consult either the District Government Pleader or the Zilla Parishad Pleader.

5. Other Measures:-

Government is pleased to direct that -

(a) if and where a special audit of a Village Panchayat with a view to finding out defalcations becomes necessary, it should be given top priority; and

(b) in cases of technical offences and cases not likely to succeed in a Court, feasibility of taking action under section 39 of the Bombay Village Panchayats Act, 1958 against the Sarpanch/Upa-Sarpanch should be considered and he should not only be removed from office but also be disqualified for further elections. This is necessary to curb the growing tendency to misappropriate the Village Panchayat money.

By order and in the name of the Governor of Maharashtra,

S.I. KADIRI,
Deputy Secretary to the Government of Maharashtra,
Rural Development Department.

# परिशिष्ट-ब

## समितीच्या बैठकीचे संक्षिप्त कार्यवृत्त

**बुधवार, दिनांक ११ एप्रिल, २०१८**

**स्थळ : जिल्हा परिषद सभागृह, सातारा**

**उपस्थिती :**

(१) श्री. सुधीर पारवे, वि.स.स. तथा समिती प्रमुख

(२) श्री. बाबुराव पाचर्णे, वि.स.स.

(३) श्री. चरण वाघमारे, वि.स.स.

(४) श्री. रणधीर सावरकर, वि.स.स.

(५) श्री. आर. टी. देशमुख, वि.स.स.

(६) डॉ. देवराव होळी, वि.स.स.

(७) डॉ. सुरेश (भाऊ) खाडे, वि.स.स.

(८) श्री. तुकाराम काते, वि.स.स.

(९) श्री. भारत भालके, वि.स.स.

(१०) प्रा. विरेंद्र जगताप, वि.स.स.

(११) श्री. दिलीप सोपल, वि.स.स.

(१२) श्री. राहुल मोटे, वि.स.स.

(१३) श्री. दिपक चव्हाण, वि.स.स.

(१४) श्री. विक्रम काळे, वि.प.स.

**निमंत्रित सदस्य :**

(१) श्री. दत्तात्रय सावंत, वि.प.स.

**स्थानिक लोकप्रतिनिधी :**

(१) श्री. शंभुराज देसाई, वि.स.स.

(२) श्री. बाळासाहेब पाटील, वि.स.स.

(३) श्री. मकरंद पाटील, वि.स.स.

(४) श्री. जयकुमार गोरे, वि.स.स.

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय :**

(१) श्री. विलास आठवले, उप सचिव

(२) श्री. प्रकाशचंद्र खोंदले, अवर सचिव

(३) श्री. ह. वि. तामोरे, कक्ष अधिकारी

**स्थानिक निधी लेखा संचालनालय, नवी मुंबई :**

श्री. प्रताप मोहिते, संचालक, स्थानिक निधी लेखापरीक्षा

**जिल्हा परिषद पदाधिकारी :**

(१) श्री. संजीवराजे नाईक-निंबाळकर, अध्यक्ष

(२) श्री. वसंतराव मानकुमरे, उपाध्यक्ष

(३) श्री. राजेश पवार, सभापती, शिक्षण व अर्थ समिती

(४) श्री. मनोज पवार, सभापती, कृषी समिती

(५) श्रीमती वनिता गोरे, सभापती, महिला व बाल कल्याण समिती

(६) श्री. शिवाजी सर्वगोड, सभापती, समाजकल्याण समिती

(७) श्रीमती अरुणा शिर्के, सभापती, पंचायत समिती, जावली

(८) श्रीमती रजनी भोसले, सभापती, पंचायत समिती, वाई

(९) श्रीमती रुपाली राजपुरे, सभापती, पंचायत समिती, महाबळेश्वर

(१०) श्री. राजाभाऊ जगदाळे, सभापती, पंचायत समिती, कोरेगांव

(११) श्री. रमेश पाटोळे, सभापती, पंचायत समिती, माण

(१२) श्री. मारुती मोरे, सभापती, पंचायत समिती, खंडाळा

(१३) श्री. मिलिंद कदम, सभापती, पंचायत समिती, सातारा

(१४) श्रीमती शालन माळी, सभापती, पंचायत समिती, कराड

(१५) श्री. संदीप मांडवे, सभापती, पंचायत समिती, खटाव

**ग्रामविकास विभाग, मंत्रालय :**

(१) श्री. एन. बी. रिंगणे, उप सचिव, ग्रामविकास विभाग, मंत्रालय, मुंबई

(२) श्री. परमेश्वर बाबर, कक्ष अधिकारी, ग्रामविकास विभाग, मंत्रालय, मुंबई

**विभागीय आयुक्त कार्यालय, पुणे :**

(१) श्री. चंद्रकांत गुडेवार, उप आयुक्त (विकास), विभागीय आयुक्त कार्यालय, पुणे

(२) श्री. संभाजी लांगोरे, उप आयुक्त (आस्थापना), विभागीय आयुक्त कार्यालय, पुणे

(३) श्री. के. डी. भोसले, संचालक, (लेखा)

**जिल्हा परिषद, सातारा :**

(१) डॉ. कैलास शिंदे, मुख्य कार्यकारी अधिकारी

(२) श्री. पी. बी. पाटील, अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी

(३) श्री. वि. तु. पाटील, मुख्य लेखा व वित्त अधिकारी

(४) श्री. एन. एल. थाडे, प्रकल्प संचालक, जि.ग्रा.वि.यं.

(५) श्री. सत्यजित बडे, उप मुख्य कार्यकारी अधिकारी (साप्रवि)

(६) श्री. चंद्रशेखर जगताप, उप मुख्य कार्यकारी अधिकारी (ग्रामीण पाणीपुरवठा व स्वच्छता) विभाग

(७) श्रीमती पुनिता गुरव, शिक्षणाधिकारी (प्राथमिक)

(८) श्री. महेश पालकर, तत्कालिन शिक्षणाधिकारी (प्राथमिक)

(९) डॉ. भगवान पवार, जिल्हा आरोग्य अधिकारी

(१०) श्री. जे. एम. शेख, महिला व बालविकास अधिकारी

(११) श्री. एस. आर. पाटील, कार्यकारी अभियंता, बांधकाम (इमारत)

(१२) श्री. एस. बी. रोकडे, कार्यकारी अभियंता, बांधकाम (दक्षिण)

(१३) श्री. बी. पी. शिवदास, कार्यकारी अभियंता (प्रभारी), लघुपाटबंधारे विभाग

(१४) श्री. चां. ग. बागळ, कृषि विकास अधिकारी

(१५) डॉ. विनोद पवार, जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी

(१६) श्री. देविदास कुलाळ, शिक्षणाधिकारी (माध्यमिक)

(१७) श्री. एस. एस. सप्रे, प्रभारी कार्यकारी अभियंता, ग्रामीण पाणीपुरवठा विभाग

(१८) श्री. ए. जी. मगदूम, शिक्षणाधिकारी (निरंतर)

(१९) डॉ. अमिता गावंडे, गटविकास अधिकारी, पंचायत समिती, सातारा

(२०) श्री. अविनाश फडतरे, गटविकास अधिकारी, पंचायत समिती, कराड

(२१) श्रीमती एस. बी. खर्डे, गटविकास अधिकारी, पंचायत समिती, कोरेगांव

(२२) श्री. एस. एम. गायकवाड, गटविकास अधिकारी, पंचायत समिती, पाटण

(२३) श्री. गोरख शेलार, गटविकास अधिकारी, पंचायत समिती, माण

(२४) श्री. विजयसिंह जाधव, गटविकास अधिकारी, पंचायत समिती, फलटण

(२५) श्री. प्रविण सुरडकर, गटविकास अधिकारी, पंचायत समिती, खटाव

(२६) श्रीमती दिपा बापट, गटविकास अधिकारी, पंचायत समिती, खंडाळा

(२७) श्री. आर. व्ही. सांगळे, गटविकास अधिकारी, पंचायत समिती, वाई

(२८) श्री. सतिश बुध्दे, गटविकास अधिकारी, पंचायत समिती, जावली

(२९) श्री. दिलीप शिंदे, गटविकास अधिकारी, पंचायत समिती, महाबळेश्वर

**संक्षिप्त कार्यवृत्त :**

समितीने सातारा जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी व इतर सर्व संबंधित अधिकारी यांची सन २०१२-२०१३ च्या लेखा परीक्षा पुनर्विलोकन अहवालातील सातारा जिल्हा परिषदेशी संबंधित असलेल्या परिच्छेदांवर साक्ष घेतली.

**गुरुवार, दिनांक १२ एप्रिल, २०१८**

**स्थळ : जिल्हा परिषद सभागृह, सातारा**

**उपस्थिती :**

(१) श्री. सुधीर पारवे, वि.स.स. तथा समिती प्रमुख

(२) श्री. बाबुराव पाचर्णे, वि.स.स.

(३) श्री. चरण वाघमारे, वि.स.स.

(४) श्री. रणधीर सावरकर, वि.स.स.

(५) डॉ. देवराव होळी, वि.स.स.

(६) डॉ. सुरेश (भाऊ) खाडे, वि.स.स.

(७) श्री. भरतशेठ गोगावले, वि.स.स.

(८) श्री. किशोर पाटील, वि.स.स.

(९) श्री. तुकाराम काते, वि.स.स.

(१०) श्री. राहुल बोंद्रे, वि.स.स.

(११) श्री. भारत भालके, वि.स.स.

(१२) प्रा. विरेंद्र जगताप, वि.स.स.

(१३) श्री. दिलीप सोपल, वि.स.स.

(१४) श्री. राहुल मोटे, वि.स.स.

(१५) श्री. दिपक चव्हाण, वि.स.स.

(१६) श्री. विक्रम काळे, वि.प.स.

(१७) श्री. अमरनाथ राजूरकर, वि.प.स.

**निमंत्रित सदस्य :**

(१) श्री. श्रीकांत देशपांडे, वि.प.स.

(२) श्री. दत्तात्रय सावंत, वि.प.स.

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय :**

(१) श्री. विलास आठवले, उप सचिव

(२) श्री. प्रकाशचंद्र खोंदले, अवर सचिव

(३) श्री. ह. वि. तामोरे, कक्ष अधिकारी

**ग्रामविकास विभाग, मंत्रालय :**

(१) श्री. ना. भा. रिंगणे, उप सचिव, ग्रामविकास विभाग, मंत्रालय

(२) श्री. परमेश्वर बाबर, कक्ष अधिकारी, ग्रामविकास विभाग, मंत्रालय

**जिल्हा परिषद, सातारा :**

(१) डॉ. कैलास शिंदे, मुख्य कार्यकारी अधिकारी

(२) श्री. पी. बी. पाटील, अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी

(३) श्री. एन. एल. थाडे, प्रकल्प संचालक, डीआरडीए

(४) श्री. चंद्रशेखर जगताप, उप मुख्य कार्यकारी अधिकारी (ग्रामपंचायत)

(५) श्री. जावेद शेख, उप मुख्य कार्यकारी अधिकारी, महिला व बालकल्याण

(६) श्रीमती पुनिता गुरव, शिक्षणाधिकारी (प्राथमिक)

(७) श्री. देविदास कुलाळ, शिक्षणाधिकारी (माध्यमिक)

(८) श्री. ए. जी. मगदूम, शिक्षणाधिकारी (निरंतर)

(९) डॉ. भगवान पवार, जिल्हा आरोग्य अधिकारी

(१०) श्री. एस. आर. पाटील, कार्यकारी अभियंता, बांधकाम (इवद)

(११) श्री. एस. बी. रोकडे, कार्यकारी अभियंता, बांधकाम (दक्षिण)

(१२) श्री. बी. पी. शिवदास, कार्यकारी अभियंता, लघुपाटबंधारे विभाग

(१३) डॉ. चां. ग. बागल, कृषि विकास अधिकारी

(१४) डॉ. विनोद पवार, प्रभारी समाजकल्याण अधिकारी

(१५) डॉ. विनोद पवार, जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी

(१६) डॉ. अमिता गावडे, गटविकास अधिकारी, पंचायत समिती, सातारा

(१७) श्री. अविनाश फडतरे, गटविकास अधिकारी, पंचायत समिती, कराड

(१८) श्रीमती एस. बी. खर्डे, गटविकास अधिकारी, पंचायत समिती, कोरेगांव

(१९) श्री. एस. एम. गायकवाड, गटविकास अधिकारी, पंचायत समिती, पाटण

(२०) श्री. गोरख शेलार, गटविकास अधिकारी, पंचायत समिती, माण

(२१) श्री. विजयसिंह जाधव, गटविकास अधिकारी, पंचायत समिती, फलटण

(२२) श्री. प्रविण सुरडकर, गटविकास अधिकारी, पंचायत समिती, खटाव

(२३) श्रीमती दिपा बापट, गटविकास अधिकारी, पंचायत समिती, खंडाळा

(२४) श्री. आर. व्ही. सांगळे, गटविकास अधिकारी, पंचायत समिती, वाई

(२५) श्री. सतिश बुध्दे, गटविकास अधिकारी, पंचायत समिती, जावली

(२६) श्री. दिलीप शिंदे, गटविकास अधिकारी, पंचायत समिती, महाबळेश्वर

**संक्षिप्त कार्यवृत्त :**

समितीने सातारा जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी व इतर सर्व संबंधित अधिकारी तसेच गटविकास अधिकारी यांची सन २०१३-२०१४ च्या वार्षिक प्रशासन अहवालावरील प्रश्नावली क्रमांक-२ संदर्भात सातारा जिल्हा परिषदेच्या पंचायत समितीनिहाय संबंधित असलेल्या परिच्छेदांवर साक्ष घेतली.

**शुक्रवार, दिनांक १३ एप्रिल, २०१८**

**स्थळ : जिल्हा परिषद सभागृह, सातारा**

**उपस्थिती :**

(१) श्री. सुधीर पारवे, वि.स.स. तथा समिती प्रमुख

(२) श्री. बाबुराव पाचर्णे, वि.स.स.

(३) श्री. चरण वाघमारे, वि.स.स.

(४) श्री. रणधीर सावरकर, वि.स.स.

(५) डॉ. देवराव होळी, वि.स.स.

(६) डॉ. सुरेश (भाऊ) खाडे, वि.स.स.

(७) श्री. सुधाकर कोहळे, वि.स.स.

(८) श्री. भरतशेठ गोगावले, वि.स.स.

(९) श्री. किशोर पाटील, वि.स.स.

(१०) श्री. तुकाराम काते, वि.स.स.

(११) श्री. राहुल बोंद्रे, वि.स.स.

(१२) श्री. भारत भालके, वि.स.स.

(१३) प्रा. विरेंद्र जगताप, वि.स.स.

(१४) श्री. दिलीप सोपल, वि.स.स.

(१५) श्री. राहुल मोटे, वि.स.स.

(१६) श्री. दिपक चव्हाण, वि.स.स.

(१७) श्री. विक्रम काळे, वि.प.स.

**निमंत्रित सदस्य :**

(१) श्री. श्रीकांत देशपांडे, वि.प.स.

(२) श्री. दत्तात्रय सावंत, वि.प.स.

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय :**

(१) श्री. विलास आठवले, उप सचिव

(२) श्री. प्रकाशचंद्र खोंदले, अवर सचिव

(३) श्री. ह. वि. तामोरे, कक्ष अधिकारी.

**ग्रामविकास विभाग, मंत्रालय :**

(१) श्री. ना. भा. रिंगणे, उप सचिव, ग्रामविकास विभाग, मंत्रालय, मुंबई.

(२) श्री. परमेश्वर बाबर, कक्ष अधिकारी, ग्रामविकास विभाग, मंत्रालय, मुंबई.

**विभागीय आयुक्त कार्यालय, पुणे :**

(१) श्री. संभाजी लांगोरे, उप आयुक्त (आस्थापना)

(२) श्री. विलास जाधव, सहाय्यक आयुक्त (विकास)

(३) श्रीमती सोनाली घुले, सहाय्यक आयुक्त (तपासणी)

(४) श्रीमती रश्मी खांडेकर, सहाय्यक आयुक्त (चौकशी)

**जिल्हाधिकारी कार्यालय, सातारा :**

(१) श्री. संजय पाटील, उप जिल्हाधिकारी, सातारा

(२) श्री. रमेश शेंडगे, तहसीलदार, महाबळेश्वर

**जिल्हा परिषद, सातारा :**

(१) डॉ. कैलास शिंदे, मुख्य कार्यकारी अधिकारी

(२) श्री. पी. बी. पाटील, अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी

(३) श्री. नितीन थाडे, प्रकल्प संचालक, डीआरडीए

(४) श्री. वि. तु. पाटील, मुख्य लेखा व वित्त अधिकारी

(५) श्री. चंद्रशेखर जगताप, उप मुख्य कार्यकारी अधिकारी (पाणीपुरवठा व स्वच्छता) ग्रामीण पाणीपुरवठा विभाग

(६) श्री. एस. डी. बडे, उप मुख्य कार्यकारी अधिकारी (साप्रवि)

(७) श्रीमती पुनिता गुरव, शिक्षणाधिकारी (प्राथमिक)

(८) श्री. जावेद शेख, महिला व बालविकास अधिकारी

(९) श्री. एस. एस. सप्रे, प्रभारी कार्यकारी अभियंता, ग्रामीण पाणीपुरवठा

(१०) डॉ. भगवान पवार, जिल्हा आरोग्य अधिकारी

(११) श्री. पी. डी. कदम, कार्यकारी अभियंता, प्रधानमंत्री ग्राम सडक योजना

(१२) श्री. बी. पी. शिवदास, प्रभारी कार्यकारी अभियंता, लघुपाटबंधारे विभाग

(१३) डॉ. चां. ग. बागल, कृषी विकास अधिकारी

(१४) डॉ. विनोद पवार, जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी

(१५) श्री. डी. बी. कुलाळ, शिक्षणाधिकारी (माध्यमिक)

(१६) श्री. ए. जी. मगदुम, शिक्षणाधिकारी (निरंतर)

(१७) श्रीमती ए. एन. गावडे, गटविकास अधिकारी, पंचायत समिती, सातारा

(१८) श्रीमती एस. बी. खर्डे, गटविकास अधिकारी, पंचायत समिती, कोरेगांव

(१९) श्री. पी. एन. सुराडकर, गटविकास अधिकारी, पंचायत समिती, खटाव

(२०) श्री. जी. डी. शेलार, गटविकास अधिकारी, पंचायत समिती, माण

(२१) श्री. व्ही. एल. जाधव, गटविकास अधिकारी, पंचायत समिती, फलटण

(२२) श्रीमती डी. एच. बापट, गटविकास अधिकारी, पंचायत समिती, खंडाळा

(२३) श्री. आर. व्ही. सांगळे, प्रभारी गटविकास अधिकारी, पंचायत समिती, वाई

(२४) श्री. डी. पी. शिंदे, गटविकास अधिकारी, पंचायत समिती, महाबळेश्वर

(२५) श्री. एस. आर. बुध्दे, गटविकास अधिकारी, पंचायत समिती, जावली

(२६) श्री. एस. एम. गायकवाड, गटविकास अधिकारी, पंचायत समिती, पाटण

(२७) श्री. ए. ए. फडतरे, गटविकास अधिकारी, पंचायत समिती, कराड

(२८) श्री. ए. बी. जोशी, शाखा अभियंता, ग्रामीण पाणीपुरवठा विभाग

(२९) श्री. आर. बी. आंचद, कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, सातारा

(३०) श्री. एस. बी. पाटील, कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, कराड

(३१) श्री. पी. एल. गोलांगे, सहाय्यक भूवैज्ञानिक, भुजल सर्व्हेक्षण आणि विकास यंत्रणा

(३२) श्री. अ. मो. अंजनकर, उप वनसंरक्षक, वन विभाग, सातारा,

(३३) श्री. तानाजी गायकवाड, सहाय्यक वनसंरक्षक, वन विभाग, सातारा

(३४) डॉ. एस. डी. भोई, शल्य चिकित्सक, जिल्हा सातारा

**संक्षिप्त कार्यवृत्त :**

समितीने सातारा जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी व इतर सर्व संबंधित अधिकारी यांची सन २०१२-१३ च्या लेखा परीक्षा पुनर्विलोकन अहवालातील व सन २०१३-२०१४ च्या वार्षिक प्रशासन अहवालातील सातारा जिल्हा परिषदेशी संबंधित असलेल्या परिच्छेदांवर साक्ष घेतली.

**बुधवार, दिनांक १६ जानेवारी, २०१९**

**स्थळ : विधान भवन, मुंबई**

**उपस्थिती :**

(१) श्री. सुधीर पारवे, वि.स.स. तथा समिती प्रमुख

(२) श्री. चरण वाघमारे, वि.स.स.

(३) प्रा. विरेंद्र जगताप, वि.स.स.

(४) श्री. दिपक चव्हाण, वि.स.स.

(५) श्री. विक्रम काळे, वि.प.स.

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय :**

(१) श्री. विलास आठवले, उप सचिव

(२) श्री. प्रकाशचंद्र खोंदले, अवर सचिव

(३) श्री. मंगेश पिसाळ, कक्ष अधिकारी

**स्थानिक निधी लेखापरीक्षा संचालनालय, नवी मुंबई :**

श्री. प्रताप मोहिते, संचालक

**मंत्रालयीन विभागीय सचिव :**

(१) श्री. श्यामलाल गोयल, अपर मुख्य सचिव, पाणीपुरवठा व स्वच्छता विभाग

(२) श्री. राजगोपाल देवरा, प्रधान सचिव, वित्त विभाग

(३) श्री. असिमकुमार गुप्ता, प्रधान सचिव, ग्रामविकास विभाग

(४) श्री. दिनेश वाघमारे, प्रधान सचिव, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग

(५) श्री. रा. वा. पानसे, सचिव (प्र.स.), जलसंपदा विभाग

(६) श्री. चं. प्र. जोशी, सचिव (रस्ते), सार्वजनिक बांधकाम विभाग

(७) डॉ. सुवर्णा खरात, सह सचिव, शालेय शिक्षण विभाग

(८) श्री. प्रकाश वळवी, उप सचिव, ग्रामविकास विभाग

(९) श्री. संजय बनकर, उप सचिव, ग्रामविकास विभाग

(१०) श्री. कि. पां. वडते, उप सचिव, महसूल विभाग

(११) श्री. म. रं. शेळके, उप सचिव, मृद व जलसंधारण विभाग

(१२) श्री. अ. अ. कपोले, उप सचिव, जलसंपदा विभाग

(१३) श्री. अ. मा. लुंडबे, अवर सचिव, पाणीपुरवठा व स्वच्छता विभाग

(१४) श्रीमती एम निलीमा केरकेट्टा, मुख्य कार्यकारी अधिकारी, खादी व ग्रामद्योग मंडळ

(१५) श्री. परमेश्वर बाबर, कक्ष अधिकारी, ग्रामविकास विभाग

**विभागीय आयुक्त कार्यालय, पुणे :**

श्री. संभाजी लांगोरे, उप आयुक्त, विभागीय आयुक्त कार्यालय, पुणे

**जिल्हा परिषद, सातारा :**

(१) डॉ. कैलास शिंदे, मुख्य कार्यकारी अधिकारी,

(२) श्री. संतोष धोने, अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी

(३) श्री. सत्यजित बडे, उप मुख्य कार्यकारी अधिकारी (साप्रवि)

(४) श्री. धर्मेंद्र काळोखे, मुख्य लेखा व वित्त अधिकारी

(५) श्री. एस. एस. शिंदे, कार्यकारी अभियंता (ग्रामीण पाणीपुरवठा) विभाग

(६) श्री. सी. आर. गजभिये, मुख्य लेखा व वित्त अधिकारी

(७) श्री. विनायक पवार, कृषि विकास अधिकारी

(८) डॉ. विनोद पवार, जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी

(९) श्री. एच. व्ही. जाधव, उप शिक्षणाधिकारी (प्राथमिक)

(१०) श्री. अ. आ. नाईक, कार्यकारी अभियंता (लघुपाटबंधारे विभाग)

**संक्षिप्त कार्यवृत्त :**

सन २०१२-१३ च्या लेखा परीक्षा पुनर्विलोकन अहवाल व सन २०१३-२०१४ च्या वार्षिक प्रशासन अहवाल यासंदर्भात सातारा जिल्हा परिषदेकडून प्राप्त झालेल्या माहितीच्या संदर्भात अधिक माहिती मिळविण्यासाठी अपर मुख्य सचिव, पाणीपुरवठा व स्वच्छता विभाग, प्रधान सचिव, वित्त विभाग, प्रधान सचिव, ग्रामविकास विभाग, प्रधान सचिव, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, सचिव (प्र.स.), जलसंपदा विभाग, सचिव (रस्ते), सार्वजनिक बांधकाम विभाग, सह सचिव, शालेय शिक्षण विभाग, उप सचिव, ग्रामविकास विभाग, उप सचिव, महसूल विभाग, उप सचिव, मृद व जलसंधारण विभाग, उप सचिव, जलसंपदा विभाग, अवर सचिव, पाणीपुरवठा व स्वच्छता विभाग, कक्ष अधिकारी, ग्रामविकास विभाग, मुख्य कार्यकारी अधिकारी, खादी व ग्रामद्योग मंडळ तसेच मुख्य कार्यकारी अधिकारी, सातारा यांची साक्ष घेतली.

**गुरुवार, दिनांक २० जून, २०१९**

**स्थळ : विधान भवन, मुंबई**

**उपस्थिती :**

(१) श्री. सुधीर पारवे, वि.स.स. तथा समिती प्रमुख

(२) श्री. बाबुराव पाचर्णे, वि.स.स.

(३) श्री. चरण वाघमारे, वि.स.स.

(४) श्री. रणधीर सावरकर, वि.स.स.

(५) ॲड. राहुल कुल, वि.स.स.

(६) डॉ. सुधाकर भालेराव, वि.स.स.

(७) श्री. सुधाकर कोहळे, वि.स.स.

(८) श्री. किशोर पाटील, वि.स.स.

(९) श्री. तुकाराम काते, वि.स.स.

(१०) श्री. भारत भालके, वि.स.स.

(११) श्री. प्रविण दरेकर, वि.प.स.

(१२) श्री. विक्रम काळे, वि.प.स.

**विशेष निमंत्रित सदस्य :**

(१) श्री. बाळाराम पाटील, वि.प.स.

(२) श्री. दत्तात्रय सावंत, वि.प.स.

(३) श्री. किशोर दराडे, वि.प.स.

(४) श्री. निरंजन डावखरे, वि.प.स.

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय**

(१) श्री. विलास आठवले, सह सचिव (२) (का.)

(२) श्री. प्रकाशचंद्र खोंदले, अवर सचिव

(३) श्री. मंगेश पिसाळ, कक्ष अधिकारी

(४) श्री. नितलेश भालेराव, कक्ष अधिकारी

**संक्षिप्त कार्यवृत्त :**

समितीने बैठकीत अठ्ठाविसाव्या व एकोणतीसाव्या अहवालाच्या प्रारुपावर विचार करून ते किरकोळ दुरुस्त्यांसह संमत केले.

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई